मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

महासागर

मुंबई कार्यालय
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

पालघर कार्यालय
२०८/बी, लोकमान्य बिल्डींग, तालुका पंचायत समिती कार्यालयासमोर, पालघर, ४०१४०४ मो. ९८९२९६८७२५

नाशिक कार्यालय
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर, धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

वितरण
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक | गुरुवार, ३ एप्रिल २०२५ | वर्ष: ६ | अंक:१०५ | पाने-८ | किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३

पूनम गुप्ता रिझर्व्ह बँकेच्या डेप्युटी गव्हर्नरपदी

मुंबई, दि. २ प्रतिनिधी

जागतिक बँकेच्या माजी अर्थतज्ज्ञ पूनम गुप्ता यांची भारतीय रिझर्व्ह बँकेच्या डेप्युटी गव्हर्नर पदी नियुक्ती करण्यात आली आहे. ७ ते ९ एप्रिल दरम्यान होणाऱ्या द्वैमासिक चलनविषयक धोरण समितीच्या बैठकीपूर्वी ही नियुक्ती करण्यात आली. पुढच्या तीन वर्षांच्या कालावधीसाठी त्या या पदावर असणार आहेत. मायकल पात्रा सध्या या पदावर आहेत. पूनम गुप्ता सध्या नॅशनल कॉऊन्सिल ऑफ अप्लाइड इकॉनॉमिक रिसर्च च्या महासंचालक म्हणून काम पाहतात. त्या पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार परिषदेच्या सदस्या आहेत आणि १६ व्या वित्त आयोगाच्या सल्लागार परिषदेच्या संयोजक म्हणून काम करतात. पूनम गुप्ता २०२१ मध्ये एनसीएईआरमध्ये सामील झाल्या, त्यांच्यासोबत वॉशिंग्टन डीसी येथे आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (आयएमएफ) आणि जागतिक बँकेत वरिष्ठ पदांवर जवळजवळ दोन दशकांचा अनुभव आहे.

अग्राग्रलेख
खरीखरी

वक्फ आणि गदारोळ

आज लोकसभेत बहुप्रतिक्षीत वक्फ बिल सरकारने पेश केले. ही खरीखरी लिहीपर्यंत लोकसभेत अजूनही घमासान सुरू आहे. मतदानाचे आकडे मतदान न झाल्यामुळे बाहेर येण्याचा प्रश्नच नाही. हे वक्फ बिल पास करण्यासाठी ज्या बहुमताची गरज होती. ते कदाचित सत्ताधारी एनडीएला मिळाले असेल. म्हणजेच एनडीएतील अनेक पक्ष मुस्लिमांच्या मतांवर निवडून आलेले होते. त्यांच्याकडून पक्की गॅरंटी घेतल्याशिवाय हे बिल पेश केले गेलेच नसते. गेल्यावेळी लोकसभेत हे बिल पारित करण्यात आलेच नव्हते. यानंतर हरियाणा आणि महाराष्ट्र ही दोन राज्ये जिंकल्यावर हे बिल विश्वासाने सादर करण्यात आलेले आहे. हे बिल केवळ लोकसभेचे पारित केले. तरी त्याचे कायद्यात रूपांतर होत नाही. राज्य सभेमध्येही या बिलाला अनुमोदन दिले गेले पाहिजे. तेव्हाच त्याचे कायद्यात रूपांतर होईल. आजच्या घडीला एनडीए जवळ 296 खासदारांचा पाठिंबा आहे. विरोधी पक्षाने एनडीए मधील एकाही पक्षाला आपल्याकडे वळवण्याचा प्रयत्न केला नाही किंवा एकही पक्ष त्यांच्याकडे वळू शकलेला नाही. चंद्राबाबू नायडूंचे 16 खासदार, नितीश बाबूंचे 12 खासदार आणि पासवानांचे पाच खासदार हे सर्वजण मिळून या बिलाचा निषेध करतील. असे मनाचे मांडे विरोधी बाकावरच्या खासदारांकडून खाल्ले जात होते. पण चाणक्य असलेल्या अमित शहा यांनी चाणाक्षपणे नितीश बाबू आणि चंद्राबाबू यांच्याकडून पक्की खात्री करून घेतली होती. तिकडे राज्यसभेत 121 मते एनडीएला हवी आहेत. एनडीए जवळ 125 च्या आसपास आकडा आहे असे म्हणतात. म्हणजे राज्यसभेतही हे बिल नाकारले जाणार नाही याची शाश्वती आहे. आपल्या देशात सरकार आणि रेल्वे यानंतर सर्वाधिक जमीन असलेली संस्था म्हणजे वक्फ बोर्ड आहे. आपल्या हिंदुस्थानावर ठीकठिकाणी अनेक बादशहा किंवा निजाम यांनी राज्य केले. त्यासोबतच नबाबांचेही राज्य होते. त्यांनी किंवा त्यांच्या सरदारांनी या वक्फसाठी मोठमोठ्या जमिनी दिलेल्या आहेत. बहुसंख्य असलेला गरीब मुस्लिम समाज या संपत्तीचे फक्त दूरदर्शन करू शकतो. पण या बोर्डात दादागिरी चालते ती फक्त श्रीमंतांचीच, असेही म्हणतात. या बोर्डाच्या जमिनी बाबत अनेक विवाद आहेत. त्यामुळेच आता काही धार्मिक मुस्लिम नेते या बिलाचे समर्थन करताना दिसतात. एका साध्या मुस्लिमाने तर वक्फमुळे अनेक भूमाफिया तयार झालेले आहेत. असा थेट आरोप केलेला आहे. वक्फ बोर्डाची कमिटी 22 लोकांची असते. आता त्यात दहा मुस्लिम आणि 12 गैर मुस्लिम असतील. यावर अनेक मुस्लिम नेत्यांचा विरोध आणि रोष आहे. ही आमच्या धार्मिक कारभारात सरकारची लुडबुड आहे, असे संबंधित लोक म्हणतात. सरकारने हे आरोप फेटाळून लावलेले आहेत. आता हे विधेयक मंजूर झाल्यावर देशभरातील वक्फ भूमीचे सम्राट निश्चितच मुक्तभोगी ठरतील. त्यामुळे 'आले सरकारजीच्या मना, तेथे कोणाचेच चालेना' या उक्तीप्रमाणे सरकारची हे बिल पास करण्याची युक्ती सफल होणार आहे. याबद्दल शंका घेण्याचे कारण नाही. कारण लोकसभेत कितीही गदारोळ झाला. तरी बहुमत एनडीएकडे आहे. त्यामुळे लोकसभेतील गदारोळ म्हणजे अरण्यरुदन ठरेल असे वाटते. देशभरात या विषयावर काय प्रतिक्रिया उमटतात. ते लवकरच दिसून येईल. तोपर्यंत 'तुका म्हणे उगी राहा, जे जे होईल ते ते पाहा'!

nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023

कृपा चुलत्यांची

चुलत्यांची कृपा ऐकलं ना?
आता डोकं जरा खाजवा
इतिहासात कोण म्हणाले होते
काका, काका मला वाचवा!

- गजानन तुपे

वक्फवरुन लोकसभेत घमासान

...तर संसद भवन 'वक्फ' मालमत्ता झाली असती!- रिजिजू

नवी दिल्ली, दि. २ वृत्तसंस्था

वक्फ दुरुस्ती विधेयकावरून लोकसभेत जोरदार घमासान सुरू आहे. शेवटचे वृत्त हाती येईपर्यंत अभूतपूर्व गदारोळ सुरूच होता. वक्फ दुरुस्ती विधेयक २०२५ बुधवारी लोकसभेत सादर करण्यात आले. लोकसभेने हे दुरुस्ती विधेयक विचारार्थ घेतले. ज्यात गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये संसदेत सादर केलेल्या विधेयकाचे परीक्षण करणाऱ्या संयुक्त संसदीय समितीच्या सूचनांचा समावेश आहे. तसेच सभागृहाने मुस्लिम वक्फ (रद्द) विधेयक, २०२४ विचारार्थ आणि मंजूरीसाठी घेतले. संसदीय कामकाज आणि अल्पसंख्याक व्यवहार मंत्री किरेन रिजिजू यांनी हे विधेयक विरोधकांच्या प्रचंड गदारोळात सभागृहात मांडले. मंत्री रिजिजू यांनी विरोधकांवर अफवा पसरवली जात असल्याबद्दल जोरदार टीका केली. हे विधेयक सर्वांसाठी फायदेशीर ठरेल, असा दावा त्यांनी केला. या विधेयकावर सभागृहात प्रदीर्घ चर्चा सुरु आहे.

लोकसभेत वक्फ दुरुस्ती विधेयक सादर केल्यानंतर, मंत्री किरेन रिजिजू म्हणाले, "दिल्लीत १९७० पासून सुरू असलेल्या एका प्रकरणात सीजीओ कॉम्प्लेक्स आणि संसद भवनसह अनेक मालमत्तांचा समावेश होता. दिल्ली वक्फ बोर्डाने या

सर्व मालमत्ता वक्फ मालमत्ता असल्याचा दावा केला. हा खटला न्यायालयात होता. पण त्याचदरम्यान यूपीए सरकारने १२३ मालमत्ता डीनोटिफाइड केल्या आणि त्या मालमत्ता वक्फ बोर्डाकडे सोपवल्या. जर आपण आज ही दुरुस्ती केली नाही तर आपण ज्या संसदेत बसलो आहोत ती इमारतदेखील वक्फ मालमत्ता असल्याचा दावा केला जाऊ शकतो. जर पंतप्रधान मोदी सरकार सत्तेत आले नसते तर अनेक मालमत्ता डीनोटिफाइड केल्या असत्या..." असे रिजिजू यांनी नमूद केले.

वक्फ विधेयक कोणतीही धार्मिक व्यवस्था, धार्मिक संस्था अथवा कोणत्याही धार्मिक प्रथेत कोणत्याही प्रकारे हस्तक्षेप करणारे नाही. वक्फ बोर्डाच्या तरतुदींचा कोणतीही मशिद, मंदिर अथवा धार्मिक स्थळाच्या व्यवस्थापनाशी कसलाही संबंध नाही. हा केवळ मालमत्तेशी संबंधित व्यवस्थापनाचा विषय आहे, असे त्यांनी सांगितले.

देशात स्वातंत्र्यानंतर १९५४ मध्ये वक्फ कायदा लागू झाला. वक्फ बोर्डाची देशात किमान ८ लाख एकरांहून अधिक जमीन व अंदाजे सव्वा लाख कोटी रुपयांची मालमत्ता आहे. ही जमीन जगातील ५० लहान देशांच्या क्षेत्रफळाइतकी आहे. वक्फ बोर्ड कायद्याच्या कलम ४० अंतर्गत वक्फ मंडळाला 'रिझन टू बिलीव्ह'चा अधिकार प्राप्त होतो. एखादी मालमत्ता वक्फ संपत्ती आहे, असे या मंडळाला वाटत असेल, तर ते स्वतः ती वक्फ संपत्ती असल्याचे घोषित करू शकते. त्याबाबत वक्फ न्यायाधिकरणाकडे आक्षेप नोंदवणे व नंतर उच्च न्यायालयात आव्हान देणे, ही प्रक्रिया खूप गंतागुंतीची आहे. सध्या देशातील वक्फ मंडळांना मालमत्तांमधून २०० कोटी रुपयांचा वार्षिक महसूल मिळतो. गेल्या ७५ वर्षांत या मंडळांकडे असलेल्या जमिनींची संख्या ३५ हजारवरून आता सुमारे १० लाख जमिनीच्या तुकड्यांवर जाऊन पोहोचली आहे.

महाराष्ट्रातील दोन गावांमधील मंदिरांवर वक्फने केलेल्या दाव्याचा अमित शाहांनी केला उल्लेख

यावेळी बोलताना अमित शाह यांनी महाराष्ट्रातील दोन गावांमधील मंदिरांवर केलेल्या दाव्याचा उल्लेख केला. ते म्हणाले, "महाराष्ट्रातील वडांगे गावातील महादेव मंदिरावर वक्फ बोर्डाने दावा केला होता. याचबरोब बीडमधील कंकालेश्वर मंदिराची १२ एकर जमीन वक्फ बोर्डाने जबरदस्तीने ताब्यात घेतली होती."

ते पुढे म्हणाले की, "२०१३ मध्ये, तुष्टीकरणासाठी वक्फला एका रात्रीत अतिरेकी स्वरूप देण्यात आले. यामुळे, दिल्लीतील १२३ सरकारी मालमत्ता वक्फला देण्यात आल्या. दिल्ली वक्फ बोर्डाने उत्तर रेल्वेची जमीन वक्फच्या नावावर घोषित केली. हिमाचल प्रदेशात, वक्फ मालमत्ता म्हणून घोषित केलेल्या जमिनीवर बेकायदेशीर मशिदी बांधण्यात आल्या. तामिळनाडूमध्ये, १५०० वर्षे जुन्या मंदिराची जमीन वक्फला देण्यात आली."

वक्फचा अर्थ आणि त्याचा इतिहास स्पष्ट करताना गृहमंत्री अमित शहा म्हणाले की, "वक्फ हा एक अरबी शब्द आहे, ज्याचा उल्लेख काही हदीसांमध्ये आहे." त्यांनी सांगितले की, "वक्फ म्हणजे अल्लाहच्या नावाने मालमत्ता दान करणे आणि त्याची प्रथा इस्लामचे दुसरे खलीफा उमर यांच्या काळात सुरू झाली."

संसदेत वक्फ विधेयकावरील चर्चेदरम्यान बोलताना गृहमंत्री अमित शहा म्हणाले की, वक्फशी संबंधित धार्मिक कार्यात गैर-मुस्लिमांना समाविष्ट केले जाणार नाही. परंतु, काही लोक या मुद्द्यावर गैरसमज पसरवून आपली मतपेढी सुरक्षित करण्यासाठी राजकारण करत आहेत. त्यांनी स्पष्ट केले की, वक्फ बोर्ड आणि वक्फ कौन्सिलमधील बिगर मुस्लिम सदस्य केवळ काम योग्यरित्या होत आहे की नाही याची खात्री करण्यासाठी असतील.

सरकारने मुस्लिमांना दिली पाच आश्वासने

हे विधेयक मांडताना सरकारने देशातील मुस्लिम समुदायाला 5 आश्वासनेही दिली आहेत.

किरेन रिजिजू म्हणाले की, या विधेयकाबाबत 9727772 याचिका आल्या होत्या. आजपर्यंत यापेक्षा जास्त याचिका कोणत्याही विधेयकाबाबत कधीच आलेल्या नाहीत. विविध समित्यांसमोर 284 शिष्टमंडळांनी आपली मते मांडली. सकारात्मक विचाराने या विधेयकाला विरोध करणारेही याला पाठिंबा देतील, असा आमचा विश्वास आहे.

1. संसदेत विधेयक सादर करताना किरेन रिजिजू यांनी मुस्लिमांना आश्वासन दिले की, या विधेयकात कोणत्याही मशिदीवर कारवाई करण्याची तरतूद नाही. हा केवळ मालमत्तेचा मुद्दा आहे, या विधेयकाचा धार्मिक संस्थांशी काहीही संबंध नाही.
2. सरकारने पुढे सांगितले की, वक्फ दुरुस्ती विधेयकात कोणत्याही धार्मिक स्थळ किंवा मशिदीच्या व्यवस्थेमध्ये कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप करण्याची तरतूद नाही. यामध्ये कोणताही बदल किंवा हस्तक्षेप होणार नाही.
3. वक्फ दुरुस्ती विधेयकात कोणत्याही धार्मिक कार्यात हस्तक्षेप करण्याची तरतूद नाही. आम्ही कोणत्याही मशिदीच्या कामकाजात हस्तक्षेप करणार नाही. वक्फ बोर्ड कायद्याच्या कक्षेत असेल, त्यात कायद्याच्या विरोधात काहीही केले जाणार नाही.
4. जिल्हाधिकाऱ्यांपेक्षा वरचा कोणताही अधिकारी सरकारी जमीन आणि कोणतीही विवादित, जमीन यांच्यातील वादावर लक्ष देईल. वक्फ मालमत्ता निर्माण करताना आम्ही कोणत्याही आदिवासी भागात जाऊ शकत नाही. हा बदल महत्त्वाचा आहे. कोणत्याही मशिदीवर कारवाई करण्याची तरतूद नाही.
5. सरकारने वचन दिले की, केंद्र परिषदेतील एकूण 22 सदस्यांपैकी 4 पेक्षा जास्त गैर-मुस्लिम असू शकत नाहीत. माजी अधिकाऱ्यांसह संसदेचे तीन सदस्य निवडून येणार आहेत. संसद सदस्य कोणत्याही धर्माचे असू शकतात.

'वक्फ' विधेयकाला न्यायालयात आव्हान देणार -मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड

नवी दिल्ली, दि. २ वृत्तसंस्था

"वक्फ (दुरुस्ती) विधेयक हा एक काळा कायदा आहे. हे विधेयक कनिष्ठ सभागृहाने मंजूर केला तर ते राज्यसभेत मांडले जाईल. आमची मालमत्ता हिसकावून घेण्यासाठी सुरु केलेला हा प्रयत्न आहे. हे स्वीकारता येईल का?, असा सवाल करत आम्ही पराभूत झालो आहोत असे समजू नका, आम्ही या विधेयकाला न्यायालयात आव्हान देणार आहोत, अशी माहिती ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड (एआयएमपीएलबी) चे प्रवक्ते डॉ. सय्यद कासिम रसूल इलियास यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. संयुक्त संसदीय समिती (जेपीसी) मध्ये चर्चेदरम्यान या विधेयकाला विरोध करण्यात आला होता. आपण लढाई हरलो आहोत असे गृहीत धरू नये. आपण नुकतीच सुरुवात केली आहे. हा देश वाचवण्याचा लढा आहे. प्रस्तावित कायदा भारताच्या रचनेलाच धोका निर्माण करतो. सर्व जागरूक नागरिकांना विधेयकाला विरोध करण्याचे आवाहन करत आम्ही न्यायालयात जाऊ. हा कायदा मागे घेतल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही," असा निर्धार एआयएमपीएलबीचे एमडी अदीब यांनी व्यक्त केला. आम्हाला देश वाचवायचा आहे म्हणून आम्ही हा लढा सुरू केला आहे. आम्ही शेतकऱ्यांप्रमाणेच देशभर आंदोलन करुन गरज पडल्यास रास्ता रोको करु आणि विधेयकाला विरोध करण्यासाठी सर्व शांततापूर्ण उपाययोजना करू," असे सांगत शेतकऱ्यांच्या आंदोलनाप्रमाणे देशव्यापी निदर्शने करण्याचा इशाराही एआयएमपीएलबीचे प्रवक्ते मोहम्मद अली मोहसीन यांनी दिले.

सरकारच्या कथनी आणि करणीत फरक - अरविंद सावंत

नवी दिल्ली, दि. २ वृत्तसंस्था

वक्फ बोर्ड सुधारणा विधेयकावर चर्चा सुरु आहे. अध्यक्ष महोदय मी हे सांगू इच्छितो की मी देखील जेपीसी (संयुक्त संसदीय समिती) मध्ये होतो पण दुर्दैवाने संयुक्त संसदीय समितीत मुद्दे विचारात घेऊन, कलमे विचारात घेऊन शेवटपर्यंत चर्चा झालीच नाही. अशा परिस्थितीत जर असे विधेयक आणले जात असेल तर सरकारचे उद्दीष्ट काय? सरकारला काय हवे? या सरकारच्या कथनी आणि करणीत फरक आहे. हे बिल आणून या सरकारला कुणालाही न्याय द्यायचा नाही, असा आरोप अरविंद सावंत यांनी केला आहे.

देशाला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी ज्यांनी काहीच केले नाही अशा लोकांच्या हाती सत्ता आहे. देशाला स्वातंत्र्य मिळावं म्हणून मुस्लिम लोकही अंदमानच्या तुरुंगात राहिले आहेत. मात्र जे चुकीचे आहे ते चुकीचे आहे. बिलात जे चूक आहे त्याला आम्ही पाठिंबा देणार नाही. बोर्डबाबत सगळे सांगत होते नोंदणी प्रक्रियेनुसार बोर्डावर सदस्य येतील. याचाच अर्थ सरकारच्या मनाप्रमाणे या बोर्डावरचे सदस्य ठरतील. वक्फ बोर्डात मुस्लिम बांधव अल्पसंख्य होतील. महिलांना आरक्षण दिलं सांगू नका ते १९९५ पासूनच आहे. गैर मुस्लिम तुम्ही बोर्डावर आणत आहात. उद्या मंदिरांमध्येही तुम्ही बिगर हिंदू लोक आणून बसवू शकता अशी आम्हाला भीती आहे. असे झाले तर शिवसेना तुमच्या विरोधातच उभी असेल. कारण हे जे काही चाललं आहे ते ख्रिश्चन, जैन, शीख या सगळ्यांच्या प्रार्थनास्थळांबाबत घडू शकते. तुम्ही ३७० कलम हटवले आम्ही स्वागत केलं. आता किती हिंदू काश्मीरमध्ये आले? काश्मीरमध्ये जमिनी कोण विकत घेतं आहे ते पण देशाला सांगा. तुमच्या जाहीरनाम्यात काय म्हटलं होतं? आठवतंय का? असाही प्रश्न अरविंद सावंत यांनी विचारला. हे बिल आणण्यामागचा तुमचा हेतू चांगला वाटत नाही. तुम्हा लोकांना जमीन हडप करायची आहे. मणिपूरमध्येही हेच चाललं आहे. कुठल्या उद्योजकांसाठी हे चाललं आहे सगळ्यांना माहीत आहे. ओठो पे सच्चाई रहती है और दिल में सफाई रहती है. तुमच्या मनात सफाई नाही त्यामुळेच राज कपूरला पुढे सिनेमा करावा लागला राम तेरी गंगा मैली हो गयी. असाही टोला अरविंद सावंत म्हणाले.

जर बाळासाहेब आज जिवंत असते तर ते असे बोलले असते का?

श्रीकांत शिंदेंचे ठाकरे गटावर जोरदार टिकास्त्र

नवी दिल्ली, दि. २ वृत्तसंस्था

एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे यांनी विधेयकावरील चर्चेदरम्यान ठाकरे गटाने याला विरोध केल्याने टीका केली आहे. यावेळी श्रीकांत शिंदे यांनी म्हटले की, "शिवसेना आणि माझे नेते एकनाथ शिंदे यांच्या वतीने, मी या विधेयकाला पूर्णपणे पाठिंबा देतो. हा एक एतिहासिक आणि महत्त्वाचा दिवस आहे. आधी कलम ३७०, नंतर तिहेरी तलाक व सीएए आणि आता हे विधेयक गरिबांच्या कल्याणासाठी या सभागृहात आणले गेले आहे. त्यांचे (अरविंद सावंत, ठाकरे गट) भाषण एकून मला खूप वाईट वाटले. ते खूप धक्कादायक होते."

श्रीकांत शिंदे पुढे म्हणाले की, "मी यूबीटीला एक प्रश्न विचारू इच्छितो, त्यांनी त्यांच्या आंतरआत्म्याला विचारावे की, जर बाळासाहेब आज जिवंत असते तर ते असे बोलले असते का? आज हे स्पष्ट झाले आहे की यूबीटी आज कोणाची विचारसरणी स्वीकारत आहे आणि या विधेयकाला विरोध करत आहे."

"त्यांच्याकडे त्यांच्या चुका सुधारण्याची, त्यांचा इतिहास पुन्हा लिहिण्याची आणि विचारसरणी जिवंत ठेवण्याची सुवर्णसंधी होती. पण यूबीटीने आधीच त्यांची विचारसरणी बुलडोझरने चिरडली आहे. जर बाळासाहेब आज येथे असते आणि यूबीटीची असहमती पत्रं वाचली असती तर त्यांना दुःख झाले असते."

अंबानींचे घर हे वक्फच्या जमिनीवर आमदार जितेंद्र आव्हाडांचा दावा

मुंबई, दि. २ प्रतिनिधी

विधेयकावरुन सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये वाद सुरू असतानाच राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी वक्फ बोर्ड विधेयकास स्पष्टपणे विरोध दर्शवला आहे. तसेच, अंबानींचं घर हे वक्फ बोर्डाच्या जमिनीवर आहे, मुस्लिम समाजातील काही नेत्यांनी कायद्याचा दुरुपयोग केलाय, असा दावाच आमदार आव्हाड यांनी केला आहे.

आता माझा सरकारला सवाल आहे की, हिंदू मंदिरात अब्जो रुपयांचे सोन आहे, आता हे सोनं तुम्ही ताब्यात घेणार का? मला सरकारने उत्तर द्यावं, असे जितेंद्र आव्हाड यांनी म्हटलं आहे. लोकांच्या धार्मिक विषयात जायची काय गरज आहे. संविधानाच उल्लंघन करण्याचं काम सुरू आहे, आता आपल्याकडे दक्षिणेतील मंदिराकडे भारताला श्रीमंत करतील असं दुप्पट सोनं आहे. मग, आपण वक्फ बोर्डला विरोध कशाला करायचा? एकदा जमीन वक्फ करण्यात आली म्हणजेच समाजासाठी दान करण्यात आली, परत ती हस्तांतरित करण्यात येणार नाही. आता कायदा करायचा असेल तर असा करा की या जमिनीकडे कोणी वाकड्या नजरेने पाहणार नाही, त्यांच्या वाड वडिलांनी वक्फला दान केलेल्या जमिनी आहेत, असेही आव्हाड यांनी म्हटले. अंबानींच घर हे वक्फच्या जमिनीवर आहे, मुस्लिम समाजातील काही नेत्यांनी कायद्याचा दुरुपयोग केला. आता दिल्लीच्या मध्यवर्ती भागातील जमिनी देखील मोकळ्या बाजारात येणार आहेत, असा दावाही जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे.

किरण रिजजू यांच्या वक्तव्यासंदर्भात आव्हाड यांना विचारले असता, मी केवळ यावर हसेल. कारण ते म्हणतात की संसद वक्फच्या जागेवर आहे. अरे इंग्रजांच्या काळापासून संसद त्याठिकाणी आहे. उगाच चुकीची माहिती पसरवू नका, असे आव्हाड यांनी म्हटले.

संसदेने कायदा केला, तो सर्वांना मान्य करावाच लागेल - अमित शाह कडाडले

नवी दिल्ली, दि. २ वृत्तसंस्था

वक्फ सुधारणा विधेयक आज लोकसभेत सादर करण्यात आले. त्यावर जोरदार चर्चा झाली . या विधेयकावर सुरू असलेल्या चर्चेत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनीही भाग घेतला. या कायद्याद्वारे मुस्लिमेतरांच्या दान केलेल्या मालमत्तेवर वक्फ कायदा लादण्यापासून आम्ही थांबवले. आम्ही ओव्हररायडिंग इफेक्ट देखील काढून टाकले. 2013 मध्ये आलेल्या दुरुस्ती विधेयकावर दोन्ही सभागृहात 5.4 तास एकत्र चर्चा झाली होती, मात्र आज या विधेयकावर दोन्ही सभागृहात तब्बल 16 तास चर्चा झाली. समितीही स्थापन झाली, राज्य सरकारांचे प्रतिनिधी आले. तीन अभ्यास भेटी घेतल्या. सुमारे 92.68 लाख सूचना ऑनलाइन आल्या. आपण ते असे डिसमिस करू शकत नाही. पूर्वीच्या कायद्यात न्यायालयांच्या अधिकार क्षेत्रावरही बंधने घालण्यात आली होती. तुम्ही व्होट बँकेसाठी ते केले, पण आता हे चालणार नाही. आता संसदेने हा कायदा केला आहे आणि तो सर्वांना मान्य करावा लागेल, असेही शाहांनी स्पष्टपणे सांगितले.

ते म्हणाले, दान आपल्या संपत्तीचे केले जाऊ शकते. सरकारी जमिनींचे नाही. ते म्हणाले वक्फ एक प्रकारचे चॅरिटेबल एंडोरमेंट आहे. यात व्यक्ती पवित्र दान करते. दान अशाच गोष्टीचे केले जाते जी आपली आहे. सरकारी मालमत्ता अथवा इतर कुणाच्या मालमत्तेचे दान करता येत नाही. ही संपूर्ण चर्चा याच मुद्द्यावर आहे.

लोकसभेत बोलताना अमित शाह म्हणाले, मी या विधेयकाच्या बाजूने बोलत आहे. मला वाटते, एक तर निर्दोष भावनेने अथवा राजकीय कारणांमुळे सदस्यांच्या मनात अनेक गैरसमज आहेत आणि ते पसरवण्याचे कामही सुरू आहे. मी काही गोष्टी स्पष्ट करण्याचा प्रयत्न करेन. वक्फ एक अरबी शब्द आहे. याचा इतिहास काही हदीसशी संबंधित सापडतो. आज ज्या अर्थाने वक्फ शब्दाचा वापर केला जातो, त्याचा अर्थ आहे अल्लाहच्या नावावर मालमत्तेचे दान. आम्ही आज जो अर्थ समजत आहोत, तो इस्लाम चे दुसरे खलीफा उमर यांच्या काळात अस्तित्वात आला."

शाह काँग्रेसवर थेट हल्ला करताना

म्हणाले, "वक्फ विधेयकावर 2013 मध्ये जे संशोधन आले, ते आले नसते, तर आज हे संशोधन आणण्याची गरज पडली नसती. त्यावेळी काँग्रेस सरकारने दिल्लीतील 125 लुटियन्स मालमत्ता वक्फला दिल्या. उत्तर रेल्वेची जमीन वक्फला देण्यात आली. हिमाचलमध्ये वक्फ जमीन असल्याचा दावा करून एक मशीद बांधण्यात आली." यावेळी शाह यांनी, तामिळनाडूपासून कर्नाटकपर्यंतची काही उदाहरणे दिली ज्यावर विरोधकांनी गदारोळ केला आणि त्यांच्यावर सभागृहाची दिशाभूल केल्याचा आरोप केला.

सभागृहाला संबोधित करताना अमित शाह म्हणाले की, मुस्लिम समुदायावर या कायद्याचा प्रभाव पडेल, असे म्हटले जात आहे. पण, विरोधकांनी पहिली तीन पाने वाचली असती, तर त्यांना समजले असते. भारत सरकार राजपत्र अधिसूचना जारी करेल त्यादिवशी हा कायदा लागू होईल, असे त्यात स्पष्टपणे लिहिले आहे. कोणी परदेशात शिक्षणासाठी गेला असेल, तर त्याची मालमत्ता वक्फ घोषित केली जाते. ही काय गंमत आहे का. त्याची जिल्हाधिकाऱ्यांनी पडताळणी करणे आवश्यक आहे. कोणत्याही स्पष्ट प्रक्रियेशिवाय वक्फ मालमत्तांची नोंदणी करता येणार नाही.

आई-वडील, चुलत्याच्या कृपेने बरे चाललेय- अजित पवार

बीड, दि. २ प्रतिनिधी

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित पवार आज बीडच्या दौऱ्यावर आहेत. आज बीडमध्ये कार्यकर्ता मेळावा पार पडला. त्यांनी आज आपल्या पक्षाच्या कार्यकर्त्यांशी संवाद साधताना त्यांना आपल्या स्वागतासाठी कोणतीही शाल, हारतुरे किंवा स्मृतीचिन्ह न आणण्याची विनंती करत गेल्या काही दिवसांमध्ये आपल्या कार्यकर्त्यांच्या कारनाम्यांमुळे अडचणीत आलेल्या नेत्यांवर अप्रत्यक्षपणे भाष्य देखील केलं आहे. आई-बापाच्या व चुलत्याच्या कृपेने खूप चांगलं चाललं आहे, त्यामुळे तुम्ही फक्त हात जोडा काही आणू नका असंही अजित पवार म्हणालेत. त्यांच्या या वक्तव्यामुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं आहे.

अजित पवार पुढे कार्यकर्ता मेळाव्यात बोलताना म्हणाले, शाली आणू नका. हारतुरे आणू नका. मला टोप्या घालू नका. येऊन नुसता मला नमस्कार करा. तो मला प्रेमाचा वाटेल. कारण, जेवढा मोठा हार, तेवढी मला भिती वाटते. आयला काहीतरी कुठेतरी याने मारली... काय मारली ते बघा तुम्ही आणि तो हाराचा बोजा आहे आपल्या मानगुटीवर... स्मृतीचिन्ह काही देऊ नका. कर्म धर्म संयोगाने... आई-बापाच्या कृपेने... चुलत्याच्या कृपेने बरंच चांगलं चाललंय. आमचं. काही देऊ नका... फक्त प्रेम द्या... माझा नमस्कार घ्या, तुमचा नमस्कार द्या.... पायाही पडू नका. मी जाहीरपणे सांगतो, आजचे पुढारी पाया पडण्याच्या लायकीचे नाहीत. ज्याच्या पाया पडता, त्याची हिस्ट्री आठवा... नंतर अरे मी कुणाच्या पाया पडलो असा प्रश्न पडेल. आई-बापाच्या पाया पडा. गुरुंच्या पाया पडा. मला जो गुरु म्हणून शिकवतो त्यांच्या पाया पडा. पूर्वी यशवंतराव चव्हाण, वसंतदादा, वसंतराव नाईक आदी मोठी माणसे होऊन गेली. ही लोकं आभाळाएवढी मोठी माणसे होती. त्यांच्यापुढे नतमस्तक व्हा, असंही अजित पवार म्हणाले.

पडळकरांना मंत्री करा, मला राज्यपाल तरी करा- सदाभाऊ खोतांची नवी मागणी

सांगली, दि. २ प्रतिनिधी

'पृथ्वीराज देशमुख हे आमदार होतील खासदार होतील. गोपीचंद पडळकर हे मंत्री होतील पण मला कुठं तरी राज्यपाल तरी करा. नाही तर आमचं बँड वाल्यासारखं व्हायचं', असं विधान आमदार सदाभाऊ खोत यांनी केले. या विधानानंतर कार्यक्रमात एकच हशा पिकला. काल सांगली जिल्ह्यातील विटा येथे आमदार गोपीचंद पडळकर यांच्या सत्कार सभारंभाचे आयोजन केले होते. यावेळी आमदार सदाभाऊ खोत उपस्थित होते. यावेळी खोत यांनी पडळकर यांचे कौतुक केले, यावेळी त्यांनी मंत्रिपदावरुन टोला लगावला.

सदाभाऊ खोत म्हणाले, गोपीचंद पडळकर यांनी दुष्काळ भागातील शेतकऱ्यांना शेतीसाठी पाणी मिळालं पाहिजे याच्यासाठी संघर्ष केला. गोपीचंद पडळकर हा मंगळसूत्र चोरणारा नाही तर मंगळसूत्राचं रक्षण करणारा आहे. कारण योद्धा रणांगणात हरत नसेल तर त्याला बदनाम करण्याचा प्रयत्न केला जातो.

देवाभाऊ एकदा पडळकर यांना मंत्री केल्याशिवाय थांबणार नाही, तोपर्यंत कोणीही देव पाण्यात ठेवले तरी काहीही होणार नाही.

यावेळी बोलताना सदाभाऊ खोत यांनी मला राज्यपाल तरी करा असं म्हणताच कार्यक्रमात हशा पिकला. पृथ्वीराज देशमुख हे आमदार होतील खासदार होतील. गोपीचंद पडळकर हे मंत्री होतील पण मला कुठं तरी राज्यपाल तरी करा. नाही तर आमचं बँड वाल्यासारखं व्हायचं. बँडवाल्याचं कसं असतं चांगलं गाणं वाजवायला लागलं की शेजारी असणारे सर्व म्हणतात की पुन्हा एकदा होऊन जाऊ दे. तशी आमची अवस्था झाली आहे, सदाभाऊ खोत यांच्या विधानानंतर एकच हशा पिकला.

गोपीचंद पडळकर यांनी आगामी होणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुकीवरही भाष्य केले. गोपीचंद पडळकर म्हणाले, जयंत पाटील अजून तळ्यात -मळ्यात करत आहेत.त्यांचे कुठे जायचे ते अजून ठरत नाही. पण आपल्या विरोधात ताकदीने लढायचे हा जयंत पाटील यांचा अजेंडा पक्का आहे, असा टोलाही गोपीचंद पडळकर यांनी लगावला. जयंत पाटील यांना आता गट, पक्ष विचारत न

महत्त्वाचे

'बौद्धिक संपदा हक्क' विषयावर कार्यशाळा

नाशिक । क्रां.व्ही.एन.नाईक शिक्षण संस्थेच्या कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात वाणिज्य विभागाच्या वतीने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संजय सानप यांच्या अध्यक्षतेखाली 'बौद्धिक संपदा हक्क' या विषयावर कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. नासिक येथील डॉ.एम.एस. गोसावी औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालयातील विभागप्रमुख डॉ. रावसाहेब देवघडे यांनी बौद्धिक संपदा हक्क या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी वाणिज्य विभागप्रमुख प्रोफेसर डॉ.धीरज झाल्टे, डॉ.रुपाली सानप, कार्यशाळेच्या समन्वयक प्रा.नवनीत कौर धडीयाल, प्रा.महेश आव्हाड यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. याप्रसंगी मार्गदर्शन करताना देवघडे म्हणाले की बौद्धिक संपदा हक्क ही एक प्रकारची संपत्ती असून तिच्या माध्यमातून चांगल्या प्रकारे आर्थिक प्रगती करता येत असते,ट्रेडमार्क हा एक बौद्धिक हक्क संपदेचा भाग असून, वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांना चांगल्या प्रकारच्या संधी यातून मिळू शकतात. विद्यार्थ्यांनी आपल्यात एक वेगळेपण जपून नाविन्याचा शोध घेऊन जिज्ञासा वृत्ती ठेवली पाहिजे. तंत्रज्ञानातील बदलांना सध्या कोणीच रोखू शकत नसल्यामुळे बौद्धिक संपदेच्या माध्यमातून यात चांगले यश मिळवता येऊ शकते.आपल्या मार्गदर्शनात देवघडे यांनी पेटंट कायदा १९७० मधील महत्त्वाच्या बाबी समजावून सांगितल्या. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्य डॉ. संजय सानप म्हणाले की बुद्धी ही एक संपत्ती असून, संशोधनात प्रचंड संधी असल्याने विद्यार्थ्यांनी विशिष्ट ध्येय ठेवून आपल्यात नाविन्यता जपावी. सदरच्या कार्यशाळेत एम.कॉम वर्गातील ९० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यशाळेच्या समन्वयक प्रा. नवनीत कौर धडीयाल यांनी केले.सूत्रसंचालन कुणाल बच्छाव या विद्यार्थ्याने केले. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी वाणिज्य शाखेतील प्राध्यापक तसेच शिक्षकेतर कर्मचारी महेंद्र गिते, निंबा महाजन यांनी परिश्रम घेतले.

पु. ना. गाडगीळ कलादालनात 'आम्ही दोघे' प्रस्तुत चित्रप्रदर्शन

नाशिक । संजय श्रीखंडे आणि दीपक देवकर यांच्या कलाकृतींचे 'आम्ही दोघे'



प्रस्तुत चित्रप्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. शुक्रवारी (दि.४) रोजी नाशिकरोडला पु. ना. गाडगीळ कलादालनात या प्रदर्शनाचा प्रारंभ होईल. कलारसिकांना चित्रांचा विनामूल्य आस्वाद घेता येईल. संजय श्रीखंडे वीज निर्मिती क्षेत्रात कार्यरत होते. दीपक देवकर यांनी बँकेत सेवा केली. स्वेच्छानिवृत्ती घेतल्यावर दोघेही आपल्या चित्रकलेच्या छंदात रममाण झाले. त्यांच्या सुंदर कलाकृतींचे प्रदर्शन नाशिकरोडला स्टारझोन मॉलमध्ये पासपोर्ट ऑफिस शेजारी पु. ना. गाडगीळ अँन्ड सन्सच्या कलादालनात आयोजित करण्यात आले आहे. शुक्रवारी दुपारी १ वाजता या सामूहिक चित्रप्रदर्शनाचे उद्घाटन ज्येष्ठ चित्रकार प्रा. दीपक वर्मा यांच्या हस्ते होणार आहे. या प्रदर्शनात संजय श्रीखंडे यांची पेन्सिल माध्यमात चितारलेली वास्तववादी चित्रे बघायला मिळतील. दीपक देवकर यांनी जलरंगात रंगवलेली निसर्गचित्रे, काळ्या शाईने रेखाटलेली स्केचेस व काही अमूर्त चित्रे मांडण्यात येणार आहेत. सुमारे १०० चित्रे कलारसिकांना रविवारपर्यंत सकाळी ११ ते रात्री ८ पर्यंत बघता येतील. नाशिककरांनी प्रदर्शनाला भेट देऊन दोन्ही कलाकारांना प्रोत्साहन द्यावे असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

नाशिकच्या समकीत सुराणाची दमदार अष्टपैलू कामगिरी

नाशिक । महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या

राज्यस्तरीय १९ वर्षांखालील वयोगटातील आमंत्रित क्रिकेट स्पर्धेच्या (एमसीए इन्विटेशन लीग) दोन दिवसीय कसोटीच्या सामन्यात नाशिकने यूनायटेडवर पहिल्या डावात आघाडी घेतली आहे. हा सामना नाशिकच्या हुतात्मा अनंत कान्हेरे मैदानावर, गोल्फ क्लबमध्ये अनिर्णित राहिला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या यूनायटेडने ८१.५ षटकांत सर्वबाद २२७ धावा केल्या. किनशुक भारतीने नाबाद १०० धावा केल्या. नाशिकच्या कर्णधार समकीत सुराणाने ४ बळी घेतली तर कृष्णा केदारने ३ बळी घेतली. उत्तरादाखल, नाशिकने ३ बाद ६ व ६ बाद ७६ अशा कठीण स्थितीत असताना पाचव्या क्रमांकावर फलंदाजी करत कर्णधार समकीत सुराणाने धैर्याने खेळ करत १८ चौकार व १ षट्कारासह नाबाद १११ धावा केल्या. त्याच्या दमदार खेळीमुळे नाशिकने ९ बाद २६७ धावा केल्या आणि पहिल्या डावात आघाडी घेतली. समकीतला व्यंकटेश बेहरे (३९) आणि ज्ञानदीप गवळी (३६) यांची साथ मिळाली. यूनायटेडच्या यश बोरकरने ५ बळी घेतले. दुसऱ्या डावात, यूनायटेडने ५ बाद १०३ धावा केल्या असताना सामना संपुष्टात आला. समकीत सुराणाने दुसऱ्या डावातही ३ बळी घेत आपली अष्टपैलू क्षमता दाखवली.

कृत्रिम बुद्धिमत्ता, शिक्षण यांची सांगड घालणे गरजेचे : फडणीस

ना.ए.सोसायटीचा १०३ वा वर्धापन दिन उत्साहात

नाशिक । कृत्रिम बुद्धिमत्ता आणि शिक्षण यांची सांगड घालून निर्माण होणाऱ्या संधी शोधल्या गेल्या पाहिजे, असे गौरवोद्गार सकाळ माध्यम समुहाचे पुणे येथील मुख्य संपादक सम्राट फडणीस यांनी नाशिक एज्युकेशन सोसायटीच्या १०३ व्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमाप्रसंगी काढले.

याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष प्रा.दिलीप फडके होते. नाशिक एज्युकेशन सोसायटीने नाशिकच्या सांस्कृतिक, राजकीय, सामाजिक, आर्थिक सर्व क्षेत्रात विद्यार्थ्यांची पिढी तयार केली आहे. संस्थेच्या १०३ व्या वर्धापन दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन परशुराम सायखेडकर नाट्यगृहात करण्यात आले होते. प्रमुख अतिथी सम्राट फडणीस यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता हा मुद्दा अधोरेखित करताना गेल्या वीस वर्षात तंत्रज्ञानात झालेला बदल विस्तृतपणे सांगितला. येणाऱ्या काळात कृत्रिम बुद्धिमत्तेबरोबर कृतीयुक्त शिक्षण गरजेचे असणार आहे, असे प्रतिपादन केले. कृतीयुक्त शिक्षणाद्वारे पिढी सक्षम

करण्याचे कार्य फक्त शिक्षकच करू शकतात, ही भूमिका त्यांनी आपल्या भाषणातून मांडली. शिक्षकांनी नैतिक मूल्यांबरोबर आधुनिकतेची कास धरावी, भावनाप्रधान समाजाची निर्मिती करावी, असे आवाहन त्यांनी याप्रसंगी उपस्थित शिक्षकांना केले. आपल्या प्रास्ताविकातून संस्था अध्यक्ष प्रा.दिलीप फडके यांनी संस्थेच्या इतिहासात योगदान देणाऱ्या अनेक गुरुजनांचे देणगीदारांचे ऋण व्यक्त केले. आपल्या भाषणातून संस्थेच्या इतिहासाला उजाळा दिला. तसेच नव्याने येणाऱ्या आधुनिक तंत्रज्ञानामुळे शिक्षकांपुढील आव्हाने यासंदर्भात मत प्रदर्शित केले. याप्रसंगी व्यासपीठावर नाशिक सकाळचे संपादक अभय सुपेकर, संस्थेचे उपाध्यक्ष चंद्रशेखर मोंढे, कार्यवाह राजेंद्र निकम, शिक्षक मंडळ अध्यक्षा नंदा पेटकर, मंडळाचे उपाध्यक्ष राजेंद्र कापसे, सहकार्यवाह शैलेश पाटोळे, उमेश कुलकर्णी, पंढरीनाथ बिरारी, माजी विद्यार्थी सुधीर फडके यांसह कार्यकारी मंडळाचे सरोजिनी तारापूरकर, मैथिली गोखले, रंजना परदेशी, विश्वास बोडके, राजा वर्टी, सचिन महाजन, मोहन रानडे, देवदत्त जोशी आदी सदस्य उपस्थित होते. यावेळी पेठे हायस्कूलचे माजी विद्यार्थी सुधीर फडके यांनी संस्थेला 25 हजार रुपयांचा धनादेश देणगी म्हणून कार्य वाह राजेंद्र निकम यांच्याकडे सुपूर्त केला. कार्यक्रमासाठी उपस्थितांचे स्वागत संस्था उपाध्यक्ष चंद्रशेखर मोंढे यांनी केले. यावेळी प्रमुख अतिथींचा संस्थेच्या वतीने यथोचित सन्मान सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राजक्ता क्षीरसागर यांनी तर संस्था सहकार्यवाह पंढरीनाथ बिरारी यांनी आभार मानले. अतिथींचा परिचय सहकार्यवाह शैलेश पाटोळे यांनी करून दिला. यावेळी मोठ्या संख्येने संस्थेतल्या विविध शाळातील पदाधिकारी, संस्थाफेलो, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वडाळे वणी गावात पाण्याची टंचाई; ग्रामस्थ मेटाकुटीला

वडाळे वणी । वडाळे वणी गावात भीषण पाणीटंचाई असतानाही गेल्या दोन महिन्यांपासून गावचे सरपंच अनुपस्थित असल्याने नागरिक हवालदिल झाले आहेत.

पिण्यासाठी पुरेसे पाणी उपलब्ध नसल्यामुळे ग्रामस्थांना लांबवरून पाणी आणावे लागत आहे. महिलांवर मोठा ताण पडत असून, रोजच्या गरजा भागवताना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

गंभीर बाब म्हणजे गावाचे सरपंच कंडक्टरच्या प्रशिक्षणासाठी बाहेरगावी गेले असून, प्रशासनाकडून गावाकडे दुर्लक्ष होत आहे. गावात ठोस नेतृत्व नसल्याने पाणीटंचाईचा प्रश्न अधिक गंभीर झाला आहे. ग्रामस्थांनी अनेक वेळा स्थानिक प्रशासनाकडे पाठपुरावा केला, मात्र कोणत्याही उपाययोजना झाल्या नाहीत. "आम्हाला पाणीटंचाईचा सामना करताना मोठा त्रास होत आहे. सरपंच गावात नसल्याने आमच्या समस्या ऐकून घेणार तरी कोण?" असा सवाल संतप्त ग्रामस्थांनी केला आहे. ग्रामपंचायत सदस्य सांगतात पाणी आहे मगं गावात पाणी टंचाई का असा, प्रश्न नागरिकांनी उपस्थित केला आहे.

> गावकऱ्यांनी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली असून, प्रशासनाने लवकरात लवकर पाण्याचा प्रश्न सोडवावा, अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. वडाळे वणी गावांमध्ये पुरेसे पाणीसाठा उपलब्ध आहे काही ठिकाणी पाईप लाईन तुटलेली आहे रिपेरिंगचे काम चालू आहे.
> **-भावडु बागुल, ग्रामपंचायत सदस्य**

अध्यात्म, संघर्ष यातून घडत गेले जीवन : मुनशेट्टीवार

नाशिक । बालपणापासून आध्यात्मिक वातावरणात जडणघडण झाली. तसेच काही घटनांमुळे संघर्षही करावा लागला. अशा अध्यात्म व संघर्ष यातून जीवन घडत गेले, असे प्रतिपादन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मुक्तेश्वर मुनशेट्टीवार यांनी केले.

गिरणा गौरव प्रतिष्ठानच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त हुतात्मा स्मारकात आयोजित 'पुस्तकावर

बोलू काही' या उपक्रमात 'चळवळ्या माणूस' या पुस्तकावर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक सोमनाथ साखरे होते. मुनशेट्टीवार पुढे म्हणाले की, संत गाडगेबाबा यांच्या सोबत साफसफाई करण्याचा अनुभव तर दुसऱ्या बाजूला आमच्या गावी घराला लागलेल्या आगीत घर जळाले. त्यातून जीवनाचा संघर्ष सुरू झाला. डॉ.आंबेडकर यांनी बौद्ध धर्म स्वीकारला. लाखो लोकांमध्ये भाषण ऐकण्याचा क्षण आयुष्यात संघर्ष करण्यासाठी प्रेरणादायी ठरला. जनतेचा पाठिंबा असला तरच चळवळी उभारता येतात. विविध चळवळींत सक्रिय सहभाग घेतल्याने 'चळवळ्या माणूस' ही पदवी मिळाली, असेही ते म्हणाले. सुहास टिपरे आणि राजेंद्र देसले या भाग्यवान विजेत्यांना ग्रंथभेट देऊन सन्मानित करण्यात आले. सुरेश पवार यांनी सूत्रसंचालन केले तर दतात्रय कोठावदे यांनी आभार मानले. दरम्यान येत्या शुक्रवारी (दि.४) कवी सुभाष पवार 'धुमसते सूर' या पुस्तकावर ऐसपैस गप्पा करणार आहेत.

रोमँटिक सिनेमा 'सजना' लवकरच येत आहे प्रेक्षकांच्या भेटीला!

नाशिक । सुप्रसिद्ध चित्रकार शशिकांत धोत्रें, ज्यांच्या मोहक आणि जीवंत वाटणा-या चित्रांनी राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील सामान्य लोकांपासून, प्रतिष्ठीत आणि ख्यातनाम लोकांना मंत्रमुग्ध केलेलं आहे त्यांचं मराठी चित्रपटसृष्टीत पदार्पण झालं आहे. शशिकांत धोत्रेंचा पहिलाच रोमँटिक सिनेमा 'सजना' लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे.

'सजना' चित्रपटाचं अतिशय आकर्षक आणि धोत्रेंच्या चित्रांसारखंच मोहक आणि मंत्रमुग्ध करणारं पोस्टर आणि टिझर प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. चित्रपटसृष्टीने नेहमीच विविध रोमँटीक कथांनी प्रेक्षकांना भुरळ पाडली आहे विशेषतः तरूण-तरुणींच्या हृदयावर अधिराज्य हे रोमँटीक कथांनीच गाजवलं आहे. सिनेसृष्टीच्या इतिहासात असे अनेक चित्रपट आहेत ज्यांनी वेगवेगळ्या प्रकारच्या कथांसह प्रयोग केले आहेत, परंतू प्रेमकथा नेहमीच चित्रपटांचा आत्मा राहिल्या आहेत. सर्वच वयोगटातील प्रेक्षकांना, संपुर्ण फॅमिलीला आकर्षित करणारा प्रकार म्हणून रोमँटीक सिनेमाकडे पाहिलं जातं. 'सजना' सिनेमाच्या पोस्टरवर एकमेकांच्या प्रेमात आकंठ बुडालेले

दोन प्रेमी आपण पाहू शकतो जे पाण्यात रोमँटिक पोज मधे आहेत. धोत्रेंच्या चित्रांसारखंच हे पोस्टरसुद्धा एक सुंदर पेंटिंगच आहे. जे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे चित्रकार शशिकांत धोत्रे यांचे जिवलग मित्र प्रमोद कुर्लेकर यांनी तयार केले आहे. ज्यात दोन प्रेमी पाण्यांवर तरंगत आहे, आजूबाजूला असलेल्या संपूर्ण जगाचा जणू त्यांना विसर पडलाय; "सजना" सिनेमाच्या टिझर मध्येही ह्याच जोडप्याला आपण रोमँटिक संवाद साधताना पाहू शकतो. विशेष म्हणजे टीझर मधील प्रत्येक शॉट लक्षवेधी असून पेंटींग प्रमाणेच बारकाईने चितारलेले वाटतात, तरुण फ्रेश जोडी या सिनेमात मुख्य भूमिकेत असणार आहे त्यांचा चेहरा टिझर मध्ये अद्याप पूर्णपणे उघड केला गेला नाही आहे. टिझर मध्ये सुंदर पेंटीग सारख्या व्हीजुअल्स सोबतच कर्णमधूर असं ओंकारस्वरूपचं संगीत आणि सोनू निगमचा आवाज आहे. ग्रामीण महाराष्ट्राच्या पार्श्वभूमीवर आधारित ही प्रेमकथा असून गावातील सुंदर दृश्य आणखी शोभा वाढवते. टिझरच्या शेवटी प्रेमापोटी एकमेकांमध्ये गुंतलेल्या जोडप्याला कोणते परिणाम भोगावे लागतात याबद्दल हि छोटी झलक पहायला मिळते. त्यामुळे नक्की चित्रपटाची कथा काय असणार आहे याची सर्वांनाच उत्सुकता आहे. 'सजना' सिनेमा २३ मे २०२५ ला चित्रपटगृहात प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. त्यांनी काढलेली चित्रं आज देश-विदेशात लाखोंच्या संख्येनं रसिकांची दाद मिळवतायत, अशाच प्रकारे त्यांचा हा पहिला मराठी सिनेमा सुद्धा प्रेक्षकांच्या पसंतीस उतरणार आहे. ॲक्शन चित्रपटांच्या गर्दीत नवोदित प्रेमाच्या कथा पाहणे नेहमीच वेगळा अणि सुखद अनुभव देऊन जातात, त्यामुळे सुमधूर संगीतानी सजलेला रोमँटीक 'सजना' चित्रपट पाहण्यासाठी प्रेक्षक नक्कीच उत्सुक होतील.

विशेष बालकांच्या आविष्काराने उपस्थित सर्वांना घेतले जिंकून!

नाशिक । निरागस विशेष बालके अधिक संवेदनशील असतात. अशा अनेक बालकांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. मुलांचा आत्मविश्वास पाहून सर्वजण आश्चर्यचकित झाले. त्यांच्या विविध आविष्काराने सर्वांना जिंकून घेतले. उत्कृष्ट सादरीकरण केलेल्या मुलांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

रायझिंग चाईल्ड डेव्हलपमेंट अँड लर्निंग सेंटरचा वार्षिक स्नेहसोहळा कुसुमाग्रज स्मारकात रंगला. विशाखा सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून आ. सीमा हिरे, मॉडेल लोविना थेवर, सामाजिक कार्यकर्त्या रश्मी हिरे आदी मान्यवर उपस्थित होते. संस्थापिका व प्रमुख मार्गदर्शिका मोनिका गोडबोले - यशोद यांनी प्रास्ताविक केले. दरवर्षीप्रमाणे यंदाही स्थापनादिनाच्या निमित्ताने मुलांच्या कलागुणांना वाव देणाऱ्या संस्थेच्या वाटचालीचा आढावा त्यांनी घेतला. समाजात अशा मार्गदर्शनाची गरज वाढते आहे. आमच्या संस्थेत दाखल होणाऱ्या मुलांना योगा व आधुनिक उपचार तंत्राचा समन्वय साधून प्रशिक्षण दिले जाते. त्यामुळे त्यांचा झपाट्याने सकारात्मक विकास होतो असे त्यांनी नमूद केले. त्याचा प्रत्यय सांस्कृतिक कार्यक्रमात आला. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने प्रारंभ झाला. विश्वस्त मिलिंद यशोद यांनी सर्वांचे स्वागत केले. प्रमुख पाहुण्यांनी कौतुक करुन शुभेच्छा दिल्या. विविध नृत्यात सगळी मुले-मुली आत्मविश्वासाने सहभागी झाली. कोळीगीत व करूया कल्ला या गीतांवर सर्वांची पावले थिरकली. अभिजित कन्नडकर यांनी जादूचे प्रयोग व छोट्या खेळांमध्ये सर्वांना सहभागी करून घेतले. यावेळी अनुष्का यशोद, लीना काळे, मयूर कारंडे यांनी उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

विविध गुणदर्शनाने उपस्थित झाले थक्क!

मुलांनी उत्साहाने विविध गुणदर्शनाचा सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. गुढीपाडवा, मराठी भाषेचे महत्व या विषयांवर भाषण केले. कविता, म्हणी, रामरक्षा स्तोत्र म्हंटले. वेगवेगळ्या उपक्रमात व स्पर्धांमध्ये अनेक मुलांनी यश मिळवले. त्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मानपदक, प्रमाणपत्र देण्यात आले. यावेळी त्यांच्या निरागस चेहऱ्यावरील आनंद ओसंडून वाहात होता. समाधानी प्रतिक्रिया व्यक्त करून उपस्थित पालकांनी, निमंत्रित मान्यवरांनी संस्थेला धन्यवाद दिले.

आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या फार्मास्युटिकल मेडिसिनसंदर्भात विविध संस्थासमवेत सामंजस्य करार

नाशिक । महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने फार्मास्युटिकल मेडिसिन क्षेत्रात विविध संशोधन व कौशल्य विकास उपक्रमांकरीता विविध संस्थांसमवेत नुकताच सामंजस्य करार करण्यात आले.

या सामंजस्य करार आदान-प्रदान समारंभास विद्यापीठाच्या कुलगुरु माधुरी कानिटकर, प्रति-कुलगुरु डॉ. मिलींद निकुंभ, कुलसचिव डॉ. राजेंद्र बंगाळ, अधिष्ठाता डॉ. मृणाल पाटील, प्रभारी अधिष्ठाता डॉ. स्वाती जाधव उपस्थित होते. यावेळी आय.सी.एम.आर. च्या संचालीका डॉ. गीतांजली सचदेव, संशोधक डॉ. राहुल गजभिये, एम.आय.टी. ऑफ बायोइंजिनिअरिंगचे प्रा. विनायक घैसास, अधिष्ठाता डॉ. रेणू व्यास, टॉक्सइंडियाचे संचालक डॉ. वसंत नरके, सी.ई.ओ. श्री. देवेन नरके, रॅप अनालिटल रिसर्च प्रा.लि.च्या संचालिका हर्षदा पवार व लर्नकोचच्या संचालीका श्रीमती दिपाली तिवारी उपस्थित होत्या. यावेळी कुलगुरु माधुरी कानिटकर यांनी

सांगितले की, भविष्यात या क्षेत्रात मोठा वाव आहे. या अनुषंगाने विद्यार्थ्यांमध्ये संशोधन व कौशल्य आदी उपक्रमांना अधिक चालना मिळवण्यासाठी विद्यापीठाने पुढाकार घेतला आहे. या सामंजस्य करारांच्या माध्यमार्फत सिकलसेल, कुष्ठरोग, सर्पदंश या सारख्या संशोधनांवर काम करणे शक्य होणार आहे. ॲनिमल हाऊस, प्रिक्लिनिकल सुविधा व प्रगत उपकरणे यांचा समावेश आहे. नवीन फार्माकॉलॉजिकल तपासण्यांसाठी प्राण्यांचे मॉडेल, प्राण्यांचा ट्रान्सजेनिक वापर करुन अधिक सुरक्षित औषध शास्त्र विकसित करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. प्रति-कुलगुरु डॉ. मिलींद निकुंभ यांनी सांगितले की, या सामंजस्य कराराअंतर्गत विद्यापीठ व करार झालेल्या संस्थांमार्फत विविध शैक्षणिक, प्रशिक्षण, अभ्यास दौरे, समर इंटर्नशिप कार्यक्रम यासारखे उपक्रम सर्वच संस्थांमार्फत राबविले जाणार आहे. आय.सी.एम.आर. च्या समवेत झालेल्या कराराअंतर्गत आय.सी.एम.आर. च्या वणी येथील केंद्रामार्फत सिकलसेल ॲनिमिया, कुष्ठरोग, सर्पदंश तसेच मुंबई येथील (NIRRCH) केंद्रामार्फत ॲनिमल हाउस फॅसिलिटी, प्रीक्लिनिकल स्टडिज, ॲडव्हान्स ॲनेलेटीकल इन्स्ट्रूमेंटेशन या विषयांवर संशोधन आणि कौशल्य उपक्रम राबविण्यात येणार आहे., एम.आय.टी. स्कुल ऑफ बायोइंजिनिअरिंग कडून सेल कल्चर, फ्लो सायटोमेट्री, बायोइन्फॉरमॅटिक्स आणि ॲनालेटिकल सुविधा, कौशल्य वाढीसाठी विद्यार्थ्यांची देवाणघेवाण, आदी उपक्रम राबविले जाणार आहे. टॉक्सइंडिया कडून प्रीक्लिनिकल फार्माकोलॉजी अभ्यास, ट्रान्सजेनिक प्राणी अभ्यास, नॉक-आउट माईस, ट्रान्सजेनिक स्टडिज आणि इम्युनोडेफिशिएंट इत्यादी विषयावर उपक्रम राबविण्यात येणार आहे., रॅप ॲनालिटल रिसर्च प्रा.लि. कडून संशोधन क्षेत्र, प्रगत विश्लेषणात्मक उपकरणे आदी उपक्रम राबविले जाणार आहे. याप्रसंगी प्रा. स्वाती जाधव यांनी या करारांबाबतची माहिती व त्याद्वारे होणारे विविध उपक्रम यांची माहिती दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रशांत शिवगुंडे यांनी केले तसेच आभार प्रदर्शन डॉ. महेंद्र पटाईत यांनी केले.

याप्रसंगी उपकुलसचिव श्री. एन.व्ही. कळसकर, ब्रिग. सुबोध मुंळगुंद, डॉ. भारती डॉ. प्रदिप आवळे, डॉ. गितांजली कार्ले, डॉ. स्वप्नील तोरणे, डॉ. अनुश्री नेटके, श्री. राजेंद्र शहाणे, श्री. संदीप राठोड, डॉ. श्वेता तेलंग, डॉ. सानिया भालेराव, डॉ. वैभव आहेर, आदी अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

महत्त्वाचे

विना मोबदला सेवा देणाऱ्या अंगणवाडी सेविकेस सेवेत घेण्यास अधिकाऱ्यांची टाळाटाळ

नाशिक । त्रंबक तालुक्यातील देवडोंगरा या गावातील अंगणवाडी मध्ये तब्बल दोन वर्ष विना मोबदला सेवा देणाऱ्या दुर्गा वामन पवार या अंगणवाडी सेविकेस त्रंबक तालुक्यातील हरसुल बालविकास प्रकल्प अधिकाऱ्यांनी मदतनीस म्हणून घेण्यास टाळाटाळ चालविली आहे.याप्रकरणी दुर्गा पवार यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी अशीमा मित्तल यांच्याकडे तक्रार करून दाद मागितली आहे.

दुर्गा पवार यांनी दिलेल्या अर्जात त्रंबक तालुक्यातील हरसुल येथे देवडोंगरा या ठिकाणी असलेल्या अंगणवाडी मध्ये मदतनीस म्हणून काम करण्यासाठी दि. ११ फेब्रुवारी २०२५ रोजी अर्ज दाखल केला आहे. परंतु प्रकल्प अधिकाऱ्यांकडून नियमत न बसणाऱ्या अन्य उमेदवाराचा अर्ज गैरमार्गाने यादीमध्ये समाविष्ट करण्यात आल्याचा आरोप दुर्गा पवार यांनी केला आहे. येथील प्रकल्प अधिकारी यांनी दोन वर्ष मोफत दिलेल्या सेवेचा कुठलाही विचार न करता आपला अर्ज नाकारल्याचे अर्जात म्हटले आहे. त्यामुळे हरसुल प्रकल्प अधिकारी यांची विरुद्ध कारवाई न्याय मिळावा, अशी मागणी दुर्गा वामन पवार यांनी केली आहे.

शहर जिल्ह्यात ढगाळ वातावरण

नाशिक । गेल्या तीन दिवसांपासून नाशिक शहरासह जिल्ह्यात ढगाळ वातावरण असून, नागरिकांना एकाच वेळेस उष्ण आणि शीत वातावरणाची अनुभूती आली. काही ठिकाणी सोसाट्याचा वारा सुटून पावसाच्या सरीही कोसळल्या. नाशिक शहरामध्ये मंगळवारी आणि बुधवारी पूर्ण दिवस ढगाळ वातावरण होते. त्यातच संध्याकाळी सोसाट्याचा वारा सुटल्याने वादळसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. सर्वत्र धुळीचे साम्राज्य पसरले होते. वेगाने वारे वाहत असल्याने अनेज झाडांच्या फांद्या तुटून पडल्या. सायंकाळी ४ वाजेपासून शहरात अनेक ठिकाणी पावसाच्या पाण्याचे टपोरे थेंब पडले. काही ठिकाणी पावसाच्या हलक्या सरीही कोसळल्या. संपूर्ण शहरात पावसाळ्याचे चित्र निर्माण झाले होते. जिल्ह्यात काही परिसरात, वाडी-वस्त्यांवर जोरदार पाऊस झाल्याचे वृत्त आहे. काही ठिकाणी तर गाराही पडल्या. वेधशाळेने अवकाळ्या दिवसाचा तसेच वादळाचा अंदाजही वर्तविला होता. ढगाळ वातावरणाची पूर्वसूचनाही वेधशाळेने दिली होती. बुधवारी सायंकाळी ढगांचा गडगडाटही होत होता. विजाही कडाडत होत्या.

मुक्त विद्यापीठात रोपवाटिका प्रशिक्षण शिबीर संपन्न

नाशिक । यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील कृषी विज्ञान केंद्रातर्फे केंद्र

शासनाच्या आर्या प्रकल्पांतर्गत पाच दिवसीय निवासी रोपवाटिका प्रशिक्षण संपन्न झाले. त्यात नाशिक जिल्ह्यातील २० युवकांनी सहभाग घेतला. विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली हे प्रशिक्षण शिबीर झाले. त्यात या प्रशिक्षणार्थींना आधुनिक भाजीपाला फळझाडे व फुलझाडे रोपवाटिके संदर्भात मार्गदर्शन करून प्रशिक्षण देण्यात आले. कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रभारी प्रमुख श्री. राजाराम पाटील यांनी प्रशिक्षण समारोपप्रसंगी प्रमुख मार्गदर्शन केले. उद्यानविद्या विषय विशेषज्ञ श्री. हेमराज राजपूत यांनी प्रशिक्षणाचे समन्वयन व संयोजन केले. जातिवंत व निरोगी रोपे कलमे पुरवठा करणाऱ्या आधुनिक रोपवाटिकांसाठी अर्धकुशल मजुरांची व कुशल मनुष्यबळाची गरज भासते. ही गरज ओळखून गेल्या वीस वर्षापासून विद्यापीठाच्या कृषी विज्ञान केंद्राच्या वतीने नियमितपणे सुशिक्षित बेरोजगार युवकांना आधुनिक रोपवाटिकेचे प्रशिक्षण दिले जाते. सध्या भाजीपालावर उद्भवणाऱ्या मर रोगाच्या नियंत्रणासाठी मोठ्या प्रमाणात भाजीपाला कलम रोपांची मागणी वाढत आहे. त्यानुसार भाजीपाला फळे व फुल झाडांच्या कलमांचे तसेच रोपवाटिका उभारणीसाठी लागणाऱ्या आधुनिक अभिवृद्धीगृहे, सिंचन पद्धत, कीड रोग व्यवस्थापन, विक्री व्यवस्थापन, शासकीय योजना व प्रमाणीकरण याविषयी उद्यानविद्या विषय विशेषज्ञ हेमराज राजपूत यांनी मार्गदर्शन केले. प्रशिक्षणार्थींसाठी पपया नर्सरी (शोभिवंत झाडे), सह्याद्री फार्म (टिशू कल्चर लॅब) तसेच दिंडोरी येथील सानप व बालाजी नर्सरी येथे भेटीचे व प्रात्यक्षिकाचे आयोजन करण्यात आले. प्रशिक्षण समारोप प्रसंगी प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र देण्यात आले.

अरुण रोडे यांचे निधन

इंदिरानगर । येथील सिद्धी क्लासिक अपार्टमेंट

मधील रहिवासी व महिला, बालकल्याण सेवानिवृत्त विभाग अधिकारी अरुण नरहर रोडे (वय ८७) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुलं, सुना, एक मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ते औद्योगिक व्यवस्थापक राजेश रोडे यांचे वडील होत.

अखेर पुणेगाव कालव्याचे ८ कोटींचे बिल लाटण्यात अधिकारी यशस्वी!

न झालेले कामाचे बिल अदा : शासनाची फसवणूक

नाशिक । सिंचन विभागातील पुणेगाव कालवा उपविभागा अंतर्गत डाव्या कालव्याचे काम अपूर्ण असताना १२ कोटींचे बोगस बिल लाटण्याच्या गंभीर प्रकाराला वाचा फुटल्या नंतर सुमारे ८ कोटी रुपयांचे बोगस बिल लाटण्यात या विभागातील अधिकारी यशस्वी झाले आहेत.शासनाच्या डोळ्यात धुळफेक करत मंजूर केलेले या बिलाची तसेच कामांची देखील चौकशी करण्याची मागणी केली जात आहे.

सिंचन विभागातील मार्च एण्डच्या नावाखाली अनेक गैरप्रकार होत असल्याचे यापूर्वी अनेकदा उघड झाले आहे.याच विभागातील अनेक भ्रष्ट अधिकाऱ्यांनी गैरमार्गाने शासनाची फसवणूक करीत कोट्यवधी रुपये घशात घातले आहेत. त्याची चर्चा संपूर्ण महाराष्ट्रात झाली आहे. अशातच पुणे गाव कालवा उपविभागा अंतर्गत डाव्या कालव्याचे काम पूर्ण न करता तब्बल १२ कोटी रुपयांचे बोगस बील लाटण्याचा प्रकार घडत असल्याचे निदर्शनास येताच याबाबत थेट मुख्यमंत्र्यांकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे. या तक्रारीची एक प्रत माहितीसाठी मुख्य अभियंता प्रकाश मिसाळ यांना देखील देण्यात आली होती. परंतु इतका मोठा गंभीर प्रकार असताना मिसळ यांनी तक्रारीची दखल न घेता अधिकाऱ्यांच्या गैरकामात अप्रत्यक्ष सहभाग नोंदवल्याचे दिसून येत आहे. ३१ मार्चच्या अलीकडे पलीकडे सुट्ट्या लागून आल्याने सिंचन विभागातील स्थानिक अधिकार्‍यांनी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची दिशाभूल करीत बोगस बिलाचा प्रस्ताव सादर केला. हे बिल मंजूर करून घेण्यासाठी युद्ध पातळीवर प्रयत्न करण्यात आले.या बिलाच्या संदर्भात पुणेगाव शाखेच्या अधिकाऱ्यांची भूमिका संशयास्पद असून कालव्याच्या कामात मोठा भ्रष्टाचार झाल्याची तक्रारीत म्हटले आहे.या कालव्याचे काम या विभागाचे कार्यकारी अभियंता मनोज कुमार ढोकचौळे, उपविभागी अभियंता आणि कंत्रांटदारानी संगणमत करत क्षेत्रीय कामकाज न करता केवळ स्वतःचे हित साधण्यासाठी ३१ मार्चच्या आत १२ कोटी रुपयांचे बोगस बिल महामंडळाला सादर केले. यामध्ये

> याप्रकरणी नांदूर मध्यमेश्वर सिंचन विभागाचे कार्यकारी अभियंता मनोजकुमार ढोकचौळे यांना विचारणा केली असता त्यांनी कुठलीही प्रतिक्रिया दिली नाही.

लेखा शाखेतील वाल्मीक खरे नावाच्या कर्मचाऱ्यांची भूमिका देखील संशयास्पद असल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

पुणे गाव धरणाच्या डाव्या कालव्या संदर्भात अनेक तक्रारी असताना कामाची पाहणी केल्याशिवाय हे बिल आता करण्यात येऊ नये यासाठी केलेल्या तक्रारीकडे शासकीय अधिकाऱ्यांनी सपशेल दुर्लक्ष करीत स्वतःचे उखळ पांढरे करून घेतले आहे. हे बिल दाखल झाल्याच्या दिवसापासूनच मोठा गाजावाजा झाल्याने १२ कोटींपैकी ८ कोटी रुपयांचे बिल पास करून घेतल्याचे लेखा शाखेतील कर्मचारी वाल्मीक खरे यांनी सांगितले. हा सर्वच प्रकार अतिशय गंभीर आणि संशयास्पद असून अधिकाऱ्यांनी प्रत्यक्षात झालेल्या कामाचा तपशील न घेताच हे बिल अदा करण्यात आले आहे. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी तक्रारदारांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.

नाशिकच्या विजन हॉस्पिस्टलमध्ये पहिली रेनल डिनरव्हेशन प्रक्रिया यशस्वी

डॉ. विनोद विजन, डॉ. विक्रांत विजन यांची कामगिरी

नाशिक । हायपरटेंशन या आजाराच्या व्यवस्थापनात आधुनिकता आणताना डॉ.विनोद विजन आणि डॉ.विक्रांत विजन यांनी यशस्वी कामगिरीची नोंद केली आहे. कॉलेजरोडवरील विजन हॉस्पिटलमधील कॅथलॅबमध्ये उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील पहिली यशस्वी रेनल डिनरव्हेशन प्रक्रिया (आरडीएन) यशस्वीरित्या केली आहे.

आरडीएन अर्थात हायपरटेंशन रेनल डिनरव्हेशन ही प्रक्रिया अमुलाग्र बदल घडविणारी क्रांतीकारी अशी प्रक्रिया आहे. याअंतर्गत उच्चस्तरावरील हायपरटेंशनच्या रुग्णांवर एकाच वेळी थेरेपी देतांना यशस्वी उपचार केले जातात. अशा रुग्णांमध्ये औषधोपचार करुनही रक्तदाब अनियंत्रित राहातो, त्यांच्यासाठी ही प्रक्रिया जीवदान देणारी आहे. हायपरटेंशन हा लवकर लक्षात न येणारा परंतु जीवावर बेतेल इतका धोकादायक आजार असून, यामुळे पॅरालिसीस, हार्टअटॅक, हृदय किंवा किडनी निकामी होणे किंवा दृष्टी जाण्यासाठी कारणीभूत ठरू शकतो.

अत्याधुनिक स्वरुपाची आरडीएन ही प्रक्रिया अद्ययावत स्वरुपाच्या कॅथलॅबमध्ये निष्णात हृदयविकार तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडली जाते. या प्रक्रियेमुळे अमुलाग्र व शाश्वत स्वरुपात रक्तदाबावर अनेक वर्षांसाठी नियंत्रण मिळविता येऊ शकते. व औषधांवरील अवलंबत्व कमी होऊन रुग्णांचे जीवनमान सुधरविण्यास मदत होते. स्पायरल कॅथेटर हे रेनल आर्टरीज व त्याच्या मुख्य शाखांमध्ये एआय नियंत्रित रेडिओ फ्रिक्वेन्सीच्या सहाय्याने दाखल केल्या जातात. व या भागातील संवेदनशील धमण्या काढून टाकल्या जातात. जागतिक स्तरावर २५ हजारपेक्षा जास्त रुग्णांवर ही प्रक्रिया पार पाडलेली आहे. तर विजन हॉस्पिटलमधील रुग्णासह भारतामध्ये एकूण ८६ रुग्णांवर ही प्रक्रिया पार पाडली आहे.

विजन घडवेल भविष्य!

सध्याच्या पस्थितीत आरडीएन ही प्रक्रिया उच्च स्तरावरील हायपरटेंशनसाठी सुचविली जाते. या प्रक्रियेत युवा रुग्णांनादेखील कशा प्रकारे फायदा पोहचविता येऊ शकतो, यासंदर्भात जागतिक स्तरावर अभ्यास सुरु आहे. या संशोधनाला यश आल्यास सर्व प्रकारच्या हायपरटेंशनवर कायमस्वरुपी उपचार पुरविताना औषधांवरील अवलंबत्व संपुष्टात आणण्यास सहायता करणार आहे. या माध्यमातून रुग्णांचे भवितव्य हायपरटेंशनपासून मुक्त करत तणावमुक्ती जीवन जगण्यासाठी प्रोत्साहन मिळणार आहे. विजन हॉस्पिटलमध्ये हा मैलाचा दगड गाठताना भविष्यातही अशा नाविन्यपूर्ण उपचार पद्धती रुग्णांसाठी अवगत करण्याची ग्वाही दिली आहे. हृदयविकारावरील उपचाराच्या शाखेत नाशिक विभागात सर्वोत्कृष्ट आरोग्य सेवा देताना रुग्णांना दिलासा देण्याचे काम हॉस्पिटलतर्फे सातत्याने केले जाणार आहे.

नाशिक शहरात 'पोलीस आयुक्त कार्यालय प्रत्यक्ष पाहणी' उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

नाशिक । पोलीस आयुक्त संदिप कर्णिक यांच्या संकल्पनेतून शहरात पोलीस प्रशासन अधिक लोकाभिमुख आणि उत्तरदायी करण्याच्या दृष्टिकोनातून नागरीकांसाठी 'पोलीस आयुक्त कार्यालय प्रत्यक्ष पाहणी' हा नाविन्यपूर्ण उपक्रम सुरु करण्यात आला आहे.

या उपक्रमाअंतर्गत दर मंगळवारी नागरीकांना पोलीस आयुक्तालयातील विविध विभागांच्या कार्यपद्धतीची माहिती मिळण्याची संधी दिली जाते.दि ०१ एप्रिल रोजी, या उपक्रमांतर्गत सुमारे ५० ते ५५ तरुण-तरुणींनी पोलीस आयुक्त कार्यालयाला भेट दिली. या भेटीदरम्यान, त्यांना गुन्हेशाखा, विशेष शाखा, आर्थिक गुन्हे शाखा, चारित्र व पासपोर्ट पडताळणी शाखा, नियंत्रण कक्ष, परदेशी नागरिक नोंदणी शाखा, परवाना शाखा, तांत्रिक विश्लेषण शाखा, आस्थापना व प्रशासन शाखा, डायल ११२, कुंभमेळा सेल इत्यादी शाखांच्या कार्यपद्धतीची सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच जलद प्रतिसाद पथकाच्या विविध शस्त्रास्त्रांबाबत, संरजाम आणि बुलेटप्रूफ वाहनांविषयी माहिती देण्यात आली. कार्यक्रमाच्या शेवटी पोलीस आयुक्त संदिप कर्णिक आणि नाशिक महानगरपालिकेच्या आयुक्त श्रीमती मनिषा खत्री यांनी उपस्थित तरुण-तरुणींशी संवाद साधला. त्यांनी नागरीकांनी पोलीस प्रशासनाशी सहकार्य करून माहितीपूर्ण सहभाग घ्यावा आणि आगामी कुंभमेळ्यात सक्रिय भूमिका पार पाडावी, असे आवाहन केले. या उपक्रमात एमव्हीपी. आणि आयएमआरटी. संस्थेचे प्राध्यापक राहुल ठाकरे, प्रा.हर्षल देशमुख, प्रा. श्रीमती राजश्री वडघुळे यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. पुढील 'पोलीस आयुक्त कार्यालय प्रत्यक्ष पाहणी' उपक्रम दिनांक ०८ एप्रिल २०२५ रोजी दुपारी १२ वाजता होणार आहे. नागरीकांनी आणि विद्यार्थ्यांनी पोलीस आयुक्तालयाच्या स्वागत कक्षात उपस्थित राहून या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन पोलीस आयुक्तांनी केले आहे.

ब्रेन स्ट्रोकमुळे कोमात गेलेल्या निकिताला मुख्यमंत्री सहाय्यता मदतीने मिळाले नवजीवन

नाशिक । म्हसरूळ येथील ३० वर्षीय निकिता पंकज पाटोळे यांना अचानक ब्रेन स्ट्रोक झाल्याने त्या कोमामध्ये गेल्या होत्या. घरची हलाखीची आर्थिक परिस्थिती आणि उपचारासाठी लागणारा प्रचंड खर्च यामुळे पती पंकज पाटोळे यांनी वडिलोपार्जित शेतजमीन विकण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, एका सामाजिक कार्यकर्त्याच्या सल्ल्याने त्यांनी मुख्यमंत्री सहाय्यता निधीकडे धाव घेतली. त्यांना मदत मिळाली आणि त्या वाचल्या.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशाने आणि कक्षप्रमुख रामेश्वर नाईक यांच्या तत्परतेतून मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून अवघ्या ४८ तासांत रूग्णाला मदत मिळाली. त्यातून निकितावर उपचार सुरू झाले आणि तब्बल २९ दिवस कोमात असलेल्या निकिताला शुद्धीवर येऊन आपल्या नवजात मुलीला जवळ घेण्याचा भावनिक क्षण अनुभवता आला. निकिता आणि पंकज यांना सहा वर्षांचा मुलगा असून, यंदा ७ फेब्रुवारी रोजी त्यांच्या घरी एका गोंडस मुलीने जन्म घेतला. घरात आनंदाचे वातावरण होते. मात्र, १३ फेब्रुवारीच्या रात्री निकिताला अचानक उलट्या आणि जुलाबाचा त्रास सुरू झाला. काही क्षणांतच त्या बेशुद्ध पडल्या. गावातील स्थानिक रुग्णालयात प्राथमिक उपचारानंतर त्यांना पुढील उपचारासाठी नाशिक येथील नारायणी हेल्थकेअर प्रायव्हेट लिमिटेड रुग्णालयात दाखल करण्यात आले. तपासणीत निकिताला ब्रेन स्ट्रोक झाल्याचे निदान झाले. मेंदूच्या डाव्या बाजूस रक्तस्त्राव आणि सूज आल्याने त्या कोमात गेल्या. डॉक्टरांनी पुढील उपचारासाठी अंदाजे ८ ते १० लाख रुपयांचा खर्च अपेक्षित असल्याचे सांगितले.

शेतजमीन विकण्याचा निर्णय

पाटोळे कुटुंबाकडे तीन लाख रुपयांचा आरोग्य विमा होता. मात्र, खर्चाची रक्कम त्यापेक्षा कितीतरी जास्त असल्याने आणि हातात रोख रक्कम नसल्याने पंकज आणि त्यांचे भाऊ योगेश जाधव यांनी वडिलोपार्जित शेतजमीन विकण्यासाठी ग्राहक शोधण्यास सुरुवात केली. या कठीण प्रसंगी त्यांना गावातील एका सामाजिक कार्यकर्त्याने मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाची माहिती दिली. पंकज यांनी तात्काळ कक्ष प्रमुख श्री रामेश्वर नाईक यांची भेट घेतली. पुढे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशाने आणि कक्ष प्रमुखांच्या प्रयत्नांतून अवघ्या ४८ तासांत मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून एक लाख रुपयांची आर्थिक मदत मंजूर करण्यात आली. यासोबतच लिला हिरा सेवाभावी संस्था आणि सिद्धीविनायक सेवाभावी संस्थेकडून औषधांसाठी आर्थिक मदत मिळवून दिली. वेळेत मिळालेल्या मदतीमुळे संबंधित रुग्णालयाला पुढील उपचाराची खात्री मिळाली आणि निकितावर जलदगतीने उपचार सुरू झाले.

बाळाला मिळाली मायेची ऊब

उपचारांना यश आल्याने २९ दिवस कोमात असलेली निकिता अखेर शुद्धीवर आली. दोन दिवसांपूर्वीच तिला रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाला. कोमातून बाहेर पडलेल्या निकिताने आपल्या मुलीला प्रथमच जवळ घेतले, तेव्हा पंकज आणि माहेरच्या मंडळींच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक आणि मदत करणाऱ्या सर्व डॉक्टर व अधिकाऱ्यांचे आम्ही मनापासून आभारी आहोत, त्यांच्यामुळेच आमच्या कुटुंबाला आपली लेक, पत्नी आणि आई परत मिळाली अशी भावना पंकज पाटोळे व कुटूंबियांनी व्यक्त केली.

बिहारमध्ये एनडीएचे कप्तान नितीश कुमारच!

इंडिया कॉलिंग
डॉ. सुकृत खांडेकर
sukritforyou@gmail.com

बिहार विधानसभेच्या निवडणुकीला अजून सहा-सात महिने बाकी आहेत, पण आतापासूनच भाजपा आणि जनता दल (युनायटेड)प्रणीत एनडीए विरुद्ध राष्ट्रीय जनता दल, काँग्रेस पक्षांनी दंड थोपटायला सुरुवात केली आहे.

येत्या विधानसभा निवडणुकीत भाजपा आणि नितीश कुमार यांची जनता दल (यु) यांची युती टिकेल का, इथपासून पुन्हा एनडीएला सत्ता मिळाली तर बिहारचे मुख्यमंत्रीपद भाजपा नितीश कुमार यांना देईल का, अशा चर्चांना उधाण आले आहे.

सध्याच्या वातावरणात आणि निवडणूक लढविण्यासाठी भाजपाला नितीश कुमार यांची गरज आहे आणि नितीश कुमार यांनाही भाजपाच आपल्याला पुन्हा मुख्यमंत्रीपदावर बसवेल अशी आशा वाटत आहे. भाजपाने पुन्हा एकदा लालूप्रसाद यादव यांच्यावर जंगल राज, गुंडा राज असे जोरदार हल्ले चढवायला सुरुवात केली आहे.

जनता दल युनायटेडचे सर्वेसर्वा नितीश कुमार हे राज्याचे गेली वीस वर्षे मुख्यमंत्री असून भाजपा व लोक जनशक्ती पार्टी त्यांचे समर्थन करीत आहे. निवडणुकीच्या अगोदर शतप्रतिशत भाषा बोलणाऱ्या भाजपाला बिहारच्या राजकारणात पुन्हा नितीश कुमार यांचाच चेहरा पुढे करावा लागतो आहे.

सन २०२० मध्ये राज्यात झालेल्या विधानसभा निवडणुकीत खरे तर भाजपाने बाजी मारली होती. २४३ जागांच्या विधानसभेत भाजपाने ११० जागा लढवल्या आणि ७४ आमदार निवडून आले. जनता दल (यु) पक्षाने ११५ जागा लढवल्या व या पक्षाचे केवळ ४३ आमदार निवडून आले.

महाराष्ट्राप्रमाणे तेव्हासुद्धा भाजपाला पाटण्याच्या सिंहासनावर मुख्यमंत्रीपदावर दावा ठोकता आला असता, पण भाजपाने उदारमनाने कमी आमदार असलेल्या मित्रपक्षाचे नेते नितीश कुमार यांना मुख्यमंत्रीपद दिले. या घटनेला आता पाच वर्षे उलटली आहेत.

येत्या विधानसभा निवडणुकीत भाजपाचे सर्वाधिक आमदार विजयी झाले, तर पुन्हा एकदा मुख्यमंत्रीपद नितीश कुमार यांच्या झोळीत टाकेल का? विधानसभा निवडणुकीनंतर नितीश कुमार यांना महाराष्ट्राप्रमाणे एकनाथ शिंदे यांच्यासारखी भूमिका बजावावी लागेल का, असे तर्क आतापासूनच लढवले जात आहेत.

गेल्या वेळेप्रमाणेच बिहारच्या निवडणुकीत एकमेकांचे राजकीय शत्रू तेच आहेत. एका बाजूला भाजपा, जनता दल यु, चिराग पासवान यांचा लोक जनशक्ती आणि जीतन राम मांझी यांचा हम आणि समोर राष्ट्रीय जनता दल, काँग्रेस आणि महाआघाडीतील छोटे पक्ष असणार आहेत.

जातीपातीची व्होट बँक आणि जागा वाटप हा दोन्ही बाजूला कळीचा मुद्दा आहे. राजद आणि काँग्रेस यांच्यात जागा वाटपाची खेचाखेची ही मोठी कसोटी आहे. २०२०ची विधानसभा आणि २०२४ ची लोकसभा, या दोन्ही निवडणुकीत बिहारमधील मतदारांनी भाजपा-जनता दल (यु) ला मोठे झुकते माप दिले. लोकसभा निवडणुकीत, तर ४० पैकी तीसपेक्षा जास्त जागांवर एनडीएचे खासदार निवडून आले. नंतर झालेल्या पोटनिवडणुकांतही महाआघाडीत मतभेद आणि खदखद बघायला मिळाली.

राजीव रंजन ऊर्फ पप्पू यादव यांना पूर्णिमा मतदारसंघाची जागा सोडायला लालू यादव यांनी साफ नकार दिला. पण प्रतिकूल वातावरण असतानाही पप्पू यादव या मतदारसंघातून निवडून आले व त्यांनी लालूंनाच धडा शिकवला. काँग्रेस व राजदमध्ये दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील (जेएनयु) विद्यार्थी संघटनेचे माजी अध्यक्ष कन्हैया कुमार यांच्यावरून वादंग चालूच आहे.

ते भाजपा विरोधी आहेत हे सर्वश्रुत आहे. ते भारतीय कम्युनिस्ट पक्षाची (भाकप) विद्यार्थी शाखा असलेल्या एआयएएसएफमधून भाकपमध्ये सक्रिय झाले व २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाकपचे उमेदवार म्हणून बेगुलसरायमधून लढले, पण ते पराभूत झाले.

२०२४ मध्ये त्यांनी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. काँग्रेस पक्षाने त्यांना बिहारमधून उमेदवारी देण्याचे ठरवले होते, पण लालू यादव यांनी कन्हैयाकुमार यांच्या उमेदवारीला विरोध केला त्यामुळे काँग्रेसने त्यांना उत्तर पूर्व दिल्ली लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी दिली. त्यांचा तेथेही पराभव झाला.

नुकत्याच झालेल्या दिल्ली विधानसभा निवडणुकीत कन्हैयाकुमार यांनी काँग्रेससाठी भरपूर प्रचार केला, पण ७० जागांच्या विधानसभेत काँग्रेसला एकही जागा मिळवता आली नाही. काँग्रेसला ना राहुल गांधींचा उपयोग झाला, ना कन्हैयाकुमार यांचा.

आता काँग्रेस पक्षाने या अपयशी कन्हैयाकुमार यांना बिहार विधानसभेत सक्रिय करण्याचे ठरवले आहे. एनएसयूआयच्या वतीने बिहारमध्ये चालू असलेल्या पलायन रोको, नौकरी दो या अभियानात कन्हैयाकुमार सध्या सक्रिय दिसत आहेत.

काँग्रेसने बिहार प्रदेश काँग्रेसची जबाबदारी दलित आमदार राजेश कुमार यांच्यावर सोपवली आहे. मुख्यमंत्रीपदाचा चेहरा असलेला आपला पुत्र तेजस्वी यादव याला कोणी आव्हान देऊ शकेल, असा दुसरा नेता महाआघाडीत अन्य कोणत्याही मित्रपक्षात असता कामा नये, अशी दक्षता लालू यादव घेताना दिसत आहेत.

बिहारमध्ये सवर्ण किंवा उच्चवर्णीय मतदारांची संख्या नगण्य आहे. म्हणूनच दलित, मागासवर्गीय आणि अल्पसंख्य म्हणजेच मुस्लीम व्होट बँकेवर सर्वच राजकीय पक्षांची मदार असते. मुस्लीम मतदार हे भाजपाच्या विरोधात आहेत असे मानले जाते तरीही लोकसभा व विधानसभा निवडणुकीत मुस्लिमांची काही मते भाजपाला मिळाली आहेत, याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

नितीश कुमार मागास जातीतून आले आहेत. ते दोन दशकांहून अधिक काळ मुख्यमंत्रीपदावर आहेत पण त्यांच्यावर भ्रष्टाचाराचा एकही आरोप झालेला नाही. प्रचंड विरोध असूनही त्यांनी राज्यात दारूबंदी जारी केली. महिलांचा फार मोठा पाठिंबा त्यांना मिळाला.

नितीश कुमार यांच्या पाठीशी महिलांची व्होट बँक भक्कमपणे उभी आहे. रस्ते, वीज अशा विकासकामांत केंद्राचा निधी मोठा मिळाला आहे. पण शिक्षण, उद्योग, गुंतवणूक व रोजगार यात बिहार खूपच मागासलेला आहे. बिमारू राज्यात बिहारचा कायम नंबर आघाडीवर आहे. रोजगारासाठी अन्य राज्यांत वर्षानुवर्षे होत असलेले तरुणांचे पलायन नितीश कुमार थांबवू शकलेले नाहीत हे त्याचे मोठे अपयश आहे.

महाआघाडीतील मतभेद व असंतोषाचा पुरेपूर लाभ उठविण्याचे भाजपाने ठरवले आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी नुकत्याच झालेल्या बिहार दौऱ्यात येत्या विधानसभा निवडणुकीत एनडीएचे कप्तान नितीश कुमार हेच असतील असे पक्षाच्या बैठकीत जाहीर करून टाकले. भाजपा जे ठरवेल तोच एनडीएचा निर्णय असतो. त्यामुळे चिराग पासवान किवा जीतन राम मांझी यांच्या मताला काडीमात्र किंमत नसते.

बिहारमध्ये २४३ पैकी २२५ जागा जिंकण्याचे लक्ष्य भाजपाने ठरवले आहे. जी रणनिती भाजपाने महाराष्ट्रात राबवली तशीच आता बिहारमध्ये राबवली जात आहे. बिहारचे प्रभारी विनोद तावडे, बिहारचे दोन्ही उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी व विजय सिन्हा, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष दिलीप जैस्वाल तसेच पक्षाचे आमदार, खासदार यांच्या बैठकीत अमित शहा यांनी नितीश कुमार हे निवडणूक काळात एनडीएचे कप्तान राहतील असे जाहीर केले. त्यामुळे विधानसभा निवडणूक होईपर्यंत बिहारमध्ये एनडीएचे नंबर १ नेते नितीश कुमार असतील. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे बिहारमधील दौरे वाढले आहेत. प्रत्येक भेटीत पक्ष संघटनेला ऊर्जा देत आहेत. प्रत्येक दौऱ्यात ते राजदवर टीकेची झोड उठवताना लालू प्रसाद यादव यांनाच टार्गेट करीत आहेत.

अमित शहा यांची नुकतीच गोपालगंज येथे जंगी सभा झाली. ते म्हणाले - लालू को लाज नहीं, गाय का चारा खा गए, सिर्फ अपने परिवार को सेट किया, बिहार को तय करना हैं कि लालू - राबडी के जंगलराज की ओर जाना हैं या मोदी - नितीश के विकास की राह पर जाना हैं... अगर हमारी फिर से सरकार बनती है तो हम बिहार को बाढ से मुक्त करा देंगे, बंद चिनी मिलों को फिर शुरू करेंगे!

■ ■ ■

...आणि उठाव असा फसला!

अभय गोखले

जुलै - ऑगस्ट २०२४ मध्ये बांगलादेशात विद्यार्थ्यांनी आरक्षणविरोधी आंदोलन पुकारले. त्या आंदोलनाने नंतर हिंसक वळण घेतल्यामुळे पोलिसांना गोळीबार करावा लागला, त्यामध्ये अनेक आंदोलक मृत्यूमुखी पडले. शेख हसीना यांच्या नेतृत्वाखालील सरकारने विद्यार्थी नेत्यांबरोबर सामोपचाराने वाटाघाटी करून त्यावर वेळीच तोडगा न काढल्याने परिस्थिती हाताबाहेर गेली आणि स्वतःच्या सुरक्षेसाठी, शेख हसीना यांना बांगलादेशातून पळ काढावा लागला.बांगलादेशचे लष्कर प्रमुख वकार उज जमान यांनी शेख हसीना यांना सुरक्षितपणे बांगलादेशमधून बाहेर पडण्यास मदत केली.

कोण आहेत वकार उज जमान?

बांगलादेशचे लष्कर प्रमुख असलेले वकार उज जमान हे शेख हसीना यांचे नातेवाईक आहेत. वकार यांची पत्नी,शेख हसीना यांच्या काकांची मुलगी आहे. वकार यांचे सासरे मुस्तफीजूर रेहमान हे काही वर्षांपूर्वी बांगलादेशचे लष्कर प्रमुख होते.

पाकिस्तानची गुप्तहेर संघटना इंटर सर्व्हिसेस इंटेलिजन्सने मध्यंतरी बांगलादेश लष्करातील लेफ्टनंट जनरल मोहंमद फैजूर रेहमान यांना हाताशी धरून लष्कर प्रमुख वकार उज जमान यांच्या विरोधात उठाव करण्याचा प्रयत्न केला होता. हा प्रयत्न भारताच्या सतर्कतेमुळे फसला असे बोलले जात आहे.

स्वराज्य मॅगझिन मध्ये उठावा संबंधी जी सविस्तर माहिती देण्यात आली आहे, त्यानुसार लेफ्टनंट जनरल फैजूर रेहमान हे जमाते इस्लामी या कट्टरपंथी पक्षाशी संबंधित आहेत.तसेच पाकिस्तानी लष्कराशी त्यांची जवळीक आहे. पाकिस्तानी गुप्तहेर संघटना इंटर सर्व्हिसेस इंटेलिजन्सशी त्यांचे निकटचे संबंध आहेत.

जुलै - ऑगस्ट मध्ये बांगलादेशात जे आरक्षण विरोधी आंदोलन झाले, त्याचे नेतृत्व करणारे विद्यार्थी नेते हे फैजूर रेहमान यांच्याशी जवळीक साधून आहेत. जानेवारी २०२५ मध्ये फैजूर रेहमान यांच्याच पुढाकाराने इंटर सर्व्हिसेस इंटेलिजन्सचे प्रमुख लेफ्टनंट जनरल असिम मलीक हे ढाका येथे आले होते. बांगलादेशचे लष्कर प्रमुख वकार उज जमान यांचा त्याला विरोध होता. परंतु बांगलादेश मधील हंगामी सरकारचे सल्लागार मोहंमद युनूस यांचा त्याला पाठींबा असल्याने वकार यांना काही करता आले नव्हते.

फैजूर रेहमान आणि असिम मलीक यांच्या भेटीमध्ये काय चर्चा झाली? त्या बाबत वकार उज जमान यांना अंधारात ठेवण्यात आले होते. बांगलादेश लष्करातील आणखी काही अधिकाऱ्यांचा फैजूर रेहमान यांना पाठिंबा असल्याची चर्चा होती.

इंटर सर्व्हिसेस इंटेलिजन्सचे प्रमुख आपल्या ढाक्यातील वास्तव्यात जमाते इस्लामीच्या काही नेत्यांना आणि आरक्षण विरोधी आंदोलनातील काही विद्यार्थी नेत्यांना भेटले होते.त्यानंतर लष्कर प्रमुख वकार उज जमान यांना त्यांच्या पदावरून हटवून त्यांच्या जागी फैजूर रेहमान यांना आणण्याची योजना आखण्यात आली.

उठावाची तयारी करण्यासाठी फैजूर रेहमान यांनी त्यांच्याशी जवळीक असलेल्या लष्करातील काही अधिकाऱ्यांबरोबर गुप्त बैठक घेतली. फैजूर रेहमान यांना चिफ ऑफ द जनरल स्टाफ लेफ्टनंट जनरल मिझानूर रेहमान शमीम यांचा पाठिंबा मिळवता आला नाही. आणखी काही अधिकाऱ्यांनी उठावाच्या योजनेला विरोध केला.त्यांचे असे मत होते की लष्कराने राजकारणापासून दूर रहायला हवे.

दरम्यान, वकार उज जमान यांच्या विरोधात अशाप्रकारचे कटकारस्थान शिजत असल्याचा सुगावा भारताला लागताच भारताने वकार उज जमान यांना सावध केले.

भारताने या सर्व घडामोडीं बाबत अमेरिकेला अवगत केले आणि हा उठाव यशस्वी झाल्यास फक्त बांगलादेशच अस्थिर होणार नाही तर त्या विभागात सुरक्षेच्या दृष्टिकोनातून समस्या निर्माण होतील, तसेच या उठावामुळे बांगलादेशातील कट्टर पंथीयांना बळ मिळेल आणि त्याचा परिणाम अमेरिकेलाही भोगावा लागेल, असे अमेरिकेच्या लक्षात आणून दिले.

त्यानंतर अमेरिकेने बांगलादेश मधील हंगामी सरकारचे मुख्य सल्लागार मोहंमद युनूस यांना संदेश पाठवला की अशा प्रकारची उठावाची योजना फलद्रूप होता कामा नये. दरम्यान, भारताने वकार उज जमान यांना अमेरिकन सुरक्षा यंत्रणेतील उच्च अधिकाऱ्याशी संपर्क साधण्यास मदत केली.

या सर्व घडामोडींची कुणकुण फैजूर रेहमान आणि त्यांच्या सहकाऱ्यांना लागताच त्यांनी आपली योजना अंमलात आणण्यासाठी घाई केली. लष्कर प्रमुख वकार उज जमान हे सेंट्रल आफ्रिकन रिपब्लिकला भेट देण्यासाठी बांगलादेशच्या बाहेर गेले असताना, उठाव करण्याचे ठरवण्यात आले. वकार उज जमान हे जेंव्हा बांगलादेशात परत येतील तेव्हा ढाका विमानतळावरच त्यांना अटक करण्याचे ठरवण्यात आले.

या योजनेची कुणकुण भारताला लागताच भारताने वकार उज जमान यांना सावध केले. फैजूर रेहमान आणि त्यांच्या सहकाऱ्यांची योजना उधळून लावण्यासाठी डावपेच आखण्यात आले. वकार उज जमान यांचे विमान ढाका ऐवजी तेजगाव एयर बेसला वळवण्यात आले. तेथे वकार यांच्या समर्थक लष्करी अधिकाऱ्यांनी त्यांचे स्वागत केले आणि त्यांना सुरक्षितपणे ढाका येथील आर्मी कॅन्टोन्मेंटमध्ये नेण्यात आले.

अशाप्रकारे लेफ्टनंट जनरल फैजूर रेहमान आणि त्यांच्या सहकाऱ्यांची उठावाची योजना उधळून लावण्यात आली. कटाचे प्रमुख सुत्रधार लेफ्टनंट जनरल फैजूर रेहमान यांना स्थानबद्ध करण्यात आले असून, त्यांच्या विरोधात लवकरच सेना न्यायालयात खटला चालवण्यात येईल.

अर्थात, अशा प्रकारच्या घडामोडी घडल्याचा इन्कार बांगलादेश लष्कराने केला आहे. त्यात आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. बिस्मार्कने एके ठिकाणी म्हटलं होतं की, नथींग इज टू अनटिल, इट इज ऑफिशियली डिनाईड बिस्मार्कचे हे विश्लेषण या बाबतीत तंतोतंत लागू पडते.

लेफ्टनंट जनरल फैजूर रेहमान आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा उठाव फसला असला तरी पाकिस्तान गप्प बसणार नाही. त्यांचे प्रयत्न सुरूच राहतील. त्यामुळे वकार उज जमान यांना सतर्क रहावे लागेल. अर्थात बांगलादेश लष्करासाठी उठाव आणि प्रतिउठाव या गोष्टी नवीन नाहीत.बांगलादेश लष्कराचा इतिहास त्याचा पुरेसा साक्षीदार आहे.

■ ■ ■

मारहाण करून मराठी बोलायला भाग पाडणे योग्य आहे काय?

अतुल सोमेश्वर कावळे
९७३०५३५१९६
atulskawale@yahoo.co.in

अंधेरी (पश्चिम), वर्सोवा, मुंबई येथील डी मार्ट स्टोअरमधील एका कर्मचाऱ्याने एका मराठी ग्राहकाशी मराठीत बोलण्यास नकार दिला आणि आपण हिंदीतच बोलणार अशी अरेरावी केली.

सदर ग्राहक महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा स्थानिक पदाधिकारी होता. त्यानंतर मनसेचे कार्यकर्ते डी मार्ट स्टोअरमध्ये गेले आणि त्या कर्मचाऱ्याला मारण्याची धमकी देत त्याला मराठीतून माफी मागण्यास भाग पाडले.

घटना तशी छोटीशीच आहे आणि मनसेच्या नेहमीच्या पठडीतील आहे. अशा अनेक घटना ह्याआधीही घडल्या आहेत आणि मनसेने आपल्या स्टाइलने त्याचा समाचारही घेतला आहे. पण मुख्य प्रश्न हा आहे की असे मनसे स्टाईल धमकावण्याने परप्रांतीय लोकं मराठीत संभाषण करतील की उलट मराठी भाषेचा आणखी दुस्वास करतील ?

अगदी निष्पक्षपणे सांगायचे तर डी मार्ट स्टोअरमधील त्या परप्रांतीय कर्मचाऱ्याचा एवढा दोष नाही जेवढे खुद्द मराठी माणसं दोषी आहेत. मराठी माणसं आपसांत सुद्धा आपल्या मातृभाषा मराठीत बोलत नाहीत. स्वभाषेत संभाषण करणे त्यांना मागासपणाचे वाटते. विशेषतः आंग्लाळलेली तरुण मराठी मुलं तर हटकून हिंदीतच संभाषण करतात.

ती हिंदी सुद्धा इंग्लिश शब्दबहुल असते. म्हणजे मराठी लोकांनाच आपल्या मातृभाषेबद्दल प्रेम नाही आणि मनसे कार्यकर्ते परप्रांतीयांवर मराठीत बोलण्याचा आग्रह करत आहेत आणि न बोलल्यास मारहाण करण्याच्या धमक्या देत आहेत.

मनसे कार्यकर्त्यांनी आधी मराठी लोकांना मराठी भाषेत बोलण्यास भाग पाडावे आणि जो मराठी माणूस मराठीत न बोलता हिंदीत बोलेल त्याच्या कानशिलात लावण्याची हिंमत दाखवावी. असे जर मनसे कार्यकर्ते करू शकत असतील तरच त्यांचे मराठी भाषेवरील प्रेम अस्सल आहे असे म्हणता येईल. अन्यथा हा मनसेचा फक्त प्रकाशझोतात राहण्याचा एक सवंग प्रकार आहे ह्या पलीकडे अशा धमकावण्याला काही किंमत नाही.

अलीकडेच २७ फेब्रुवारी रोजी जागतिक मराठी भाषा दिवस साजरा झाला. हा दिवस दरवर्षी येतो आणि जातो ह्यापलीकडे ह्या दिवसाचे औचित्य उरलेले नाही. ह्या दिवसानिमित्त वर्तमानपत्रांमध्ये फुटकळ लेख लिहिले जाऊन मराठी भाषेविषयी प्रेम आणि कळकळ व्यक्त केली जाते. बस्स एवढेच होते, त्यापलीकडे काही नाही. उलट तिकडे इस्राईल देशात मात्र जागतिक मराठी भाषा गौरव दिवस मोठ्या उत्साहाने तेथील मराठी भाषिक ज्यु बांधव साजरा करतात. पण त्याची इकडे महाराष्ट्रात मात्र बातमी होत नाही.

मोझेस इन इस्राईल नामक यू ट्यूब चॅनलवर ह्याबद्दलची संपूर्ण माहिती मिळते. रेव्हिटल मोझेस नामक ज्यु भगिनी हे चॅनेल चालवते. अस्खलित मराठीत बोलणारे हे मराठी भाषिक बेने इस्राईली ज्यु बांधव बघून मराठीच्या अभिमानाने उर भरून येतो. छ. शिवाजी महाराजांवरील त्यांचे निस्सीम प्रेम बघून आणि महाराजांबद्दलचा त्यांचा अभिमान बघून तर अक्षरशः डोळ्यांत पाणी येते.

शेकडो वर्षांपूर्वी आपल्या मायभूमीतून परागंदा झालेले काही ज्यु भारतात विशेषतः महाराष्ट्रात आले आणि इथेच स्थायिक झाले. महाराष्ट्रातील मराठी माणसांनी ह्या मातृभूमी गमावलेल्या ज्युंना सर्वतोपरी मदत केली आणि मोठ्या बंधुभावाने त्यांना आपल्यात सामावून घेतले. ह्या ज्युंनी सुद्धा मराठी भाषा आणि मराठी संस्कृती पूर्णपणे आत्मसात करून घेतली आणि आपली मूळ ओळख जपून सुद्धा महाराष्ट्राच्या जनजीवनाशी ते एकरूप झाले.

सन १९४८ साली इस्राईल देश पुन्हा अस्तित्वात आल्यावर बरेचसे मराठी भाषिक ज्यु बांधव आपल्या मायभूमीत इस्राईलमध्ये जाऊन स्थायिक झालेत. पण तिथे गेल्यावरही ते महाराष्ट्र, मराठी भाषा आणि मराठी संस्कृतीला विसरले नाहीत.

ह्या ज्युंनी आपल्या उपकारकर्त्या मराठी माणसांचे ऋण न विसरता इस्राईलमध्ये गेल्यानंतर तिथे सुद्धा मराठी भाषा आणि मराठी संस्कृती रुजविण्याचे आणि त्यांच्या पुढील पिढ्यांमध्ये ते हस्तांतरित करण्याचे सुद्धा कार्य चालवले आहे. त्यांनी त्यांच्या मुलांना मराठी भाषेतून शिक्षण देण्यासाठी मराठी शाळा उघडल्या आहेत.

भारत, महाराष्ट्र, मराठी माणसं, मराठी भाषा, मराठी साहित्य, मराठी संस्कृती, मराठी खानपान, छ. शिवाजी महाराज आणि छ. संभाजी महाराज, हिंदवी स्वराज्य आणि उत्तरकाळात स्थापन झालेले मराठा साम्राज्य ह्यांचा इतिहास आपल्या भावी पिढीला शिकविण्यासाठी हे मराठी भाषिक ज्यु बांधव कसोशीने प्रयत्न करत आहेत.

आपल्या उपकारकर्त्यांचा इतिहास आपल्या पुढच्या पिढीपर्यंत पोहोचावा आणि त्यांनीसुद्धा आपल्या पूर्वजांच्या उपकारकर्त्यांच्या प्रति नेहमी कृतज्ञ असावे म्हणून ह्या मराठीभाषिक ज्यु बांधवांचे चाललेले प्रयत्न अत्यंत कौतुकास्पद आहेत.

त्यांच्या ह्या प्रयत्नाला नक्कीच यश येईल ह्याबद्दल त्यांचा आत्मविश्वास पाहून खात्री वाटते. पण खुद्द इथे महाराष्ट्रात मात्र मराठी माणसांचीच आपल्या मातृभाषेबद्दल दिवसेंदिवस अनास्था वाढत चालली आहे. मग दोषी कोण ? मराठी माणूस की परप्रांतीय?

मी ज्या खाजगी कंपनीत काम करतो त्या कंपनीच्या कार्यालयातील बहुसंख्य मराठी माणसं आपसांत सुद्धा हिंदीत बोलतात, मराठीत बोलत नाहीत. मी त्यांना मराठीत बोलण्याचा आग्रह केला की ते माझ्यावर फिदीफिदी हसतात.

कंपनीचे तिन्ही मालक मारवाडी असूनही ते आवर्जून सगळ्या स्टाफशी मराठीतच बोलतात. पण आपलेच मराठी लोकं त्यांच्याशी सुद्धा हिंदीत बोलतात. माझा एक सहकारी कर्मचारी मूळचा झारखंडचा आहे. तो मात्र आवर्जून मराठीत बोलतो. त्याचे अतिशय कौतुक वाटते. पण मराठी लोकं त्याच्याशी सुद्धा हिंदीत बोलतात.

एखादा परप्रांतीय मराठीत बोलण्याचा प्रयत्न करतो तेव्हा आपलेच मराठी लोकं त्याच्याशी हिंदीत संभाषण सुरू करतात. त्यामुळे खरे गुन्हेगार मराठी लोकच आहेत. उगीच परप्रांतियांना दोष देण्यात, शिव्या घालण्यात, त्यांना मारहाण करण्यात अर्थ नाही. अशाने त्यांच्या मनात मराठी भाषाच नव्हे तर तमाम मराठी लोकं आणि महाराष्ट्राबद्दल घृणा निर्माण होईल.

माझी एक सहकारी कर्मचारी मुलगी मध्य प्रदेशातील आहे. तिला मराठी येते पण तरीही ती मराठीत बोलत नाही. मी तिला कैक वेळा मराठीत बोलण्याचा आग्रह केला. पण तरीही ती मुद्दामहून हिंदीतच बोलते. मग मीही तिच्याशी आवर्जून आणि हटकून मराठीतच बोलतो. ती हिंदीत आणि मी मराठीत एकमेकांशी बोलतो.

मराठी माणसांनी मनसे कार्यकर्त्यांसारखे दुसऱ्यांना मराठी भाषेत बोलण्यासाठी धमकावून मराठी माणसांची, महाराष्ट्राची, मराठी महापुरुषांची आणि मराठी भाषेची पत घालवण्यापेक्षा समोरचा कोणत्याही भाषेत बोलत असला तरी आपण मुद्दामहून, आवर्जून, हटकून आणि मुजोरीने मराठीतच बोलले पाहिजे. मग बघा दुसरे लोकं मराठीत बोलणे सुरू करतात की नाही ते?

■ ■ ■

आयपीएल सामन्यांदरम्यानच्या जाहिराती

वाचक लिहितात

सध्या आयपीएलचे सामने सुरु आहेत. जीओ हॉटस्टारने या सामन्यांच्या थेट प्रक्षेपणाचे हक्क खरेदी करून त्यांच्या ॲपवर सामन्यांचे विनामूल्य प्रक्षेपण केले आत असल्याने प्रतिदिन हे सामने आठ ते दहा कोटी लोक लाईव्ह पाहत असतात ज्यामध्ये वयोवृद्धांपासून शाळकरी मुलांचाही सहभाग असतो. प्रत्येक षटक झाल्यावर, खेळाडू बाद झाल्यावर, स्ट्रॅटेजिक टाइम आउट झाल्यावर लगेचच जाहिरात सुरु होते.

यातील जवळपास सर्वच जाहिराती या गुटखा, पानमसाला आणि कोणत्या ना कोणत्या जुगार खेळण्यास प्रवृत्त करणाऱ्या ऑनलाईन ॲप्सच्या असतात. एरव्ही कधीतरी दिसणाऱ्या या ॲप्सच्या जाहिरातींचा लाईव्ह सामन्यांच्या दरम्यान सातत्याने मारा केला जात आहे ज्याचा परिणाम हे सामने पाहणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांवर आणि महाविद्यालयीन तरुण तरुणींवर होऊ शकतो. गुटखा, तंबाखूयुक्त पानमसाला यांवर महाराष्ट्रासह अनेक राज्यांत बंदी आहे, तरीही ते खाणाऱ्यांची संख्या प्रचंड आहे. गुटखा, तंबाखू यांमुळे कर्करोगासारखे जीवघेणे रोग होतात तर ऑनलाईन जुगाराच्या नादी लागून आजतागायत कित्येकांचे आयुष्य उध्वस्त झाले आहे. सरकारला या दोन्ही गोष्टींतून वारेमाप कर मिळतो त्यामुळे सरकार त्यावर कोणतेही बंधन आणत नाही; मात्र अशा समाजविघातक जाहिरातींमुळे शालेय मुले, तरुण त्यांच्या आहारी जाऊन आपल्यासह आपल्या कुटुंबाची हानी करू शकतात याचा विचार कोण करणार ?

■ जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई.

श्रीराम रक्षा स्तोत्राचे महत्व!

श्रीरामाचे नवरात्र चैत्र शुक्ल प्रतिपदा (गुढीपाडवा) ते चैत्र शुक्ल नवमी (श्रीराम नवमी) पर्यंत असते. या काळात भाविक रामायणाचे पठण करतात, श्रीरामाचे गौरव करणारे स्तोत्र (रामरक्षा स्तोत्र) पठण करतात, त्यांच्या स्तुतीमध्ये भजन,कीर्तन करतात.

रामरक्षा बुधकौशिक ऋषींनी लिहिलेले आहे. खरेतर रामरक्षा हा एक मंत्रच आहे. रामरक्षेच्या सुरुवातीला अस्य श्रीरामरक्षास्तोत्रमंत्रस्य सांगितलेले आहे. मंत्र म्हणजे एक ध्वनी, एक अक्षर, एक शब्द किंवा शब्दांचा समूह. ज्या वेळी ठराविक लयीत अन् सुरात एखादा मंत्र जपला जातो, त्या वेळी त्या जपातून एक विशिष्ट शक्ती निर्माण होते. याकरता रामरक्षा एका विशिष्ट लयीत म्हणणे आवश्यक आहे. रामरक्षा पठण केल्याने पठण करणाऱ्या व्यक्तीभोवती सूक्ष्म स्तरावरील संरक्षककवच निर्माण होऊन तिचे अनिष्ट शक्तींपासून रक्षण होते.

या स्तोत्राच्या पठणाने मानसिक, शारीरिक आणि आध्यात्मिक बळ मिळते. नकारात्मक ऊर्जा, भय आणि वाईट शक्तींवर विजय मिळवता येतो.राम नामाच्या सतत उच्चाराने मन शांत होते आणि सकारात्मक ऊर्जा प्राप्त होते. दररोज रामरक्षा स्तोत्राचे पठण करायला हवे.

■ सौ. प्रिया बागडदेव, छिंदवाडा.

उन्हाळ्यात कशी घ्यावी डोळ्यांची काळजी?



उन्हाळ्याला सुरूवात होताच आरोग्याची काळजी घ्यावी लागते. घराबाहेर पडताना योग्यरित्या हायड्रेटेड नाही राहिल्यामुळे उष्मघाताच्या आणि आरोग्याशी संबंधित समस्या होऊ शकतात. उन्हाळ्यात त्वचेशी संबंधित समस्या वाढत असताना, उन्हात बाहेर पडल्याने डोळ्यांच्या अनेक समस्या उद्भवतात.

आपले डोळे आपल्या शरीरातील महत्त्वाच्या भागांपैकी एक मानला जातो. त्यामुळे उन्हाळ्यात डोळ्यांची विशेष काळजी घेतली पाहिजे.

उन्हाळ्यात डोळ्यांच्या ॲलजीर्ची समस्या वाढते आणि डोळे लाल होतात. याचे मुख्य कारण म्हणजे वातावरणातील आर्द्रता आणि प्रदूषण, जे आपल्या डोळ्यांसाठी हानिकारक आहे. या कारणामुळे डोळ्यांना लवकर संसर्ग होतो. डोळ्याचा भाग संवेदनशील असल्यामुळे त्याची योग्य रित्या काळजी नाही घेतल्यास तुम्हाला अनेक समस्यांना सामोरं जावा लागते.

हात स्वच्छ ठेवा : डोळे सुरक्षित ठेवण्यासाठी, आपण आपले हात स्वच्छ ठेवणे सर्वात महत्वाचे आहे. घाणेरड्या हातांनी डोळ्यांना स्पर्श केल्याने बॅक्टेरिया डोळ्यांत प्रवेश करतात, ज्यामुळे संसर्ग होऊ शकतो. म्हणून, जेव्हाही तुम्ही बाहेरून परताल तेव्हा प्रथम तुमचे हात धुवा आणि नंतर डोळ्यांना स्पर्श करा. याशिवाय, दुसऱ्याचा रुमाल वापरू नका. नेहमी तुमचा स्वच्छ रुमाल वापरा.

सूर्यकिरणांपासून संरक्षण : सूर्यप्रकाशातून निघणारे अतिनील किरण आपल्या डोळ्यांना नुकसान करतात, म्हणून बाहेर पडताना नेहमी गॉगल घालात जेणेकरून तुमचे डोळे सुरक्षित राहतील.

चांगल्या जीवनशैलीची काळजी : योग्य जीवनशैली आणि संतुलित आहार खूप महत्त्वाचा आहे. चुकीच्या आहारामुळे अनेक आरोग्य समस्या उद्भवतात, ज्या डोळ्यांसाठी देखील हानिकारक ठरू शकतात. म्हणून, जंक फूड टाळा आणि संतुलित आहार घ्या, जेणेकरून तुमचे डोळे देखील निरोगी राहतील.

या गोष्टींकडे लक्ष पुरवा

दररोज पाण्याने डोळे धुणे कधीकधी आपल्या डोळ्यांसाठी हानिकारक ठरू शकते. जर तुम्ही वारंवार पाण्याने डोळे धुतले तर डोळ्यांच्या नसा कोरड्या होऊ शकतात. त्यामुळे डोळ्यांत घाण असेल तरच पाणी वापरा.

■ ■ ■

अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

भूकंप

नैसर्गिक आपत्तीपुढे
माणूस होतो हतबल
अशावेळी एकमेका मदत
देऊन जाते आत्मबल . . .

मानवतेची ओळख
अशाच प्रसंगी होते
धर्म प्रांताच्या पलीकडचे
असते हे वैश्विक नाते . . !

जातपात धर्म देश
असो कोणताही
मानवता धर्माचे पालन
जगी सर्वश्रेष्ठ राही . . !

यंदा जागतिक आरोग्य दिनानिमित्त मूठभर बदामांसह शारीरिक आरोग्याला पोषण द्या

नागपूर, २ एप्रिल : जागतिक आरोग्य दिन ७ एप्रिल रोजी साजरा केला जातो, जो आठवण करून देतो की उत्तम आरोग्य म्हणून दीर्घकाळापर्यंत जगणे नाही, तर आरोग्यदायी व सर्वोत्तम जीवन जगणे महत्त्वाचे आहे. सर्वात महत्त्वपूर्ण घटक म्हणजे पोषण, कारण संतुलित आहार एकूण आरोग्य उत्तम ठेवण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावतो. सोपा, पण गुणकारी मार्ग म्हणजे दैनंदिन आहारामध्ये बदामांसारख्या पोषण-संपन्न फूड्सचा समावेश करणे. भारतातील सर्वात लोकप्रिय बदाम - कॅलिफोर्निया बदाम १५ आवश्यक पौष्टिक घटकांसह प्रोटीन, डाएटरी फायबर, आरोग्यदायी फॅट्स, मॅग्नेशियम, झिंक व व्हिटॅमिन ई यांचे नैसर्गिक स्रोत आहेत. ज्यामुळे कॅलिफोर्निया बदाम आरोग्यदायी जीवनशैलीमध्ये स्मार्ट भर आहेत.

जागतिक आरोग्य दिनाबाबत मत व्यक्त करत नवी दिल्लीमधील मॅक्स हेल्थकेअरच्या डाएटेटिक्सच्या प्रादेशिक प्रमुख रितिका समाद्दार म्हणाल्या, ''भारतात डाएटरी सवयींमधील बदल आणि बैठेकाम करण्याच्या जीवनशैलीमुळे लठ्ठपणा, कार्डियोव्हॅस्कुलर आजार व मधुमेहामध्ये वाढ झाली आहे, ज्यामुळे एकूण आरोग्य उत्तम ठेवण्याला प्राधान्य देणे अधिक महत्त्वाचे झाले आहे. मी माझ्या क्लायण्ट्सना नेहमी सल्ला देते की पोषण उत्तम आरोग्याचा पाया आहे आणि अधिकाधिक भाज्या, फळे व बदामांसारख्या पौष्टिक नट्सचे सेवन करणे यांसारख्या लहान, अर्थपूर्ण सवयी मोठा बदल घडवून आणू शकतात. बदाम विशेषत: हृदयाचे आरोग्य उत्तम ठेवण्यासाठी लाभदायी आहेत.

न्यूट्रिशन व वेलनेस कन्सल्टण्ट शीला कृष्णास्वामी म्हणाल्या, यंदा जागतिक आरोग्य दिनानिमित्त भारतातील लठ्ठपणाच्या वाढत्या समस्येचे निराकरण करणे महत्त्वाचे आहे, जेथे बैठेकाम करण्याची जीवनशैली, अनारोग्यकारक आहार सवयी आणि इतर आवश्यक पौष्टिक घटकांची कमतरता असलेल्या कर्बोदके-संपन्न आहाराचे सेवन यामुळे या समस्येमध्ये अधिक भर होत आहे. प्रभावी वजन व्यवस्थापन पौष्टिक आहारासह सुरू होते, ज्यामध्ये प्रोटीन, डाएटरी फायबर, आरोग्यदायी फॅट्स आणि सूक्ष्म पौष्टिक घटकांचा समावेश असतो. साधा, पण गुणकारी मार्ग म्हणजे दैनंदिन नित्यक्रमामध्ये मूठभर बदामांचे सेवन करणे. १५ आवश्यक पौष्टिक घटक असलेले बदाम भूकेचे शमन करण्यास मदत करतात, एकूण कॅलरी सेवन कमी करतात आणि वजन व्यवस्थापनास साह्य करतात.

एमबीबीएस व न्यूट्रिशनिस्ट डॉ. रोहिणी पाटील म्हणाल्या, जीवनशैली संबंधित आजारांमध्ये वाढ होत असताना पोषण अधिक महत्त्वाचे बनले आहे. जगातील मधुमेहाची राजधानी म्हणून प्रसिद्ध असलेल्या भारतात दररोज सर्वोच्च केसेसची नोंद होत आहे, अनेक व्यक्ती प्री-डायबिटीस टप्प्यामध्ये आहेत. तुमच्या आरोग्याची काळजी घेण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे स्मार्टर फूडची निवड करणे, ज्याची सुरूवात आरोग्यदायी स्नॅक्ससह करा. प्रक्रिया केलेल्या किंवा गोड खाद्यांऐवजी फळे, भाज्या व बदामांसारख्या पौष्टिक पर्यायांचा अवलंब करा.

बॉलिवुड अभिनेत्री सोहा अली खान म्हणाल्या, काम व कुटुंबामध्ये संतुलन राखणे आव्हानात्मक ठरू शकते, पण लहान, काळजीपूर्वक निवडी मोठा बदल घडवून आणू शकतात. मी नियमितपणे व्यायाम करते, संतुलित आहाराचे सेवन करते आणि तणाव व्यवस्थापन करते, ज्यामुळे उत्साहवर्धक राहण्यास मदत होते. मला उत्साहित ठेवणारी सोपी सवय म्हणजे मी दैनंदिन नित्यक्रमामध्ये मूठभर कॅलिफोर्निया बदामांचा समावेश करते. या बदामांमध्ये आवश्यक पौष्टिक घटक असतात, जे मला सेटवर दीर्घकाळपर्यंत उत्साहित राहण्यास मदत करतात.

लोकप्रिय दक्षिण भारतीय अभिनेत्री श्रीया सरन म्हणाल्या, लवकर उठणे, दीर्घकाळपर्यंत तालीम आणि व्यस्त शूटिंगमुळे तंदुरूस्त व उत्साहित राहणे फक्त निवड नसून आवश्यक आहे. याच कारणामुळे मी वर्कआऊट्स आणि आहारावर बारकाईने लक्ष देते. मला उत्साहित ठेवणारी सोपी सवय म्हणजे मी दैनंदिन नित्यक्रमामध्ये मूठभर कॅलिफोर्निया बदामांचा समावेश करते. या बदामांमध्ये काही आवश्यक पौष्टिक घटक असतात, जे मला दीर्घकाळापर्यंत सेटवर उत्साहित ठेवण्यास आणि एकूण आरोग्य उत्तम ठेवण्यास मदत करतात.

यंदा जागतिक आरोग्य दिन आठवण करून देतो की उत्तम आरोग्य प्रवास आहे, ज्याला विचारशील निवड आणि संतुलित पोषणामधून आकार मिळतो. आपल्या दैनंदिन आहारामध्ये कॅलिफोर्निया बदामांचा समावेश करणे हा आरोग्य उत्तम ठेवण्याच्या दिशेने सोपा, पण महत्त्वपूर्ण मार्ग आहे. परंपरा व विज्ञानाचे पाठबळ असलेले बदाम सोईस्कर, सर्वांगीण पद्धतीने आवश्यक पौष्टिक घटक देतात. चला तर मग, दीर्घकाळपर्यंत आपल्या शरीराला आतून पोषण देणाऱ्या बदामांचे सेवन करूया, एका वेळी एक मूठभर.

टाटा मोटर्सने भारतातील हरित मालवाहतूक क्रांतीसाठी मार्ग सुकर केला

नागपूर, २ एप्रिल : भारतातील ट्रकिंग क्षेत्र देशामध्ये जवळपास ६० टक्के मालवाहतूक करते. हे क्षेत्र झपाट्याने विस्तारीकरणासाठी सज्ज आहे. निती आयोग अहवालानुसार, मालवाहतूक मागणी २०५० पर्यंत चौपट होण्याची अपेक्षा आहे, जेथे ट्रक्सची संख्या २०२२ मधील ४ दशलक्षवरून १७ दशलक्षपर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे. ही वाढ आर्थिक प्रगतीसाठी महत्त्वाची असली तरी वाढत्या उत्सर्जनासह समस्या देखील वाढतील, जेथे ट्रक्समधून भारतातील परिवहनाशी संबंधित कार्बन उत्सर्जनापैकी जवळपास एक-तृतीयांश उत्सर्जन होते.

मालवाहतूक मागणी २०५० पर्यंत चौपट होण्यासह ट्रक्सची संख्या २०२२ मधील ४ दशलक्षवरून १७ दशलक्षपर्यंत पोहोचण्याच्या अपेक्षेसह शाश्वत मालवाहतूक सोल्यूशन्ससाठी गरज वाढली आहे. अहवालानुसार, ट्रक्समधून भारतातील परिवहनाशी संबंधित कार्बन डायऑक्साइड उत्सर्जनांपैकी जवळपास एक-तृतीयांश उत्सर्जन होते, ज्यामुळे व्यवसाय व पर्यावरणाच्या डिकार्बनायझेशनला प्राधान्य देण्याची गरज आहे.

टाटा मोटर्स मल्टी-फ्यूइल धोरणासह या परिवर्तनाचे नेतृत्व करत आहे, विविध कार्यचालन गरजांची पूर्तता करण्यासाठी बॅटरी-इलेक्ट्रिक, एलएनजी आणि हायड्रोजन-पॉवर्ड ट्रक्सना एकीकृत करत आहे. ''वन-साइज-फिट्स-ऑल दृष्टिकोन ट्रकिंगसाठी उपयुक्त ठरणार नाही. बॅटरी-इलेक्ट्रिक ट्रक्स लहान अंतरापर्यंतच्या कार्यसंचालनांसाठी उपयुक्त असले तरी सीएनजी, एलएनजी व हायड्रोजन लांब पल्ल्यापर्यंतच्या मालवाहतूकीसाठी बहुमूल्य सोल्यूशन्स देतात. हायड्रोजन-पॉवर्ड ट्रकिंग दीर्घकालीन ध्येय असताना मोठ्या प्रमाणात अवलंबनाला हळूहळू सुरूवात होईल, जेथे नजीकच्या काळात नॅचरल गॅसेस व हायड्रोजन इंटर्नल कम्बशन इंजिन्स (एच२-आयसीई) तंत्रज्ञान या परिवर्तनाचे नेतृत्व करतील,'' असे टाटा मोटर्सच्या ट्रक्स विभागाचे उपाध्यक्ष व व्यवसाय प्रमुख राजेश कौल म्हणाले.

''ट्रकिंगचे भविष्य उत्सर्जन कमी करण्यासोबत लाभक्षमता वाढवणाऱ्या सोल्यूशन्सवर अवलंबून आहे,'' असे श्री. कौल पुढे म्हणाले. ''शाश्वतता स्पर्धात्मक फायदा असली पाहिजे, ज्यामुळे व्यवसाय प्रगती करण्याची, तसेच त्यांचे कार्बन फूटप्रिंट कमी होण्याची खात्री मिळेल.''

सुस्पष्ट रोडमॅप आणि २०४५ पर्यंत निव्वळ-शून्य कार्बन उत्सर्जन संपादित करण्याप्रती कटिबद्धतेसह टाटा मोटर्स भारतातील अधिक शुद्ध, अधिक कार्यक्षम लॉजिस्टिक्सच्या भावी युगाला आकार देत आहे.

इलाईट सर्टिफिकेशन्स ॲन्ड इनोव्हेटीव्ह सोल्यूशन्स (ईसीआयएस) ने महाराष्ट्र स्तरावर संविधान विचार जागर स्पर्धा परीक्षा २०२५ ची केली घोषणा

नागपूर, २ एप्रिल : विविध धर्म, जाती, संस्कृती, भाषा यांमध्ये विखुरलेल्या भारतीय समाजाला एका सूत्रामध्ये बांधून स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाची हमी प्रत्येक भारतीयाला आपले संविधान देते. अशाच महान संवैधानिक मूल्यांचा जागर विद्यार्थी, युवक व नागरिकांमध्ये होण्यासाठी भारतीय संविधान विचार जागर स्पर्धेचे राज्यस्तरावर आयोजन केल्याची माहिती इलाईट सर्टीफिकेशन न्ड इनोव्हेटीव सोल्यूशन्सचे संचालक आबासाहेब थोरात व स्वप्ना थोरात यांनी पत्रकार परिषदेत दिली.

भारतीय संविधानास देशात लागू होऊन ७५ वर्षे पूर्ण झाली असून, आजच्या काळातही संवैधानिक मूल्ये ही तितकीच प्रासंगिक व औचित्यपूर्ण आहे. संवैधानिक मूल्ये खऱ्या अर्थाने जर विद्यार्थ्यांमध्ये खोलवर रुजली, तर भारत नक्कीच एक महाशक्ती बनल्याशिवाय राहणार नाही. हाच उद्देश डोळ्यासमोर ठेवून ही परीक्षा होणार असून विजेत्यांना लाखोंची बक्षिसे आणि प्रत्येक सहभागीस प्रमाणपत्र व पदक देण्यात येणार आहे.

परीक्षेबाबत अधिक माहिती देताना थोरात म्हणाले की, महाराष्ट्र स्तरावर होणाऱ्या या संविधान विचार जागर स्पर्धा परीक्षेत सहभागी प्रत्येक स्पर्धकाला संविधान पुस्तकाची प्रत मोफत दिली जाणार आहे. स्पर्धकांसाठी तीन गट केले असून गट अ इयत्ता सातवी ते दहावी, गट ब ११ ते पदवी तसेच गट क सर्वांसाठी खुला आहे. स्पर्धेत सहभागासाठी ऑनलाईन नोंदणी आवश्यक असून यासाठी संस्थेचे www.ecisindia.com हे संकेतस्थळ उपलब्ध आहे. तीनही गटांमध्ये बक्षिसे विभागून दिली जातील. प्रथम पारितोषिक तीन लाख, द्वितीय पारितोषिक दोन लाख, तर तृतीय पारितोषिक एक लाख रुपये रोख असणार आहे. याशिवाय उत्तेजनार्थ भरघोस बक्षीसे देण्यात येणार आहेत. संविधान विचार जागर स्पर्धा परीक्षा २०२५ बद्दल अधिक माहितीसाठी कृपया ९१७२७ ६४७०७, ०२५३ ४०३४०८२ या क्रमांकावर संपर्क करावा असे आवाहन करण्यात आलेले आहे

राज्यस्तरावर होणाऱ्या या स्पर्धेत जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी होऊन संविधानाबाबत साक्षर होण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलने दिले रुग्णाला जीवनदान

चंद्रपूर, २ एप्रिल : नागपूरस्थित मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल येथील डॉक्टरांनी रुग्णालयात भरती झालेल्या काँगो देशातील २८ वर्षीय रुग्णाचा मुखातील कर्करोगाचा ट्युमर यशस्वीरीत्या काढून त्याला जीवनदान दिले आहे. चौथ्या स्टेजमधील मुखाचा कर्करोग असलेल्या या रुग्णाचा मुखातील हा ट्युमर मोबाईल फोनच्या आकाराचा होता जो तब्बल १५ सेमी ८ सेमी एवढा मोठा होता. हा ट्युमर रुग्णाच्या खालच्या जबड्यात होता आणि तो काढण्यासाठी आठ तासांची जटिल शस्त्रक्रिया करण्यात आली.

डेमोक्रॅटिक रिपब्लिक ऑफ काँगोतील रहिवासी श्री. जॉन यांच्या खालच्या जबड्यात काही महिन्यांपासून वेगाने वाढणारी गाठ दिसत होती आणि सातत्याने ती दुखत होती. वैद्यकीय मदतीसाठी त्यांनी नवी दिल्ली गाठली, तिथे त्यांच्या जबड्याच्या हाडामध्ये कर्करोगाचा ट्युमर असल्याचे निदान झाले आणि त्वरित विशेष उपचारांची गरज असल्याचे सांगण्यात आले. काँगोतील त्यांच्या एका ओळखीच्या व्यक्तीने त्यांना नागपूर येथील मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये डॉ. अभिनव देशपांडे यांच्याकडे उपचार घेण्याचा सल्ला दिला. संबधित व्यक्तीच्या नातेवाईकाची डॉ. अभिनव देशपांडे यांनी यशस्वी कर्करोग शस्त्रक्रिया केली होती हे विशेष!

जॉन यांची देखील ही जटिल शस्त्रक्रिया नागपूरस्थित मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या सर्जिकल ऑन्कोलॉजी आणि रोबोटिक ऑन्को सर्जरी विभागाचे संचालक व तज्ञ डॉ. अभिनव देशपांडे आणि प्लॅस्टिक सर्जरी विभागाच्या टीमने यशस्वीरीत्या पूर्ण केली.

रुग्ण जेव्हा नागपूर येथील मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल येथे पोहोचला, तेव्हा त्याला डाव्या गालावर गाठ, जास्त लाळ येणे, डाव्या बाजूच्या दातांना स्पर्श करताना सौम्य वेदना जाणवणे, तोंड व्यवस्थित न उघडता येणे अशा समस्या जाणवत होत्या आणि गेल्या एका महिन्यापासून त्यांना अर्धवट द्रव आहार घ्यावा लागत होता.

या प्रकरणाबद्दल बोलताना, डॉ. अभिनव देशपांडे म्हणाले, या ट्युमरचा आकार मोठा आणि वेगाने वाढणारा असल्यामुळे ही केस खूप आव्हानात्मक होती. आमचे उद्दिष्ट होते की संपूर्ण कर्करोगाच काढून टाकत रुग्णाच्या खाण्याची आणि , बोलण्याची क्षमता संरक्षित करणे जेणेकरून त्याला सामान्य जीवन जगणे शक्य होईल.

रुग्णाच्या प्रकृतीचे पूर्ण मूल्यांकन केल्यानंतर, भूलतज्ज्ञ आणि प्लॅस्टिक सर्जरी विभागाच्या तज्ञ डॉक्टरांच्या मदतीने ही क्लिष्ट शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आली. डॉ. श्रीधर पिल्लेवान आणि डॉ. तरुण देशभरतार यांच्या नेतृत्वाखालील टीमने रुग्णाच्या पायातील हाड वापरून खालचा जबडा पुन्हा तयार केला.

शस्त्रक्रियेनंतर रुग्णाच्या प्रकृतीत चांगली सुधारणा झाल्याने दहाव्या दिवशी त्यांना रुग्णालयातून सुटी देण्यात आली. सध्या ते पुढील उपचारासाठी ऍडजुवंट केमोथेरपी घेत आहे, ज्यामुळे कॅन्सरच्या उरलेल्या पेशी नष्ट होतील आणि आजार पुन्हा होण्याचा धोका कमी होईल. त्यांचे बोलणे खूप सुधारले असून ते आता सामान्य आहार घेत आहे.

डॉ. देशपांडे पुढे म्हणाले, ही जटिल शस्त्रक्रिया यशस्वी झाल्याने आम्हाला आनंद झाला आहे. या उपचारामुळे रुग्णाला नवीन जीवन मिळाले आहे.

१८ एप्रिल रोजी प्रदर्शित होणाऱ्या सुशीला-सुजीतच्या ट्रेलरचे प्रकाशन

नागपूर, २ एप्रिल : स्वप्नील जोशी, सोनाली कुलकर्णी आणि प्रसाद ओक यांच्या भूमिका आणि त्यांचे पहिल्यांदाच एकत्र येणे, यामुळे चर्चेत असलेल्या सुशीला सुजीत च्या नव्याने आलेल्या ट्रेलरमुळे प्रेक्षकांची उत्कंठा शिगेला पोहोचली आहे. या ट्रेलरमधील धमाल प्रसंग प्रेक्षकांचा प्रचंड प्रतिसाद मिळवत आहेत. एका शानदार समारंभात मंगळवारी या ट्रेलरचे प्रकाशन झाले. उंची निर्मितीमूल्ये, दमदार अभिनय, खुमासदार प्रसंग आणि खिळवून ठेवणारे संवाद ही सुशीला-सुजीतची वैशिष्ट्ये या ट्रेलरमधून अधोरेखित होतात. चित्रपट १८ एप्रिल रोजी सर्वत्र प्रदर्शित होत आहे.

या ट्रेलर मधून काहीतरी भन्नाट पाहायला मिळणार, हे नक्की. एक आई पोलिसांकडे जाते आणि आपला मुलगा हरवलाय म्हणून तक्रार करते. पोलिस तिला घरात भांडण वगैरे काही झालं होतं का, म्हणून विचारतात. पार्श्वभूमीवर आवाज येतो की, मुलगा हरवलेल्या गोष्टीला तब्बल ३५ तास उलटून गेलेत.

पंचशील एन्टरटेन्मेंट आणि बिग ब्रेन प्रॉडक्शन्स ने या चित्रपटाची निर्मिती केली आहे. चित्रपटाचे वितरण पॅनोरमा स्टुडीओजचे असून चित्रपटाची कथा व दिग्दर्शन प्रसाद ओक यांचे आहे. पटकथा व संवाद अजय कांबळे यांचे आहेत. प्रसाद ओक, मंजिरी ओक, स्वप्नील जोशी, संजय मेमाणे, निलेश राठी हे चित्रपटाचे निर्माते आहेत.

कच्चा लिंबू, हिरकणी, चंद्रमुखी या यशस्वी चित्रपटांच्या दिग्दर्शनानंतर प्रसाद ओक दिग्दर्शन करत असलेला हा नवा चित्रपट आहे.

सुशीला-सुजीतच्या नावापासूनच त्याचे वेगळेपण अधोरेखित होते. अनेक गोष्टी या चित्रपटाच्या माध्यमातून पहिल्यांदाच होत आहेत. स्वप्नील जोशी, सोनाली कुलकर्णी आणि प्रसाद ओक पहिल्यांदाच एकत्र येत असल्याने रसिकांसाठी हा एक वेगळा अनुभव असणार आहे.

चित्रपटाचे पोस्टर, प्रसारगीत, टिझर यांना मोठा प्रतिसाद प्रेक्षकांनी दिला होता. आता ट्रेलरच्या माध्यमातून प्रतीक्षा शिगेला पोहोचली आहे आणि तशा प्रतिक्रिया सुद्धा आम्हाला मिळत आहेत, असे उद्गार प्रसाद ओक यांनी काढले.

स्वप्नील जोशी म्हणाला, हा चित्रपट निखळ करमणुकीची हमी देतो. ट्रेलर पाहिल्यावर हे मनोमन पटल्याशिवाय राहत नाही.

ऍक्सिस बँक एनबीबीएलच्या भारत कनेक्टवर फॉर्च्युन ५०० कंपनीसाठी अग्रगण्य बी२बी संकलन सोल्यूशन सुरू करणारी पहिली बँक बनली

नागपूर, २ एप्रिल : भारतातील आघाडीच्या खासगी बँकांपैकी एक असलेल्या ऍक्सिस बँकेने आज जाहीर केले की, तिने भारतातील एका फॉर्च्यून ५०० कंपनीसोबत भागीदारी केली आहे, ज्यामुळे एनबीबीएलच्या भारत कनेक्ट (आधीची बीबीपीएस) चा वापर करून बी२बी संकलन सेवा प्रदान केली जाईल. यासह, ऍक्सिस बँक ही या अग्रगण्य सोल्यूशनची अंमलबजावणी करणारी आणि उत्कृष्ट, मजबूत एपीआय स्टॅकचा लाभ घेऊन प्रत्यक्षात कार्यान्वित करणारी पहिली बँक ठरली आहे.

हा सोल्यूशन विविध क्षेत्रांतील अनेक ऑर्डरिंग ॲप्लिकेशन्सला एकत्रित करू शकतो; एफएमसीजी, फार्मा, ऑटोमोटिव्ह, हेल्थकेअर, ज्यामुळे कंपनीच्या होलसेल वितरकांना आणि स्टॉकिस्टसाठी संकलन सुलभ होते. किरकोळ विक्रेते थेट ॲप्लिकेशनमधून इन्वॉईस पेमेंट्स सुरू करू शकतात. बिलर ऑपरेटिंग युनिट म्हणून ही अनोखी सेवा देऊ करणारी ऍक्सिस बँक ही सहज, चपळ, स्केलेबल आणि कस्टमायझेबल सोल्यूशन विकसित करण्यास सक्षम आहे आणि एनबीबीएल भारत बिलपेमधून समर्थन प्राप्त करत आहे.

लॉंचवर टिप्पणी करताना, नीरज गांभीर, ग्रुप एक्झिक्युटिव्ह आणि हेड - ट्रेझरी, मार्केट्स आणि होलसेल बँकिंग प्रोडक्ट्स, ऍक्सिस बँक यांनी सांगितले, या कॉर्पोरेटसोबत आम्ही पहिल्यांदाच बी२बी संकलन सोल्यूशन विकसित केले आहे, हे आमच्या सर्वोत्तम-इन-क्लास कॉर्पोरेट एपीआय बँकिंग स्टॅकचे प्रमाण आहे.

नूपूर चतुर्वेदी, सीईओ, एनपीसीआय भारत बिलपे लिमिटेड (एनबीबीएल) यांनी सांगितले, भारत कनेक्ट व्यवसाय ते व्यवसाय (बी२बी) इन्वॉईस पेमेंट आणि वित्तपुरवठा प्लॅटफॉर्मची ओळख करून त्याच्या दृष्टिकोनाचा विस्तार करत आहे, ज्याचा उद्देश मोठ्या पुरवठा साखळी आणि वितरण नेटवर्कचे मॅन्युअल प्रक्रिया सुलभ करणे आहे. आम्ही ऍक्सिस बँकला आमचा प्रमुख भागीदार म्हणून आणि विस्तारित सोल्यूशनसह प्रत्यक्षात जाणारी पहिली बँक म्हणून सहभागी करून घेण्यास आनंदित आहोत.

जैन रिसोर्स रीसायकलिंग लिमिटेडने आयपीओसाठी सेबीकडे दाखल केले डीआरएचपी

नागपूर, २ एप्रिल : जैन रिसोर्स रीसायकलिंग लिमिटेड, ही भारतातील सर्वात मोठी आणि जलद वाढणारी नॉन-फेरस मेटल रीसायकलिंग कंपनी आहे. कंपनी आर्थिक वर्ष २०२४, २०२३ आणि २०२२ मध्ये महसुलाच्या दृष्टीने आघाडीवर आहे (स्रोत: CRISIL), तिने सेबीकडे प्रारंभिक सार्वजनिक ऑफर साठी ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस दाखल केला आहे.

सार्वजनिक ऑफर, ज्यामध्ये २,००० कोटींपर्यंतची रक्कम असणार आहे, त्यामध्ये छ५०० कोटींपर्यंत नवीन समभागांचा समावेश जारी आहे आणि १,५०० कोटींपर्यंतची ऑफर फॉर सेल आहे.

ऑफर फॉर सेलमध्ये १,४३० कोटींपर्यंत समभागांची विक्री कमलेश जैन (प्रमोटर सेलिंग शेअरहोल्डर) यांच्याकडून होईल, तर ७० कोटींपर्यंत समभागांची विक्री मयांक परीक (इतर सेलिंग शेअरहोल्डर) यांच्याकडून होईल.

कमलेश जैन हे कंपनीचे प्रमोटर आहेत. सात दशके समृद्ध वारसा लाभलेल्या जैन मेटल ग्रुपने भारतातील नॉन-फेरस मेटल रीसायकलिंग आणि उत्पादनामध्ये एक अग्रगण्य संस्था म्हणून आपले स्थान निर्माण केले आहे. (स्रोत: CRISIL). जैन रिसोर्स रीसायकलिंग लिमिटेड मुख्यतः नॉन-फेरस मेटल स्क्रॅपच्या रीसायकलिंगद्वारे नॉन-फेरस मेटल उत्पादने तयार करण्यावर लक्ष केंद्रित करते. कंपनीच्या उत्पादन पोर्टफोलिओमध्ये (१) लीड आणि लीड अलॉय इन्गॉट्स; (२) कॉपर आणि कॉपर इन्गॉट्स; आणि (३) ल्युमिनियम आणि ल्युमिनियम लॉयज यांचा समावेश आहे. कंपनी ही भारतातील दोन रीसायकलिंग कंपन्यांपैकी एक आहे, जी तिच्या लीड इन्गॉटला लंडन मेटल एक्सचेंजवर एक ब्रँड म्हणून नोंदविते (स्रोत: CRISIL), ज्यामुळे कंपनीला आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मानकांनुसार उत्पादने ऑफर करून, विस्तृत ग्राहक वर्गात प्रवेश मिळविण्याचा एक स्पष्ट फायदा होतो, तसेच ग्लोबल मार्केट्समध्ये तिच्या उत्पादनांच्या पुरवठ्याशी संबंधित एलएमई संदर्भ मूल्यांकनाचा फायदाही मिळतो.

जैन रिसोर्स रीसायकलिंग लिमिटेड कंपनीने घेतलेल्या काही प्रलंबित कर्जांच्या पूर्व-पेमेंट किंवा अनुसूचित पुनर्भरणासाठी आणि सामान्य कॉर्पोरेट हेतूसाठी निव्वळ रक्कम वापरण्याचा प्रस्ताव ठेवला आहे.

DAM कॅपिटल डव्हायझर्स लिमिटेड, ICICI सिक्योरिटीज लिमिटेड, मोतीलाल ओसवाल इन्व्हेस्टमेंट डव्हायझर्स लिमिटेड आणि PL कॅपिटल मार्केट्स प्रायव्हेट लिमिटेड हे इश्यूचे बुक रनिंग लीड मॅनेजर्स आहेत.

आज का अंदाज

गुरूवार ३ एप्रिल २०२५

पत्थर फोड एकच

कल्याण बाजार				मुंबई बाजार			
१	४	५	८	२	५	६	७
५८८	१६७	१६८	१७०	३९०	३६६	१५०	४५८
१५५	२२०	३४८	३६९	२२८	४४७	२६८	१८८
२९०	३५६	२३०	२६०	११०	२४९	७९०	२६९
१३	४३	५६	८२	२४	५४	६८	७८
१०	४०	५९	८६	२०	५०	६३	७३
१७	४७	५२	८९	२१	५१	६९	७९

३ एप्रिल : सर्व बाजारांसाठी

२१	३१	६०	९०
२४	३४	६८	९८
२७	३७	६६	९४

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४

जाहिरात

पवित्र प्रणालीव्दारे शिक्षक भरती (टप्पा-2)

जयदुर्गा आदिवासी ग्रामविकास संस्था जमनापूर ता.देवरी, जि. गोंदिया (271103SC002) र.नं. 166/91

सुशील आदिवासी पूर्व माध्य. शाळा जमनापूर ता. देवरी, जि गोंदिया (खाजगी अनुदानीत) या शाळा मध्ये पवित्र पोर्टल प्रणाली (टप्पा-२) द्वारे शिक्षक भती भर्ती प्रक्रिया सुरु होत असल्यामुळे पवित्र प्रणाली मध्ये नोंदणी केलेल्या पदासाठी शैक्षणीक व व्यावसायीक अर्हता धारण करित असलेल्या पात्र उमेद्वारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविलात येत आहे.

अ. क्र.	माध्यम	पद	वेतनश्रेणी/ मानधन	अनुदान प्रकार	विषय	शिकवण्याचे माध्यम	आवश्यक शैक्षणिक पात्रता	आवश्यक व्यवसायिक पात्रता	TET/CTET	एकूण पदे
१	Marathi	Graduate Teacher std (6-8)	Consolidated Pay-GT 6-8 (16000)	Aided	Mathematics Science	Marathi	Graduation	Diploma/ Graduation	TET Paper 2 (Maths - Science)/ CTET Paper 2 (Maths -Science)	1
									Total	1

समांतर आरक्षण निहाय रिक्त पदाचा तपशिल - अनुसुचित जमाती-१

महत्वाची सूचना :- १) वरिल सर्व पदासाठी शिक्षक भरती संदर्भात पवित्र पोर्टलवर दिलेल्या अटी व नियम सर्व उमेद्वारांसाठी बंधनकारक आहे. २) अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी 2022 (TAIT) प्रविष्ट झालेल्या उमेद्वारांपैकी ज्या उमेद्वारांनी पवित्र पोर्टल (http://tait.mahateacherrecruitment.org.in) या संकेत स्थळावर वैयक्तीक माहिती नोंदवून स्वप्रमाणित केलेली आहे. तसेच उमेद्वार जाहिरातीनुसार अर्ज करु शकतील. ३) शिक्षण सेवक भरती पवित्र पोर्टल टप्पा २ करिता अर्ज करणाऱ्या उमेद्वारांनी पदभरतीसाठी पवित्र पोर्टलच्या संकेत स्थळाला भेट द्यावी.

सचिव
जयदुर्गा आदिवासी ग्रामविकास संस्था
जमानापूर ता.देवरी, जि.गोंदिया

शब्दकोडे क्रमांक २०७४



आडवे शब्द :-

१) दारिद्र्य येणे (वा.प्र.)
६) उणीव
१०) शारीरिक त्रिदोष
१२) सर्प
१३) चा मुलगा
१६) स्वत:ला
१७) नकला करणारा
१९) वर्तन
२१) विशेष
२२) नंतर
२३) वल्लरी
२४) शिजविलेले तांदूळ
२५) अत्तराचा फाया ठेवण्याचे पात्र
२६) संयमन, दाबून टाकणे
२८) तपस्या
३०) वकिलाला दिलेले अधिकारपत्र
३३) कडू चव
३५) कणीदार पीठ
३७) कापडाला लावलेली चुणीदार पट्टी
३८) टरफल
३९) बेचव, पचपचीत
४१) बाजेला विणण्याची सुती पट्टी
४३) प्रतिष्ठित
४५) विपत्तीची कहाणी
४६) पुष्परस
४८) छोटासा
५०) संगीतातील एक राग
५२) दुबळा, गरीब
५३) अरण्य
५५) टिंगल
५७) मध्यस्थ, पंच
५८) हत्ती
६०) छोटा खड्डा
६१) रडणारा
६२) हिन्दुस्थान
६३) पती
६५) चिकटविणे
६७) फौजदार
६९) ताबडतोब
७०) खबदडी
७२) उणीव, तोटा, वाण
७३) अवाजवी नाव
७४) मीठ
७५) दहावी रास
७६) गाय

उभे शब्द :-

१) दीड शहाणा माणूस (वा.प्र.)
२) देव
३) चक्र
४) अपस्मार रोग
५) पोपट
६) पिंगट रंगाची गाय
७) माजलेला
८) रक्षण करणारा
९) उदबत्ती
११) अंधार
१२) चौक
१४) मनाचा ओढा
१५) एका बाजूस झुकलेला
१७) पालिकेतील सदस्य
१८) पेरणी, एक गीत प्रकार
२०) हालचाल
२१) आचारी
२२) धुंद
२५) समजण्यास कठिण, दुर्बोध
२७) एक मोठे चर्मवाद्य
२९) कोलहापुरचे एक नाव
३१) खेकडा
३२) विविध
३४) पृष्ठभागावरील तुकडा
३६) कडक व चिवट
३८) लहान
४०) एकाच काळातले
४२) विहीरीतून पाणी काढण्याचे जोडसाधन
४३) मत्स्य
४४) जावळा
४७) द्रव्य
४९) पुरुष
५१) नवप्रवेशित
५४) नट्टापट्टा
५६) पेडणे गावचा रहिवासी
५९) सांभाळ
६१) सूर्याचे एक नाव
६२) वेत्रधारी
६४) दावानल
६६) केर
६७) चंद्राची कड
६८) वाद्य वाजविणारा
६९) बारीक केस
७१) उत्तीर्ण, (इं.)

(उत्तर उद्याच्या अंकात)

मागील शब्दकोड्याचे उत्तर



महत्त्वाचे

"झापुक झुपूक" पोस्टर पाहून चित्रपटाची उत्सुकता शिगेला

नाशिक । जिओ स्टुडिओज् प्रस्तुत, केदार शिंदे प्रोडक्शन्स निर्मित, निर्माती ज्योती देशपांडे, निर्माती बेला शिंदे, केदार शिंदे दिग्दर्शित "झापुक झुपूक" या सिनेमाची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत आहेत. दमदार टिझर आणि पोस्टर नंतर आता आणखी एक नवा धमाकेदार पोस्टर प्रेक्षकांच्या भेटीला आलाय. फॅमिली एंटरटेनमेंटचा जबरदस्त तडका असलेल्या "झापुक झुपूक" या चित्रपटाच्या ह्या नव्या पोस्टरमध्ये मराठी मालिका विश्वातील लोकप्रिय चेहरे पहायला मिळत आहेत. या चित्रपटात सूरज चव्हाणसह लोकप्रिय इतर कलाकार कल्ला करताना दिसणार आहेत. यामध्ये 'पिरतीचा वनवा उरली पेटला' मालिकेतील इंद्रनील कामत, हेमंत फरांदे, 'अबीर गुलाल' मालिकेतील पायल जाधव, 'तुमची मुलगी काय करते' मालिकेतील जुई भागवत आणि दीपाली पानसरे, तसेच पुष्कराज चिरपुटकर, मिलिंद गवळी हे मुख्य भूमिकेत झळकणार आहेत. पोस्टरमध्ये आपण पाहू शकतो सूरज बैलगाडी ओढत आहे तर त्याच बैलगाडीवर बाकी सर्व कलाकार स्वार आहेत. सर्व कलाकारांच्या चेहऱ्यावर हसू आहे. ज्यामुळे नक्की चित्रपटाची कहाणी काय असणार आहे याची सर्वांना उत्सुकता आहे. आपल्या अभिनय कौशल्याने प्रेक्षकांचं मनोरंजन करणारे उत्तम युवा अभिनेत्यांमुळे हा चित्रपट नक्कीच सध्याची युवा पिढी आणि सिनेप्रेमींच्या पसंतीस उतरणार आहे. इतकच नव्हे तर गुढीपाडव्यानिमित्त डोंबिवलीच्या शोभायात्रेत सूरज चव्हाण सहभागी झाला होता, यावेळी त्याने आपल्या हटके अंदाज आणि डान्सने चाहत्यांची मनं जिंकली. एकंदरीतच हे सर्व कलाकार मोठ्या पद्यावर धमाल करणार आहे आणि त्यांच्या आयुष्यातील धमाल मस्ती प्रेक्षकांना अनुभवता येणार आहे.

शंकराचार्य श्रीश्री भारतीतीर्थ महास्वामी यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त

वज्रोत्सव भारती कार्यक्रमास प्रारंभ

नाशिक । श्री शारदापीठाधीश्वर जगद्गुरू शंकराचार्य श्री श्री भारतीतीर्थ महास्वामीजी यांच्या अमृतमहोत्सवा निमित्त आज १ एप्रिल पासून तीन दिवस श्री श्रृंगेरी शंकराचार्य मठ, सरदार चौक, श्री काळाराम मंदिर रोड, पंचवटी येथे वज्रोत्सव भारती कार्यक्रम, चतुर्वेद संहिता पारायण व अमृत महामृत्युंजय याग, वैदिक विद्वानांचा सन्मान सोहळा यासह विविध धार्मिक कार्यक्रमांस प्रारंभ झाला.

जगद्गुरु शंकराचार्य श्री श्री भारत तीर्थ महास्वामीजी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त शृंगेरी पंचवटी मठ येथे व्यवस्थापक रामगोपाल अय्यर व सौ कमला अय्यर यांच्या हस्ते विश्व कल्याण अर्थ प्रधान संकल्प करण्यात आला याप्रसंगी जगद्गुरूंच्या चरण पादुका स्थापन करून दक्षिणाम् नाय जगद्गुरुंची वृदावली संपन्न करून चारही वेदांच्या पारायणाला प्रारंभ करण्यात आला वेदाचार्य रवींद्र पैठणे गुरुजी यांनी प्रधान संकल्प निवेदन करून गणपती पूजन, पुण्याहवाचन, मातृका पूजन, नांदी श्राद्ध, अग्नि मंथन पूर्वक अग्निस्थापन, सर्वतोभद्र मंडल स्थापन, लघुरुद्र महा अभिषेक, बिल्वार्चन नवग्रह

होम संपन्न करण्यात आले , अशी माहिती श्री शृंगेरी शंकराचार्य मठ पंचवटीचे ऑनररी व्यवस्थापक रामगोपाल व्ही अय्यर यांनी दिली. ऋग्वेद पारायण साठी पुणे येथील घनपाठी अमरदीप कुरुंभट्टे, शुक्ल यजुर्वेद पारायण यासाठी आळंदी येथील घनपाठी वेदमूर्ती निखिल प्रसादे, कृष्ण यजुर्वेद पारायणासाठी कर्नाटक येथून घनपाठी वेदमूर्ती दत्तप्रसाद शर्मा, सामवेद पारायणा साठी वेदमूर्ती श्रीकृष्ण पळसकर, अथर्ववेद पारायणा साठी वेदमूर्ती दिनकर जोशी गुरुजी यांनी प्रारंभ केला.

या कार्यक्रमांमध्ये वेदमूर्ती दिनेश गायधनी, व २१ ब्रह्मवृंद सहकारी आहेत. तसेच उद्या अमृत मृत्युंजय महायाग पूर्णाहूती व सायंकाळी हरिभक्ति परायण श्री पंडित गुरुजी यांचे जाहीर हरिकीर्तन होणार आहे त्यावेळी चारही वैदिकांचा सन्मान सोहळा संपन्न होईल.

चैत्र शुद्ध पंचमी बुधवार दि. २ एप्रिल, सकाळी ९.०० वा. चतुर्वेद संहिता शेष पारायण होईल, यात चतुर्वेदोक्त शांतीसूक्त संकल्प, प्रातः पूजन, लघुरुद्राभिषेक, अमृत मृत्युंजय हवन, सप्त चिरंजीव हवन, मार्कंडेय हवन, उत्तरांग बलिदान पूर्णाहुती, गुरू पादपूजा, महाआरती इ. कार्यक्रम होतील. आणि चैत्र शुद्ध षष्ठी गुरूवार दि. ३ एप्रिल २०२५, सकाळी चतुर्वेद संहिता पारायण सांगता होईल. सकाळी ७.३० पासून महागणपती हवन, लघुरुद्राभिषेक, नवग्रह हवन, अमृत मृत्युंजय हवन, नक्षत्र हवन, आयुष्य मंत्र हवन, श्री सूक्त हवन, गुरू पादपूजा, महाआरती इ. कार्यक्रम होतील. त्याच प्रमाणे महाप्रसाद वाटप दररोज दुपारी १.३० वा. होईल. त्याचप्रमाणे सामाजिक उपक्रमात विविध शाळांना वस्तू वाटप, कन्या पूजन, कीर्तन आदी कार्यक्रम होणार आहेत. तीन दिवस चालणाऱ्या या धार्मिक कार्यक्रमास सर्वांनी सहपरिवार आणि स्नेहीजनांसह उपस्थित रहावे. महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री श्रृंगेरी मठातर्फे करण्यात आले आहे.

अबब...जिल्हा बँकेत चक्क ५० लाख जमा!

जिल्हा बँकेत वसुली व ठेवीचा ओघ

नाशिक । राज्यातील शेतकऱ्यांना निवडणुकीपूर्वी कर्जमाफी करण्याची घोषणा केल्यावर आता सत्तेत आल्यावर सरकारने अचानक यु टर्न घेतला. त्यामुळे राज्यातील अनेक जिल्ह्यात वसुलीसाठी आलेल्या कर्मचाऱ्यांना फटके मारण्याची प्रतिक्रिया उमटत आहे. पण नाशिक जिल्ह्यात मात्र या उलट प्रकार घडल्याचे दिसून आले. एका ठिकाणी वसुलीसाठी गेलेल्या वसुली पथकास चक्क पन्नास लाख रुपये रोख रक्कम देऊन त्यांची रवानगी करण्यात आली.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या सलग्न लोनजाई माता वि.का.सेवा सोसायटी लि.सोनेवाडी ता.निफाड या संस्थेच्या सभासदांनी थकबाकी पोटी चक्क पन्नास लाख रूपये भरल्याने जिल्ह्यात तो चर्चेचा विषय ठरला आहे. एनपीए वसुल रोख मिळाल्याने कर्मचारीही सुखावले. या वसुलीसाठी बँकेचे जनरल मॅनेजर रत्नाकर हिरे, मॅनेजर ज्ञानेश्वर वाटपाडे, मुख्याधिकारी आनंद गरुड, जगदिश मोरे, कैलास निरगुडे, किशोर ठोंबरे यांनी विशेष प्रयत्न केले. सदर कामकाजासाठी बँकेचे प्रशासक प्रतापसिंह चव्हाण, मुख्य कार्यकारी अधिकारी अरविंद शिंदे यांनी मोलाचे सहकार्य केले.

थकबाकीदारांनी बँकेस सहकार्य करावे

कर्जमाफी होईल या भोळ्या अपेक्षेवर असलेल्या येणेबाकी व थकबाकीदार सभासदांनी आपल्याकडील कर्ज व्याजासहित भरणा करून बँकेस सहकार्य करावे. तसेच चालू हंगामात भरणा करणाऱ्या सभासदांनी खरीप हंगाम २०२५-२६ सांठी कर्ज घ्यावे. तसेच ३१-०३-२०२१ अखेर थकबाकीदार सभासदांनी एकरकमी योजनेचा लाभ घेऊन पुढील होणाऱ्या कार्यवाही थांबवावी.

- कैलास निरगुडे,
माजी सेवक संचालक, जिल्हा बँक, नासिक

विशाल पांगरकर यांचा कांद्याचा पहिला कंटेनर दुबई रवाना

नाशिक । जिल्हातील कसमादे खासगी कृषी उत्पन्न बाजार समिती सटाणा येथून दुबई साठी शेअर किंग प्रायव्हेट लिमिटेडचे संचालक तरुण युवा उद्योजक विशाल पांगरकर यांचा कांद्याचा पहिला कंटनेर मंगळवारी (दि.१) श्रीफळ वाढवत रवाना झाला. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचालक गणेश पवार, भारत क्रांति मिशन मुख्य समन्वयक, छावा मराठा संघटनेचे प्रदेशाध्यक्ष डॉ विलास पांगरकर, मराठा क्रांती मोर्चा संभाजीनगर व भारत क्रांती मिशनचे समन्वयक विजय काकडे पाटील, अमोल काकडे, आंतरराष्ट्रीय व्यापार अभ्यासक श्रीकांत भंडारकर, नंदू पाटील , सतीश पाटील, अमोल पाटील टकले, विजय ननवरे, अमोल सोनवणे आदी उपस्थित होते. मराठी तरुण उद्योजकांनी अशाप्रकारे शेती विषयक उद्योगांमध्ये येऊन भरभराटी करून साता समुद्रापार आपला उद्योग व्यवसाय वाढावा अशी सदिच्छा डॉ विलास पांगारकर यांनी दिली.

सटाणा मार्केट निवडणूक प्रस्थापितांना 'दे धक्का'

(अशोक थोरात यांजकडून)

सटाणा । येथील कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणुकीत प्रस्थापितांना जोराचा धक्का देण्याचे काम मतदारांनी केले. या निवडणुकीत मार्केटचे माजी चेअरमन नानाजी दळवी, जेष्ट नेते डॉ.विलास बच्छाव, लखमापुरचे माजी सरपंच व हेवी वेट नेते केवळ दळवी, सटाण्याचे माजी नगराध्यक्ष पांडुनाना सोनवणे यांचा पराभव म्हणजे प्रस्थापितांना जनतेने नाकारले हेच दिसते.

बऱ्याच गमती जमती झाल्या व एकमेकाचे तोंड न बघणारे विळ्या भोपळ्याचे नाते असलेले एकत्र आले, तेंव्हाच तालुकाभर विजयबद्दल शंका घेतल्या जात होत्या. प्रशांत बच्छाव म्हणजे हमखास विजय हे समीकरण बदलुन टाकणारी निवडणुक झाली. डावपेचात एकमेकाचे विरोधक एकत्र आले व त्यांनी पॅनल बनवले व तिच धोक्याची घंटा होती. लखमापुरातुन सोसायटी गटात सात पैकी तिन उमेदवार हेच मतदारांना पटले नाही. खरे तर निवडणुक सुरू झाल्यानंतर एकमेकाचे दोर कापले जाणार होते. चेअरमन पदाचे दावेदार काटा काटी करणार हा अंदाज होताच. वर्षानुवर्ष दुष्मनी जपणारे अचानक दोस्त होतात ते दोघांच्या समर्थकांना राग येणारे

असते. कारण याच नेत्यांना खुर्ची मिळावी या साठी त्रास भोगलेले आपोआप संतापतात. कारण नेत्यांना हवी खुर्ची. मतदारांना विकत घेऊ माझे वजन काय या भ्रमात रहाण्याचे दिवस संपले हे या निवडणुकीत दिसुन आले. तेच तेच चेहरे आता मतदार नाकारतात. बरीच वर्ष लखमापुर, ब्राम्हणगाव व सटाणा यांनी मोठ्या सत्ता उपभोगल्या व त्यात लखमापुरात झालेले मनोमिलन कुणालाच मान्य नव्हते व मतदारांनी लखमापुरचे वजनदार नेते पराभुत केले. या उलट डांगसौंदाणे, विरगाव पट्टा जोमात होता. त्यांनी आपला पट्टा ओळखुन मतदान केले. आता पैसे वाटले म्हटले जाईल, पण पैसे सर्वांनीच वाटले.

काहींनी कदाचित चेअरमन होण्यासाठी एक मत वैयक्तीक विकत घेतले असेल. पण मतदार आलेल्या लक्ष्मीला स्विकारतेच. म्हणजे सर्वांचे घेतात व टाळुन टाळुन मतदान बरोबर करतात. आता कुणीच स्वतःला मोठा नेता समजु नये हे संकेत मिळाले आहेत. या निवडणुकीत मतदारा व्यतीरीक्त कुणालाच विश्वासात घेतले नाही. म्हणजे अनेकांनी मौन पाळले. आपल्याला कुणी साधे विचारत नाही, मग निवडोत नाही तर पडोत काही घेणे नाही असे जनमत दिसुन आले. सत्तेसाठी अचानक केलेल्या तडजोडी यशस्वी होत नाहीत हे या निवडणुकीने दाखवले. या निवडणुकीत सर्वात मोठा धक्का बसला लखमापुर गावाला. जुने वैर विसरून एकत्र आलेल्यांना मतदारांनी बरोबर जोराचा झटका दिला हे नक्की. भविष्यात मतदारांना सहज हलक्यात घेऊ नका हा संदेश मिळाला. आता मार्केटची अवस्था कशी राहील देवच जाणो. संजय सोनवणे, मुलगा व आता पत्नी तिघांची नावे चेअरमन पदावर लागलेली दिसतील हे नक्की. लखमापुरचे प्रतिनिधी सतत होते, पण आता लखमापुरला बाजुला सारले हे नक्की. निवडणुक नकोच, कोणतीच नको, मतदार भिकेला लावतात व कधी तरी निवडून देतात हे लक्षात घ्यावे लागेल. भविष्यात लखमापुरात सर्व निवडणुका नेत्यांच्या नाही तर सर्वसामान्यांच्या मनाप्रमाणे होतीलहे नक्की!

मुक्त विद्यापीठात ललित कला केंद्राचा केला लोकजागर

नाशिक । यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील ललित कला केंद्रातर्फे जागतिक रंगभूमी दिनानिमित्त लोककलेतील युवापिढीचा लोकजागर कार्यक्रम संपन्न झाला. त्यात नाशिक जिल्ह्यातील युवा लोककलावंत राम वाणी, कृष्णा शिरसाठ, गणेश वाणी, विक्रम नन्नावरे, आशुतोष सूर्यवंशी व साहिल गजभार यांनी लोककलेतील विविध कलाप्रकारांचं सादरीकरण करत प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.

विद्यापीठाच्या शैक्षणिक इमारतीतील सभागृहात झालेल्या या कार्यक्रमावेळी प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे, प्र-कुलगुरू डॉ. जोगेन्द्रसिंह बिसेन, विद्यापीठ व्यवस्थापन मंडळ सदस्य डॉ. संजीवनी महाले, कुलसचिव दिलीप भरड, परीक्षा नियंत्रक भटूप्रसाद पाटील, उत्तराखंड मुक्त विद्यापीठाचे परीक्षा नियंत्रक डॉ. सोमेश कुमार, निरंतर शिक्षण विद्याशाखेचे संचालक डॉ. जयदीप निकम यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी

बोलतांना कुलगुरू प्रा. सोनवणे यांनी आपली लोककला संस्कृती टिकवून ठेवण्याची जबाबदारी ही विद्यापीठाचीदेखील आहे. या विचाराने हे विद्यापीठ काम करत असल्याचे सांगितले. तसेच ज्ञानगंगा घरोघरी नेण्यासोबत हे विद्यापीठ लोककलांसाठी लोकविद्यापीठ झाले पाहिजे, अशी आपली भूमिका असल्याचे स्पष्ट केले. अशा प्रकारचे कार्यक्रम हे विद्यापीठाच्या विविध विभागीय केंद्रांवर आयोजित करत महाराष्ट्रातील सर्व भागातील लोककलावंतांना व्यासपीठ मिळवून देण्यात येईल असे आश्वासन देखील त्यांनी दिले. तत्पूर्वी कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते नटराजाच्या मूर्तीचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर क्रमशः श्री गणेश वंदन, गण-गवळण, जागरण व गोंधळ सादर करण्यात आला. संबळ, हार्मोनियम, दिमडी, तालवाद्य व तुणतुणेचा अनोखा मेळ साधत या कलाकारांनी कार्यक्रमाची रंगत वाढवली. प्रास्ताविक ललित कला केंद्राचे प्रा. दत्ता पाटील यांनी केले. सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन ललित कला केंद्राचे संचालक सचिन शिंदे यांनी केले. यावेळी विद्यापीठातील विविध विद्याशाखांचे संचालक, प्रशासकीय अधिकारी–कर्मचारी, प्राध्यापक, शैक्षणिक संयोजक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आडगाव न्यू इंग्लिश स्कूलच्या सात विद्यार्थींना एन.एम.एम.एस. शिष्यवृत्ती

आडगाव । येथील रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश आडगाव या विद्यालयातील विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेत यश संपादन केले आहे.

इयत्ता आठवीच्या आर्थिक दुर्बल विद्यार्थ्यांसाठी एन.एम. एम.एस. ही स्पर्धा परीक्षा घेण्यात येते. या स्पर्धा परीक्षेमध्ये विद्यालयातील 38 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. यापैकी 16 विद्यार्थी या परीक्षेस पात्र ठरले होते. या परीक्षेची गुणवत्ता यादी लागली असून, विद्यालयातील 7 विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत. या प्रत्येक विद्यार्थ्यास दरवर्षी रुपये १२ हजार रुपये शिष्यवृत्ती पुढील ५ वर्षासाठी मिळणार आहे. या मध्ये पवार राजकुमार चुनीलाल ११४ गुण, लभडे शिवम सोमनाथ १०६ गुण, कु. उपाध्ये सृष्टी भिमराज १०० गुण, रसाळ हर्ष अरुण ९२ गुण, कु. जाधव समिक्षा सतिश ८३ गुण, कु. जाधव प्रांजल रवी ७३ गुण, धिवरे शरद बापू ६६ गुण मिळवून शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत.

या सर्व विद्यार्थ्यांना एन.एम. एम.एस. विभागाचे विभाग प्रमुख प्रसाद तुपे, हेमा शेळके, प्रवीण गावित, ए. पी. पाडवी या सर्व विषय शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे व्हाईस चेअरमन भगीरथ शिंदे, जनरल बॉडी सदस्य भाई पुंजाजी माळोदे, विभागीय अधिकारी बोडखे, सहायक विभागीय अधिकारी नाईकवाडी, तोरणे, स्कूल कमिटी सदस्य जे. टी. शिंदे, काशिनाथ शिंदे, गोरक्षनाथ माळोदे, मल्हारी मते, एकनाथ मते, अनिल पवार, मुख्याध्यापक आर. टी. साठे, पर्यवेक्षक एस. व्ही. शिंदे, रोहिणी भवर, कैलास बागले, अध्यक्ष व सदस्य शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षक पालक संघ, माता पालक संघ, माजी विद्यार्थी संघ या सर्वांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले.

वावी येथे रमजान ईद उत्सवात साजरा

(राम सुरसे यांजकडून)

वावी । मुस्लीम धर्मीयांचा महत्वाचा असा रमजान सन सिन्नर तालुक्यातील वावी येथे मोठ्या उत्सवात व आनंदी वातावरनात साजरा करण्यात आला.हिंदू धर्मीयांनी मुस्लीम धर्मीयांना गळा भेट देत ईदच्या शुभेच्छा देत एकतेचे दर्शन घडविले.

मौलांना झहीर अहमद सैय्यद यांच्या नेतृत्वात सोमवार दि.३१ रोजी सकाळी ९.३० वा. ईदगाह मैदानात ईदची सामुदायिक विशेष नमाज पठण करण्यात आली.समाजात एकोपा आणि सुख शांती नांदो,सर्वांना संकटातून मुक्ती मिळो, अखंड भारत देशाची उन्नती होवो व एकता बंदुभाव वृध्दींगत होवो अशी दुवा मुस्लीम बांधवांकडून करण्यात आली. प्रसंगी मुस्लिम बांधवांनी नवीन वस्त्र परिधान करत, अत्तर व सुरमा लावत मस्जिदमध्ये जाऊन सामूहिक नमाज अदा केली. नमाज पठणानंतर एकमेकांना गळाभेट देऊन शुभेच्छा देण्यात आल्या. प्रार्थनेपूर्वी सर्व अनुयायी कुराणात लिहिल्याप्रमाणे गरिबांना ठराविक

चिमुकल्यांनी रोजे पकडल्याबद्दल विशेष सत्कार

प्रमाणात धान्य दान करण्याचा विधी करतात. ज्याला फितर देणे असे म्हणतात फितर किंवा धर्मादाय भेट जी उपवास सोडण्याच्या उपलब्धतेमध्ये दिली जाते ती देण्यात आली. तदनंतर इमामकडून विशेष ईदची नमाज आणि दोन रकत नमाज अदा करण्यात आली. या विशेष उत्सवासाठी ईदगाहमध्ये नमाज पठणाची चोख व्यवस्था करण्यात आली होती.

सामूहिक नमाज पठणानंतर सर्वधर्मीयांनी एकमेकांची गळाभेट घेतली व एक मेकांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी फरिदभाई अत्तार, रफिकभाई अत्तार, रफिक इनामदार, इम्रान इनामदार, साबीर तांबोळी, वसीम मुलानी, सलमान शेख, दानिश शेख, अवेश पठाण, समीर पठाण,शाहरुख इनामदार, सलमान मुलानी, शाहरुख शेख, गफूरभाई इनामदार, मुबारक इनामदार, जावेद मणियार, सद्दाम शहा, राजूभाई मुलानी, समीर इनामदार, आसिफ इनामदार, हुजेफ इनामदार, शाहिद शेख, मोईन पठाण, रियाझ काझी, शहानवाज इनामदार, दानिश इनामदार, रईस इनामदार सह बहुसंख्य मुस्लीम बांधव उपस्थित होते.

ईद रोजे पूर्णत्वास नेणारे चिमुकल्यांचा विशेष सत्कार

मसीरा साबीर तांबोळी, साद जुबेर तांबोळी राफिया आसिफ इनामदार, रजा वसीम इनामदार, मुजमील राईस इनामदार, मिसबा वासीम मुलानी, साद शाहरुख इनामदार या चिमुकल्यांनी रमजान महिन्याचे कडक नियमावली असलेले संपूर्ण उपवास (रोजे) पूर्ण केल्याबद्दल महाराष्ट्र पोलीस अजगर युसुफ पठाण यांच्या हस्ते वरील मुलांचा सत्कार करण्यात आला.

'थामा'साठी थोडं थांबा

'[illegible]', '[illegible]' [illegible] '[illegible]' [illegible] [illegible] [illegible]

टॅरिफ जाहीर होण्यापूर्वी, सेन्सेक्सने घेतली उसळी , निफ्टी 23,300 च्या वर बंद

मुंबई, दि.२ प्रतिनिधी

शेअर बाजारात आज म्हणजेच बुधवारी जोरदार वाढ नोंदवली गेली, त्यापूर्वी मंगळवारी मोठी घसरण झाली. आज सेन्सेक्स 593 अंक किंवा 0.77% च्या वाढीसह 76,617 वर बंद झाला, तर निफ्टी 166.65 अंक किंवा 0.72% च्या वाढीसह 23,332.35 वर बंद झाला. क्षेत्रीय निर्देशांकांबद्दल बोलायचे झाले तर सर्व प्रमुख निर्देशांक वाढीसह बंद झाले आहेत. आजच्या ट्रेडिंग सत्रातील ही उडी अमेरिकन टॅरिफ दरांची घोषणा होण्यापूर्वी नोंदवण्यात आली आहे.

टाटा कंझ्युमर लिमिटेडच्या शेअर्समध्ये बुधवारी सर्वात मोठी झेप नोंदवली गेली. हा शेअर 7.11% नी मजबूत होऊन रु. 1063 च्या पातळीवर बंद झाला. यानंतर झॉमेटो चे शेअर 4.97% च्या उसळीसह 212.03 च्या पातळीवर बंद झाले, तर टायटन कंपनीचे शेअर्स 3.74% च्या वाढीसह 3098 च्या पातळीवर बंद झाले. याशिवाय इंडसइंड बँकेचे शेअर्स 2.90% वाढून 702.45 रुपयांच्या पातळीवर बंद झाले, तर मारुती सुझुकीचे शेअर्स 2.05% वाढून 11716 रुपयांच्या पातळीवर बंद झाले.

निफ्टी 50 मधील बीईएलचे शेअर्स 3.29% च्या सर्वात मोठ्या घसरणीसह Rs 282.40 वर बंद झाले, तर अल्ट्रा टॅक सिमेंटचे शेअर्स 1.13% कमकुवत होऊन 11251 वर बंद झाले. यानंतर, नेस्ले इंडियाचा शेअर 1.05% घसरला आणि 2211 रुपयांच्या पातळीवर बंद झाला, तर पॉवर ग्रिडने 0.89% ची घसरण नोंदवली आणि 286.75 रुपयांच्या पातळीवर बंद झाला. याशिवाय एलएण्डटीचे समभाग 0.50% घसरले आणि 3420 च्या पातळीवर बंद झाले.

जर आपण क्षेत्रीय निर्देशांकावर नजर टाकली तर निफ्टी एफएमसीजी निर्देशांक 1.13% च्या चांगल्या वाढीसह 53,703 च्या पातळीवर बंद झाला. बँक निफ्टी 1.02% च्या वाढीसह 51,348 च्या स्तरावर बंद झाला. निफ्टी फार्मा 0.87% वाढून 20,953 च्या पातळीवर बंद झाला. निफ्टी आयटी 0.84% च्या वाढीसह 36,284 च्या स्तरावर आणि निफ्टी ऑटो 0.82% च्या वाढीसह 21,409 च्या स्तरावर बंद झाला.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प टॅरिफ दरांची घोषणा करणार आहेत. ही घोषणा आज मध्य रात्री होणार आहे. याआधी, व्हाईट हाऊसच्या प्रेस सेक्रेटरी कॅरोलिन लेविट यांनी सांगितले होते की घोषणानंतर, दर त्वरित प्रभावाने लागू केले जातील. "माझी समजूत आहे की उद्या टॅरिफ जाहीर केले जातील, लगेचच लागू होतील,"

अमेरिकेच्या सिनेटमध्ये घडला इतिहास!
कोरी बुकर यांचे सलग २५ तास भाषण

वॉशिंग्टन, दि. २ वृत्तसंस्था

अमेरिकेची संसद सिनेटमध्ये आत्तापर्यंतच्या सर्वाधिक लांबीच्या भाषणाचा विक्रम नोंदला गेला आहे. हे भाषण थोडेथोडके नव्हे तर अखंड 25 तास 5 मिनिटे इतक्या लांबीचे झाले आहे. त्यामुळे सिनेटमध्ये सर्वाधिक लांबीचे भाषण म्हणून या भाषणाने विक्रम प्रस्थापित केला आहे. न्यू जर्सीचे डेमोक्रॅटिक पक्षाचे सिनेटर कोरी बुकर यांनी सिनेटमध्ये उभे राहून हे एतिहासिक भाषण केले आहे. त्यांनी या संपूर्ण भाषणात ट्रम्प प्रशासनाच्या कारभाराची लक्तरे काढत ट्रम्प यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला.

कोरी बुकर यांनी सोमवारी संध्याकाळी 6.59 वाजता भाषण सुरू केले आणि मंगळवारी रात्री 8.05 वाजता ते संपवले. कोरी बुकर म्हणाले की, जोपर्यंत मी शारीरिकदृष्ट्या सक्षम आहे तोपर्यंत अमेरिकन सिनेटचे नियमित कामकाज विस्कळीत करण्याचा माझा हेतू आहे. कारण मला डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाच्या धोरणांचा विरोध करायचा आहे.

बुकर यांना या ऐतिहासिक भाषणादरम्यान त्यांच्या डझनभर डेमोक्रॅटिक सहकाऱ्यांनी साथ दिली. सिनेट माइनॉरिटी लीडर चक शुमर, सिनेटर ख्रिस मर्फी, एमी

क्लोबुचर, मेझी हिरोनो आणि डिक डर्बिन यांनी बुकर यांच्याजवळ जाऊन त्यांनी बुकर यांच्यासोबत संवाद साधून त्यांना थोडा वेळ विश्रांती मिळेल असे पाहिले.

डेमोक्रॅटिक पक्षाचे हाउस माइनॉरिटी लीडर हकीम जेफ्रीस आणि काँग्रेस ब्लॉक कॉकसच्या सदस्यांनीही बुकर यांचे भाषण एकण्यासाठी सिनेट कक्षात उपस्थिती दर्शवली. बुकर यांचे चुलतभाऊ, भाऊ आणि डेमोक्रॅटिक सहाय्यक यावेळी गॅलरीत उपस्थित होते.

सिनेटच्या नियमांनुसार, एक सिनेटर सतत उभा राहूनच बोलत राहिला पाहिजे. तो सिनेट कक्षाबाहेर जाऊ शकत नाही, विश्रांती घेऊ शकत नाही किंवा शौचालयास जाऊ शकत नाही. बुकर यांनी या सर्व नियमांचे काटेकोर पालन केले. भाषणावेळी काही अडचण येऊ नये म्हणून त्यांनी भाषणाच्या काही दिवस आधी उपवास केला होता आणि भाषणाच्या आदल्या रात्रीदेखील द्रवपदार्थ पिणे थांबवले होते.रात्रीच्या वेळी बुकर, अध्यक्षता करणारे अधिकारी, काही लिपिक आणि सुरक्षा कर्मचारी वगळता संपूर्ण सिनेट रिकामी होती. सिनेट स्टाफ आणि कॅपिटल पोलिस यांना त्याच्या भाषणाच्या संपूर्ण कालावधीत आपापल्या जागांवर तैनात राहावे लागले. काही डेमोक्रॅट सिनेटरांनी मधूनच प्रश्न विचारून बुकर यांना थोडा वेळ सावरायला मदत केली.

बुकर हे उभे राहून भाषण करताना वजनाचा भार पडू नये म्हणून सतत हालचाल करत होते. काहीवेळी स्टँडवर हात टेकवून त्यांनी भाषण दिले. आपल्या नोट्सच्या जाड फायलीतून ते भाषण वाचत राहिले.

त्यांनी ट्रम्प यांचे परराष्ट्र धोरण, मेडिकेअरवरील संभाव्य कपात, तसेच ट्रम्प यांचे सल्लागार एलन मस्क यांच्या सरकारी कार्यक्षमता धोरणांविषयी भाष्य केले. वांशिक न्याय, मतदान हक्क आणि आर्थिक असमानता यावरही त्यांनी भाष्य केले. विशेषतः ट्रम्प प्रशासनाच्या धोरणांचा दुर्लक्षित समुदायांवर होणाऱ्या परिणामांवर त्यांनी भर दिला.

पूंछमध्ये पाकिस्तानी सैन्याचा घुसखोरीचा प्रयत्न उधळला

पूंछ, दि. २ वृत्तसंस्था

पाकिस्तानी सैन्याने पुन्हा एकदा नियंत्रण रेषेचे (एलओसी) उल्लंघन केल्याची घटना समोर आली आहे. जम्मू- काश्मीरच्या पूंछ जिल्ह्यातील कृष्णा घाटी सेक्टरमध्ये पाकिस्तानी सैन्याचा घुसखोरीचा प्रयत्न नुकताच भारतीय सैन्याने उधळून लावला. १ एप्रिल रोजी नियंत्रण रेषेवर पाकिस्तानी सैन्याच्या घुसखोरीमुळे कृष्णा घाटी सेक्टरमध्ये एक सुरुंग स्फोट झाला. यानंतर पाकिस्तानी सैन्याने शस्त्रसंधीचे उल्लंघन करत गोळीबार केला. या गोळीबाराला भारतीय सैन्याने चोख प्रत्युत्तर दिले.

येथील परिस्थिती सध्या नियंत्रणात आहे. तसेच येथील हालचालीकडे बारकाईने लक्ष ठेवले जात आहे. नियंत्रण रेषेवर शांतता राखण्यासाठी २०२१ च्या डीजीएमओ म्हणजेच लष्करी ऑपरेशन्सचे महासंचालक यांच्यात झालेल्या समझोत्याचे पालन करण्याचे महत्त्व भारतीय लष्कराने पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे, अशी माहिती जम्मू संरक्षण प्रवक्त्यांनी दिली आहे.

१ एप्रिल रोजी पाकिस्तानी सैन्याने कृष्णा घाटी सेक्टर भागात घुसखोरीचा प्रयत्न केला. यानंतर दोन्ही देशांच्या सैनिकांत जोरदार गोळीबार झाला. यामुळे सीमेवर तणावाची परिस्थिती निर्माण झाली. पाकिस्तानी सैन्याच्या या आगळिकीनंतर भारतीय लष्कराने पाकिस्तानला स्पष्ट इशारा दिला आहे की शस्त्रसंधीचे उल्लंघन केल्यास त्याला चोख प्रत्युत्तर दिले जाईल.

गुप्तचर सुत्रांच्या माहितीनुसार, भारतीय सैन्याने

प्रत्युत्तरादाखल केलेल्या गोळीबारात दोन पाकिस्तानी सैनिक ठार झाले आहेत. चौधरी नजाकत अली आणि पाकव्याप्त काश्मीरच्या नाक्याल कोटली येथील नसीर अहमद अशी त्यांची नावे आहेत.

मंगळवारी पूंछ जिल्ह्यात नियंत्रण रेषेवर भूसुरुंग स्फोटानंतर भारतीय सैन्याने चोख प्रत्युत्तर देत गोळीबार केला. "दुपारी १.३० वाजण्याच्या सुमारास, नियंत्रण रेषेवरील कृष्णा घाटी सेक्टरमधील नांगी टेकरी भागात भूसुरुंग स्फोटानंतर सैन्याने गोळीबार केला," असे एका अधिकाऱ्याने म्हटले आहे.

कठुआमधील दहशतवादविरोधी कारवाईदरम्यान पाकिस्तानी सैन्याने घुसखोरीचा प्रयत्न केला. कठुआममध्ये सुरक्षा दलांनी जैशच्या दोन दहशतवाद्यांना ठार केले.

नंदीग्राममध्ये भाजप उभारणार अयोध्येसारखे भव्य राम मंदिर - शुभेंदू अधिकारी

कोलकाता, दि. २ वृत्तसंस्था

नंदीग्राममध्ये अयोध्यासारखे भव्य राम मंदिर बांधले जाईल आणि त्याची पायाभरणी ६ एप्रिल रोजी रामनवमीच्या दिवशी केली जाईल, अशी घोषणा पश्चिम बंगालचे भाजपचे ज्येष्ठ नेते शुभेंदू अधिकारी यांनी केली. पूर्व मेदिनीपूरमध्ये ते बोलत होते.

यावेळी शुभेंदू अधिकारी म्हणाले की, विधानसभेतील विरोधी पक्षनेते अधिकारी म्हणाले की, मवारी त्यांच्या गृहजिल्हा पूर्व मेदिनीपूरमध्ये सोनाचुरा येथे पायाभरणी समारंभाच्या आधी भांगबेरा ते सोनाचुरा अशी भव्य मिरवणूक काढली जाईल . यामध्ये सर्व दुर्गा पूजा आणि स्थानिक मंदिर समित्यांचे प्रतिनिधी, हिंदू धार्मिक संघटना आणि सामुदायिक क्लब सहभागी होतील.

नंदीग्राममधील राम मंदिर हे पश्चिम बंगालमधील सर्वात मोठे राम मंदिर असेल. हे राज्यातील कोट्यवधी हिंदूंच्या भगवान राम यांच्यावरील भक्तीचे प्रतिबिंब असेल. नंदीग्राममध्ये आधीच शतकानुशतके जुने राम मंदिर आहे. स्थानिक आमदार म्हणून अधिकारी यांनी प्रथम तृणमूल काँग्रेसच्या काळात आणि आता भाजपच्या काळात त्याचे नूतनीकरण करण्यासाठी पुढाकार घेतला होता. त्याच जिल्ह्यातील दिघा येथे राज्य सरकारने जगन्नाथ मंदिर बांधण्याचे काम सुरू केल्यामुळे नवीन राम मंदिर बांधण्याच्या हालचालीला महत्त्व प्राप्त झाले आहे.

मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी जाहीर केले आहे की, जगन्नाथ मंदिराचे उद्घाटन यावर्षी ३० एप्रिल रोजी येणाऱ्या अक्षय्य तृतीयेच्या दिवशी होईल. शुभेंदू अधिकारी यांनी ममता बॅनर्जी यांच्यावर भगवान जगन्नाथाच्या भक्तांच्या भावनांशी खेळण्याचा आरोप केला होता. ओडिशातील पुरी येथे आधीच शतकानुशतके जुने जगन्नाथ मंदिर आहे. दरवर्षी पश्चिम बंगालसह देशभरातून लाखो भाविक या मंदिराला भेट देतात. रामनवमीला पश्चिम बंगालमध्ये १ कोटी हिंदू रस्त्यावर उतरतील. २००० पर्यंत मिरवणुका काढल्या जातील, अशी घोषणाही अधिकाऱ्यांनी केली होती.

ज्या जमिनीवर राम मंदिर बांधले जाणार आहे ती जमीन तृणमूलकडे असताना मूळ मालकांनी अधिकारी यांना कवडीमोल किमतीत विकली होती, असा आरोप तृणमूलचे राज्य सरचिटणीस कुणाल घोष यांनी मंगळवारी आरोप केला. २००७ मध्ये जमीन अधिग्रहण विरोधी आंदोलनादरम्यान नंदीग्राममध्ये पोलिसांच्या गोळीबारात मृत्युमुखी पडलेल्या १४ जणांच्या स्मरणार्थ रुग्णालय बांधण्यासाठी ही जमीन खरेदी केली होती.

भाजपला अध्यक्ष का निवडता आला नाही? - अखिलेश यांची टिप्पणी
अमित शाहांचे मिश्किल प्रत्युत्तर

नवी दिल्ली, दि. २ वृत्तसंस्था

केंद्र सरकारने बुधवारी वक्फ दुरुस्ती विधेयक 2025 संसदेत मांडले. यानंतर आत लोकसभेत वक्फ दुरुस्ती विधेयकावर चर्चा सुरू झाली आहे. समाजवादी पक्षाचे अध्यक्ष आणि कन्नौजचे खासदार अखिलेश यादव यांनीही या चर्चेत भाग घेत भाजपवर टीकास्त्र सोडले. भाजपला कोंडीत पकडण्यासाठी, आतापर्यंत तुम्हाला पक्षाध्यक्ष का निवडता आला नाही? असा सवाल अखिलेश यांनी केला. अखिलेश यांच्या वक्तव्यावर केंद्रीय गृहमंत्री अमित शाहा म्हणाले की, अखिलेशजींनी हसतमुखाने प्रश्न विचारला असल्याने मलाही हसत हसत उत्तर द्यायचे आहे. येथे बसलेल्या सर्व पक्षांमध्ये कुटुंबातील पाच व्यक्तीच अध्यक्ष निवडतात. पण आमच्या पक्षात लाखो-करोडो लोकांमधून निवडून आलेला व्यक्ती अध्यक्ष बनतो. अखिलेशजी तुम्ही पुढचे 25 वर्षे अध्यक्ष राहणार..., अशी मिश्किल टिप्पणी शाहांनी यावेळी केली. यावर अखिलेश यांनीही हसत हसत गृहमंत्री शाहांच्या उत्तराला प्रतिसाद दिला. वक्फ विधेयकावर चर्चा करताना अखिलेश यादव म्हणाले, मोठ्या लोकसंख्येसाठी आणखी एक विधेयक आणले आहे. हे वक्फ विधेयक म्हणजे अपयशाचा पडदा आहे. अचानक मध्यरात्री चलनी नोटा काढून टाकल्या. त्या नोटाबंदीच्या अपयशाची चर्चा झाली तरी अजून किती पैसा बाहेर पडतोय कुणास ठाऊक. बेरोजगारी, महागाई, शेतकऱ्याचे उत्पन्न दुप्पट न करणे हे त्याचे अपयश आहे, अशी टीका अखिलेश यांनी केला. शेवटी मी एवढेच सांगू इच्छितो की, हे वक्फ विधेयक कोणत्याही आशेने आणले जात नाहीये; ते एका विचारपूर्वक आखलेल्या रणनीतीचा भाग आहे. त्यांनी जनाधार गमावला आहे. त्यामुळेच आता त्यांना मुस्लिमांमध्ये फूट पाडायची आहे. मी, माझा पक्ष आणि मित्रपक्ष या विधेयकाचा तीव्र विरोध करतो. जर मतदान झाले तर आम्ही त्याविरुद्ध मतदान करू, अशी स्पष्टोक्ती अखिलेश यांनी दिली.

मानसिक रुग्णांचा आधार 'अमृतवाहिनी'

लोकसेवार्थ

अमृतवाहिनी ग्रामविकास मंडळ ही महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील बेघर, सोडून दिलेल्या रस्त्याच्या कडेला असलेल्या मानसिक रुग्णांच्या पुनर्वसनासाठी समर्पितपणे काम करणारी एक स्वयंसेवी संस्था आहे. मानवसेवा प्रकल्पात आमच्याकडे ६० रुग्ण आहेत आणि आतापर्यंत सुमारे २५०० रुग्णांना त्यांच्या कुटुंबियांशी यशस्वीरित्या पुनर्मिलन करण्यात आले आहे. श्री अमृतवाहिनी ग्रामविकास मंडळ स्थलांतरित कामगारांमध्ये एसटीआय/एचआयव्ही एड्स प्रतिबंध आणि नियंत्रणासाठी काम करत आहे.

श्री अमृतवाहिनी ग्रामविकास मंडळाने अहमदनगर शहरात आणि संपूर्ण जिल्ह्यात मानसिकदृष्ट्या आजारी रस्त्याच्या कडेला असलेल्या बेघर लोकांचे सर्वेक्षण पूर्ण केले आहे जिथे रुग्णांची संख्या खूप मोठी असल्याचे आढळून आले आहे ते १०८० आहे ज्यामध्ये ३८० महिला आणि ७०० पुरुष आहेत. हे सर्वेक्षण अमृतवाहिनीने २०१० ते २०११ या कालावधीत केले होते. या संख्येमागील कारणे आणि आजार म्हणजे गंभीर गरिबी, वैद्यकीय सुविधांचा अभाव, परिचित समस्या, मानसिक धक्के, मद्यपान आणि अंमली पदार्थांचे व्यसन. संस्थेने प्रामुख्याने या समस्येवर त्यांच्या पातळीवर काम केले आहे आणि काही प्रकरणे सोडवली आहेत. अहमदनगर शहर हे महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागात आहे. या वर्षी येथे अत्यल्प पाऊस पडला आहे. हा जिल्हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा जिल्हा आहे. लोकांना तीव्र कामगार समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. काही लाभार्थी या जिल्ह्यातील आहेत तर काही त्यांच्या कुटुंबियांनी आणि नातेवाईकांनी भरपूर आहेत. हेच एकमेव कारण

आहे की संघटना त्यासाठी अर्ज करण्यास प्रेरित आहे. रुग्ण रस्त्यावर फिरत आहेत आणि मानसिक स्थितीच्या धोक्याच्या परिस्थितीत आहेत. म्हणूनच संघटना त्यांना काही अधिक वैद्यकीय आणि मानसिक माहिती देऊ इच्छिते ज्यामुळे त्यांना स्थिरता आणि शारीरिक विश्रांती मिळण्यास मदत होईल. आजाराची संख्या आणि गांभीर्य लक्षात घेता अहमदनगर शहर आणि जिल्ह्याच्या पातळीवर अशा रुग्णांची ओळख, बचाव, समुपदेशन उपचार आणि पुनर्मिलन आणि काही प्रमाणात पुनर्वसन या पातळीवर हस्तक्षेप करणे काळाची तातडीची गरज आहे. या चारही पातळ्यांवर असे हस्तक्षेप करता येईल जिथे हा प्रकल्प सोडून दिलेल्या आणि विस्थापित रुग्णांना आणि पालकांना मानवी पातळीवर कायमस्वरूपी एकत्र आणण्यासाठी उत्प्रेरक ठरेल. हे मानवी हक्कांच्या कक्षेत देखील आहे.

लोकजागर

अहमदनगर जिल्ह्यातील शहर आणि ग्रामीण भागात बेघर लोक फिरत असल्याने, संस्थेच्या केंद्रस्थानी असलेल्या व्यक्तीला घेऊन सर्व स्तरांवर त्याची ओळख पटवणे आणि कुटुंबांकडून किंवा विशिष्ट कालावधीत ओळख पटली नसल्यास सरकारकडून परवानगी घेणे आणि नंतर पुढील प्रक्रिया सुरू करणे हा पहिलाच हस्तक्षेप असेल. ओळख पटल्यानंतर आणि काही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संस्थेच्या केंद्रस्थानी त्या व्यक्तीवर उपचार सुरू केले जातील. यासाठी संस्थेने अहमदनगर येथील क्षीरसागर रुग्णालयाशी करार केला आहे, जिथे डॉ. क्षीरसागर मानसोपचारात एमडी आहेत. संस्थेने उपचार आणि मानसोपचारांसाठी डॉ. अनयक्षीरसागर यांच्याशी सामंजस्य करार केला आहे. .ही प्रक्रिया व्यक्तीच्या मानसिक समाधानाच्या विशिष्ट पातळीवर सुरू होईल. ती प्रथम पुनर्मिलनाच्या दिशेने राबवली जाईल आणि जर ती कार्यक्षम नसेल तर त्या व्यक्तीला कायमस्वरूपी पुनर्वसनासाठी पाठवले जाईल.

जर एखाद्या व्यक्तीचा उपचाराने विकास झाला आणि जर त्या व्यक्तीचे कुटुंब चांगल्या आणि स्वीकारार्ह परिस्थितीत आढळले तर त्या व्यक्तीला कुटुंबांकडे सोपवले जाईल. श्री अमृतवाहिनी ग्रामविकास मंडळात प्रशिक्षित झालेल्या अनेक रहिवाशांचे आता पुनर्वसन झाले आहे आणि ते फायदेशीरपणे रोजगार मिळवत आहेत.आता कौशल्य प्रशिक्षणावर अधिक भर दिल्याने, प्लेसमेंट सेवा मजबूत करण्यासाठी आणि व्यावसायिक प्रशिक्षणाची व्याप्ती वाढवण्याच्या योजना सुरू आहेत.

महात्मा गांधींच्या पणती नीलमबेन पारिख यांचे वयाच्या 92 व्या वर्षी निधन

नवसारी, दि. २ वृत्तसंस्था

महात्मा गांधींची पणती नीलमबेन पारिख यांचं गुजरातमधल्या नवसारी या ठिकाणी त्यांच्या निवासस्थानी निधन झालं आहे. नीलमबेन ९२ वर्षांच्या होत्या. महात्मा गांधी आणि त्यांचा मोठा मुलगा हरिलाल यांच्यातल्या मतभेदांवर नीलमबेन पारिख यांनी एक पुस्तक लिहिलं होतं ज्यामुळे त्या चर्चेत आल्या होत्या.

दक्षिणपथ आदिवासी महिलांच्या उद्धारासाठी नीलमबेन यांनी त्यांचं आयुष्य वेचलं. या आदिवासी महिलांना स्वावलंबन शिकवणं, शिक्षण देणं आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचं काम नीलमबेन यांनी केलं. हरिलाल गांधी आणि त्यांच्या पत्नी गुलाब यांना पाच मुलं होती. त्यापैकी रामीबेन यांची कन्या म्हणजे नीलमबेन. नीलमबेन या त्यांच्या खादीवरील निष्ठेसाठीही ओळखल्या जात होत्या त्यांनी त्यांचं संपूर्ण आयुष्य समाजासाठी वेचलं अशी माहिती नीलमबेन यांचे चिरंजीव डॉ. समीर पारिख यांनी दिली.

सत्तेतून जातील तोपर्यंत देश उद्ध्वस्त झालेला असेल - मेहबुबा मुफ्तींची भाजपावर टीका

जम्मू, दि. २ वृत्तसंस्था

केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री किरेन रिजेजू यांनी आज लोकसभेत वक्फ दुरूस्ती विधेयक सादर केले. यानंतर सभागृहात विधेयकावरील चर्चेला सुरुवात झाली असून, विरोधी पक्ष आणि सरकारी नेत्यांमध्ये जोरदार वादविवाद होत असल्याचे पाहायला मिळत आहे.

याचबरोबर या विधेयकाला विरोध करणाऱ्यांनी सभागृहा बाहेर आवाज उठवण्यास सुरुवात केली आहे. अशात जम्मू आणि काश्मीरच्या माजी मुख्यमंत्री मेहबुबा मुफ्ती यांनीही या विधेयकावरून सत्ताधारी भाजपावर टीका केली आहे. "ते सत्तेतून जातील तोपर्यंत संपूर्ण देश उद्ध्वस्त झालेला असेल", असे मेहबुबा मुफ्ती यांनी म्हटले आहे.

लोकसभेत वक्फ दुरुस्ती विधेयक सादर करण्यात आल्यानंतर जम्मू आणि काश्मिरच्या माजी मुख्यमंत्री आणि पिपल्स डेमोक्रॉटीक पक्षाच्या अध्यक्षा मेहबुबा मुफ्ती म्हणाल्या, "वक्फ दुरूस्ती विधेयक गेल्या १० वर्षांपासून भाजपाने मुस्लिमांविरुद्ध सुरू केलेल्या कारवाईचा हा एक भाग आहे. आता ते वक्फ दुरुस्ती विधेयक आणून आमच्या मालमत्ता ताब्यात घेऊ इच्छितात. आपला

देश जगभरात बंधुत्वासाठी, गंगा-जमुना आणि तहजीबसाठी ओळखला जात होता."

एका वृत्तसंस्थेशी बोलताना मेहबुबा मुफ्ती पुढे म्हणाल्या की, "ते (भाजपा) विसरले आहेत की, आज त्यांचे सरकार आहे पण उद्या त्यांचे सरकार राहणार नाही. ते जाईपर्यंत संपूर्ण देश उद्ध्वस्त झालेला असेल. सध्या सत्तेत असलेले भाजपा सरकार मुस्लिमांच्या हक्कांचे उल्लंघन करत आहे. येत्या काळात संपूर्ण देशाला याचे परिणाम भोगावे लागतील."

लोकसभेत वक्फ दुरुस्ती विधेयकावरील चर्चेदरम्यान काँग्रेस खासदार गौरव गोगोई यांनीही भाजपा सरकारवर टीका केली आहे. ते म्हणाले, "मला विचारायचे आहे की हे विधेयक अल्पसंख्याक व्यवहार मंत्रालयाने बनवले आहे की इतर कोणत्या विभागाने? हे विधेयक कुठून आले? आज देशातील अल्पसंख्याकांची अवस्था अशी झाली आहे की, सरकारला त्यांना त्यांच्या धर्माचे प्रमाणपत्र द्यावे लागते. तुम्ही पाच वर्षे पूर्ण केली आहेत की नाही याचे प्रमाणपत्र इतर धर्मियांकडून मागतील का? या विधेयकात असे का विचारले जात आहे? धर्माच्या या प्रकरणात सरकार का हस्तक्षेप करत आहे."

लोको पायलटचा नोकरीच्या शेवटच्या दिवशी भीषण मृत्यू

रांची, दि. २ वृत्तसंस्था

झारखंडच्या साहेबगंज जिल्ह्यात मंगळवारी पहाटे दोन मालगाड्यांमध्ये झालेल्या धडकेत दोघांचा मृत्यू झाला होता तर पाच जण जखमी झाले होते. एनटीपीसी या वीज कंपनीच्या दोन मालगाड्यांची मध्यरात्री तीन वाजता धडक बसली. ज्या ट्रॅकवर हा अपघात झाला तो देखील एनटीपीसीच्या मालकीचा आहे आणि त्याचा वापर कोळसा त्याच्या पॉवर प्लांटपर्यंत नेण्यासाठी केला जातो. हा अपघात इतका भीषण होता की धडकेनंतर दोन्ही इंजिनांना आग लागली. या आगीत होपळून दोन्ही लोको पायलटचा मृत्यू झाला. यातील एका लोको पायलट त्याच दिवशी निवृत्त होणार होता. लोको पायलटच्या कुटुंबियांकडून निवृत्तीच्या कार्यक्रमाची तयारी सुरु असताना त्यांच्यावर दुखाचा डोंगर कोसळला. झारखंडमध्ये कोळसा भरलेल्या मालगाड्यांच्या समोरासमोर झालेल्या धडकेत दोन चालक जिवंत जाळले. चालकासह ५ जण जखमी झाले आहेत. साहिबगंज जिल्ह्यातील बऱ्हेतमधील सोनजोरीजवळ ही घटना घडली. मालगाडीच्या चालकासह एकूण ५ जण गंभीररीत्या भाजले. जखमींवर सामुदायिक आरोग्य केंद्र, बारहेत येथे उपचार सुरू आहेत. दुसरीकडे, रेल्वेने या अपघातापासून स्वतःला दूर ठेवलं. या घटनेशी रेल्वेचा काहीही संबंध नसल्याचे रेल्वे अधिकाऱ्यांनी सांगितले.

बांबूची यशस्वी शेती

शून्यातून विश्व

शेती म्हटलं कि अनिश्चितता असल्याचा व्यवसाय म्हणून पाहिलं जातं. मात्र अलीकडच्या काळात तरुण वर्ग मोठ्या प्रमाणावर शेतीकडे वळत चालला आहे. अनेक उच्चशिक्षित तरुण आज शेतीकडे वळतांना दिसत आहेत. शेतीत काहीतरी नवीन करायचं म्हणून नाशिकच्या एका आयटीच्या तरुणाने बांबूची शेती उभारून नवा पर्याय उभा केला आहे.

नाशिकमधील अनेक तरुणांनी आता नोकरीच्या मागे न लागता इतर उद्योग, व्यवसाय, पर्यटन आदी क्षेत्रात उभारी घेत आहेत. नाशिक जिल्ह्यातीलच मूळचा त्र्यंबकेश्वर तालुक्यातील तळेगाव येथील असलेला प्रशांत दाते याने बांबू शेतीत उतरून प्रगतशील शेतकरी म्हणून नावारुपाला आलेला आहे. सध्या प्रशांत हा लाखलगाव (रामाचे) येथील प्रगतशील युवा शेतकरी म्हणून ओळखला जातो. मात्र तो देखील द्राक्ष, गहू यासारखी पिके घेत असायचा. मात्र द्राक्ष शेतीत मान्सूनच्या लहरीपणामुळे वारंवार होणाऱ्या नुकसानीपासून दूर राहण्यासाठी शाश्वत शेतीचा नवा पर्याय म्हणून बांबू पिकाची शेती करण्याचा धाडसी निर्णय घेतला. आणि आजघडीला नाशिक जिल्ह्यासह महाराष्ट्रभर त्याची बांबू शेती प्रसिद्ध झाली आहे. आता पुण्यात थेट शंभर एकरवर बांबू लागवड करण्याचा मानस प्रशांतने बोलून दाखविला.

दरम्यान नाशिक शहरात शिक्षण झालेला, 2012 साली नाशिक येथून अभियांत्रिकी शिक्षण पूर्ण करून नोकरीच्या मागे न लागता स्वतः शेतीतून काहीतरी नवीन निर्माण करण्याची जिद्द प्रशांतकडे होती. पूर्वी शेतात असणाऱ्या द्राक्ष शेतीला फाटा देऊन हा युवक बांबू शेतीकडे वळाला. द्राक्षाला बांबूचा लागत असायचा, बांबूला अनेक ठिकाणी वापर होत असायचा म्हणूनच बांबू शेती करण्याचा निर्णय घेतला. मात्र तत्पूर्वी त्याने जिल्ह्यासह इतर भागात जाऊन नेमकी बांबू शेती कशी केली जाते? बांबूचे प्रकार कोणते? कोणत्या हंगामात बांबू शेती केली जाते? हे सर्व प्रश्न त्याच्या मनात घिरट्या घालत होते. यासाठी 2016 मध्ये प्रथम बांबू लागवडीबाबत माहिती घेण्यास सुरवात केली. सुरवातीच्या काळात अमरावती कृषी विद्यापीठ, कृषि विद्यापीठ दापोली या ठिकाणच्या बांबू रोपवाटिकेस भेट देऊन बांबू शेतीबाबत माहिती घेतली. 2017 मध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यातील रानबाभळी येथील शेतकऱ्याकडून बांबूच्या माणगा जातीच्या 500 कंद खरेदी करून त्या प्रजातीची लागवड 1 एकर शेतावर केली. जवळपास एक लाख रुपयांचे भांडवल गुंतवून आतापर्यंत सात लाखांचे रोप तयार केल्याचे प्रशांतने सांगितले.

त्यानंतर त्यांनी महाराष्ट्र बांबू विकास महामंडळ, बांबूगार्डन वडाळी अमरावती, केरला वन संशोधन संस्था पिची, इन्स्टिट्यूट ऑफ फॉरेस्ट प्रॉडक्टव्हिटी झारखंड, फॉरेस्ट रिसर्च इन्स्टिट्यूट डेहराडून, फॉरेस्ट रिसर्च इन्स्टिट्यूट जोरहाट आसाम, नागालँड, बांबू संशोधन संस्था, कृषि विद्यापीठ शिमोगा कर्नाटक, जवाहरलाल नेहरु ट्रॉपिकल बॉटनिकल गार्डन व संशोधन संस्था तिरुअनंतपुरम, केरळ ह्या ठिकाणी जाऊन बांबू शेतीबाबतची माहिती घेऊन बांबूच्या विविध 14 प्रजातीचे संवर्धन केले. याशिवाय रोजगाराच्या दृष्टीने स्वतःच्या शेतावर बांबू ऑक्सिजन पार्क ही संकल्पना राबवून हॉटेल व लॉजिंग व्यवसाय सुरू करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. त्यातून अर्थाजनाला नवी संधी निर्माण होईल. सध्या त्यांनी पुणे जिल्ह्यात 100 एकर शेती भाडेतत्त्वावर करार पद्धतीने घेऊन 100 एकर बांबू शेती उभी करण्याचा प्रयत्न सुरू व भविष्यात इथेनॉलसारखा प्रकल्प राबवण्याचा त्यांचा मानस आहे.

शब्दार्थ

JCB

खरं तर, आपण ज्या मशीनला जेसीबी म्हणता, त्या मशीनचं नाव जेसीबी नाही; जेसीबी हे मशीन तयार करणाऱ्या एका कंपनीचं नाव असून, कंपनीचे मालक व ब्रिटिश अब्जाधीश जोसेफ सिरिल बामफोर्ड यांचं नाव आहे. त्यांच्या नावाचा शॉर्ट फॉर्म जेसीबी, असा होतो.

संकलन –संयोजन
सुबोध रणशेवरे
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

डोनाल्ड ट्रम्प यांच्या टॅक्स धोरणामुळे शेअर बाजाराची धास्ती वाढली
सात दिवसांत सोन्याचा भाव 3500 हजारांनी वाढला

मुंबई, दि. २ प्रतिनिधी

शेअर बाजारात प्रचंड पडझड सुरु असताना सोन्